



# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, शुक्रवार २४ एप्रिल २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०





# बंगाल-तमिळनाडूत मतदानाची विक्रमी टक्केवारी



विधान सभा निवडणूक 2026



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** देशातील दोन महत्त्वाच्या राज्यांच्या विधानसभा निवडणुका सध्या संपूर्ण देशाचे लक्ष वेधून घेत आहेत. पश्चिम बंगाल आणि तामिळनाडूमध्ये आज लोकशाहीचा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा झाला. दोन्ही राज्यांत मतदारांनी घराबाहेर पडून बंपर मतदान केल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. मतदानाची ही विक्रमी टक्केवारी पाहता, सत्ताधारी पुन्हा बाजी मारणार की विरोधक सत्तेचे समीकरण बदलणार, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

**तामिळनाडूत तिरंगी लढत, मतदारांचा उत्साह-** तमिळनाडूच्या विधानसभा निवडणुकीसाठी आज एकाच टप्प्यात मतदान पार पडले. सायंकाळी ५ वाजेपर्यंत तब्बल ८२.२४ टक्के मतदारांनी आपला हक्क बजावला. या निवडणुकीत सत्ताधारी द्रमुक, भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीए आणि अभिनेता विजय यांचा नवाकोरा पक्ष टीव्हीके यांच्यात जोरदार तिरंगी लढत पाहायला मिळत आहे. मतदानाची ही वाढलेली टक्केवारी कोणाच्या पारड्यात झुकणार, हे ४ मे रोजीच स्पष्ट होणार आहे.

**पश्चिम बंगालमध्ये जंगलमहाल ते उत्तर बंगालपर्यंत रांगा-**दुसरीकडे, पश्चिम बंगालमध्ये पहिल्या टप्प्यातील मतदानाची आकडेवारी पाहून सर्वच राजकीय पक्षांचे धाबे दणाणले आहेत. निवडणूक आयोगाच्या आकडेवारीनुसार, सायंकाळी ५ वाजेपर्यंत तब्बल ८९.९३ टक्के मतदान नोंदवण्यात आले आहे. आज राज्यातील १६ जिल्ह्यांतील १५२ जागांसाठी मतदान प्रक्रिया पार पडली. उत्तर बंगाल, दक्षिण बंगाल आणि विशेषतः जंगलमहाल क्षेत्रातील मतदारांनी सकाळी ७ वाजल्यापासूनच मतदान केंद्रांवर मोठी गर्दी केली होती.मुर्शिदाबादपासून ते बांकुरापर्यंतच्या अनेक संवेदनशील भागांत अत्यंत सुरक्षित वातावरणात मतदान झाले. पश्चिम बंगालमधील एकूण २९४ जागांसाठी दोन टप्प्यांत निवडणूक होत असून, १४२ जागांसाठीचा दुसरा टप्पा २९ एप्रिल रोजी पार पडणार आहे. आजच्या मतदानानंतर उमेदवारांचे राजकीय भवितव्य ईव्हीएममध्ये बंद झाले असून, ४ मे २०२६ रोजी होणा-या मतमोजणीकडे आता संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे. वाढलेली ही मतदानाची टक्केवारी ही सत्तापालटाचे संकेत आहेत की सत्ताधा-यांवरील विश्वासाची पावती, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

# बारामती, राहुरीत 52.44 टक्के मतदान

**बारामती /प्रतिनिधी-**बारामती विधानसभा मतदारसंघ पोटनिवडणुकीत सायंकाळी ५ वाजेपर्यंत ५२.४४ टक्के मतदान झाले. बारामतीची पोटनिवडणूक बिनविरोध करण्याचा प्रयत्न झाला. परंतु त्याला यश आले नाही. बारामतीत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना सत्ताधारी तसेच विरोधक अशा सर्वांनीच पाठिंबा दिला आहे. त्याचा या निवडणुकीत विजय निश्चित मानला जात आहे. तरीदेखील येत्या ४ मे रोजी नेमकं काय होणार हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.  राज्याचे माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर बारामतीमध्ये पोटनिवडणूक होत आहे. या निवडणुकीत अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार निवडणूक लढवत आहेत. सुनेत्रा पवार यांच्याविरोधात २१ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. अतिशय भावनिक वातावरणात सुनेत्रा पवार यांनी कुटुंबासह मतदानाचा अधिकार बजावला.



सुनेत्रा पवार यांनी कुटुंबासह मतदानाचा बजावला हक्क

## पश्चिम बंगालमध्ये रेकॉर्डब्रेक 91 टक्के मतदान



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**आज (२३ एप्रिल) पश्चिम बंगालमधील विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातील आणि तामिळनाडूतील मतदानही पार पडले. या सर्व निवडणुकांचा निकाल ४ मे रोजी लागणार आहे. राज्यातील दोन जागांसाठीची पोटनिवडणूक तसेच पश्चिम बंगाल आणि तामिळनाडूतील निवडणूक ही अनेक अर्थांनी महत्त्वाची मानली जात आहे. पश्चिम बंगालमध्ये तर विद्यमान मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांची प्रतिष्ठाच पणाला लागली आहे. मतदान प्रक्रियेदरम्यान बंगालमध्ये काही अपवाद वगळता मतदान सुरळीत पार पडले. विशेष म्हणजे या पहिल्याच टप्प्यात मतदानाचे सर्व रेकॉर्ड्स यावेळी मोडीत निघाले. पश्चिम बंगालमधील विधानसभेच्या निवडणुकीतील पहिल्या टप्प्यात मतदानाचे सर्व रेकॉर्ड तुटले आहेत. या पहिल्या टप्पात विक्रमी ९१.३५ टक्के मतदान झाले. या पहिल्या टप्प्यात १६ जिल्ह्यांतील १५२ जागांसाठी निवडणूक झाली होती.

# भारताला 'नरक' म्हणणे 140 कोटी भारतीयांचा अपमान

## ■ PM मोदी गप्प ■ काँग्रेसची टीका

**नवी दिल्ली/मुंबई :** अमेरिकेतील जन्मसिद्ध नागरिकत्वाच्या मुद्यावरून राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताबाबत केलेल्या विधानामुळे नव्या वादाला तोंड फुटल्याचे म्हटले जात आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी सोशल मीडियावर एक व्हीडीओ शेअर केला आहे.



व्हीडीओमध्ये प्रसिद्ध रेडिओ होस्ट मायकल सॅव्हेजने, मुलांना जन्मसिद्ध नागरिकत्व मिळावे, यासाठी परदेशी नागरिक अमेरिकन कायद्यांचा फायदा घेण्यासाठी शेवटच्या महिन्यात अमेरिकेत येतात, असा दावा केला आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी केलेल्या विधानावरून आता काँग्रेसने भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीका केली आहे. स्थलांतरित लोक चीन, भारत किंवा या पृथ्वीवरील इतर कोणत्याही नरकसदृश ठिकाणांहून अमेरिकेत येतात; इथे मुले जन्माला घालतात, जी अमेरिकेचे नागरिक होतात, त्यानंतर ते चीन किंवा भारतातून आपल्या संपूर्ण कुटुंबाला येथे बोलावून घेतात. हे पाहण्यासाठी तुम्हाला फार दूर जाण्याची गरज नाही. आता येथे इंग्रजी भाषा बोलली जात नाही. आजच्या (पान २ वर)

## सिलीगुडीमध्ये भाजप-टीएमसी कार्यकर्ते भिडले

# पश्चिम बंगालमध्ये मतदानादरम्यान हिंसाचार




## ■ भाजप उमेदवार सुवेंदु सरकार यांना मारहाण ■ भाजप उमेदवाराच्या गाडीवर हल्ला

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**पश्चिम बंगालमध्ये पहिल्या टप्प्यातील मतदानादरम्यान अनेक विधानसभा जागांवर भाजप-टीएमसी कार्यकर्त्यांमध्ये हिंसाचार आणि मारामारी झाली. मुर्शिदाबाद जिल्ह्यात आम जनता उन्नयन पार्टी (AJUP) चे प्रमुख हुमायूं कबीर आणि टीएमसी कार्यकर्त्यांमध्ये झटापट झाली. तर कुमारगंज मतदारसंघातून भाजप उमेदवार सुवेंदु सरकार यांना मारहाण झाली. आसनसोल मतदारसंघातून भाजप उमेदवार अग्निमित्रा पॉल यांच्या गाडीवरही हल्ला झाला.

**भाजप उमेदवार सुवेंदु सरकार यांना मारहाण**- पश्चिम बंगालमधील दक्षिण मिदनापूरमधील कुमारगंज मतदारसंघातून भाजप उमेदवार सुवेंदु सरकार यांच्यावर हल्ला झाला आहे. व्हिडिओमध्ये दिसत आहे की सुवेंदु हल्ल्यापासून वाचण्यासाठी पळत आहेत. त्यांचा सुरक्षा रक्षक त्यांच्यासोबत आहे. तरीही जमावाने सुवेंदु यांना मारहाण केली. मिळालेल्या माहितीनुसार, निवडणूक आयोगाने व्हिडिओमध्ये दिसणा-या सर्व लोकांच्या तात्काळ अटकेचे आदेश दिले आहेत. आसनसोल दक्षिण विधानसभा मतदारसंघातून भाजप आमदार आणि उमेदवार अग्निमित्रा पॉल यांच्या गाडीवर बर्नपूरच्या रहमतनगर परिसरात हल्ला झाला. यामुळे त्यांच्या गाडीची मागील काच फुटली. घटनेच्या वेळी आमदार गाडीतच उपस्थित होत्या.

# बस दरीत कोसळून 8 जणांचा मृत्यू

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**उत्तराखंडमधील चंबा-कोटी रोडवर एक भीषण अपघात झाला आहे. या अपघातात ८ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर येत आहे. घटनास्थळी मदत आणि बचावकार्य वेगाने सुरू आहे. या घटनेत अनेक जण गंभीर जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. मिळालेल्या माहितीनुसार, गुरुवारी दुपारी नैलजवळ बस दरीत कोसळल्याने हा अपघात झाला. अपघाताची माहिती मिळताच चंबा पोलीस ठाण्याचे पथक घटनास्थळी दाखल झालं आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हा अपघात गुरुवारी दुपारी घडला असून सध्या या प्रकरणाचा तपास सुरू आहे. प्राथमिक तपासात समोर आलं आहे की, अपघातग्रस्त वाहनातून एकूण १० जण प्रवास करत होते. मृतांची ओळख पटवण्याचं काम सुरू आहे.

# नवीन गॅस कनेक्शनला अंशतः स्थगिती

## युद्धामुळे पुरवठा विस्कळीत; कंपनी व मंत्रालयाकडून माहिती जारी

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** जेव्हापासून मध्य पूर्व आशियात युद्धाचा भडका उडला आहे तेव्हापासून भारतात एलपीजी गॅसचा पुरवठ्याबाबत प्रश्न निर्माण होत आहेत. आता गॅस सिलिंडर बुकिंगसाठी २५ दिवसांची वाट पहावी लागत आहे. ग्रामीण भागात तर हा प्रतीक्षेचा काळ ४५ दिवसांवर पोहचला आहे. दरम्यान बीपीसीएल या कंपनीने सांगितले की भूराजकीय परिस्थिती पाहता नवीन एलपीजी गॅस कनेक्शन देणे काही काळासाठी बंद केलेले आहे. सध्या वितरक हे गॅस रिफ्युअलिंगवरच जास्त भर देत आहेत. जी काही असुविधा होत आहे त्याची कारणे आमच्या नियंत्रणाबाहेरची आहेत.एका ग्राहकाने ट्विटर त्याला नवीन एलपीजी गॅस कनेक्शन मिळत नसल्याबाबत तक्रार केली होती. त्यावर आता सरकारी कंपनी भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशनने आपल्या अधिकृत अकाउंटवरून ट्विट करून प्रत्युत्तर




दिले. त्यात बीपीसीएल म्हणते की भूराजकीय परिस्थिती पाहता नवीन एलपीजी गॅस कनेक्शन देणे काही काळसाठी बंद केलेले आहे. सध्या वितरक हे गॅस रिफ्युअलिंगवरच जास्त भर देत आहेत. जी काही असुविधा होत आहे त्याची कारणे आमच्या नियंत्रणाबाहेरची आहेत. तणावपूर्ण भूराजकीय परिस्थिती कायम राहिल्यानं गॅसच्या पुरवठ्यावर परिणाम होत आहे. अशा परिस्थितीत बुधवारी पेट्रोलियम मंत्रालयाने सांगितलं की, घरगुती वापरासाठीच्या एलपीजीच्या पुरवठ्याला प्राधान्य दिलं जात आहे. सध्याच्या घडीला तरी एलपीजी वितरकांकडील साठा संपुष्टात येत आहे अशी कोणतीही माहिती समोर आलेली नाही. दरम्यान, पेट्रोलियम मंत्रालय, इंडियन ऑईल कार्पोरेशन लिमिटेड, बीपीसीएल आणि हिंदूस्तान पेट्रोलियम कार्पोरेशन यांना विचारण्यात आलेल्या प्रश्नावर उत्तर मिळालेले नाही.ऑल इंडिया एलपीजी डिस्ट्रिब्युशन फडरेशनचे उत्तर प्रदेश सर्कलचे अध्यक्ष जगदीश राय यांनी सांगितलं की नोंदणीदेखील सध्या स्थगित करण्यात आलेली आहे. मात्र काही केसमध्ये जसे की एचपीसीएलच्या केसमध्ये नोंदणी पुन्हा सुरू झाली आहे.

# महिला आरक्षणावर भाजपाची दुटप्पी भूमिका

## विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवारांचा हल्लाबोल



**अमरावती/प्रतिनिधीः-** लोकसभेमध्ये मागील आठवड्यात महिला आरक्षण आणि परिसिमन बिलावर भाजपाच्या भूमिकेमध्ये खोटं असल्यामुळे बहुमत मिळालं नाही. भाजपा हा महिलांच्याबाबत दुटप्पी भूमिका राखणारा पक्ष आहे. केवळ आपल्या फायद्याकरिता महिलांच्या आडून राजकारण करण्याचा दूषित प्रकार भाजपा आणि मोदी सरकार करत असल्याचा गंभीर आरोप, महाराष्ट्र विधानसभेचे विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांनी आज गुरुवार २३ एप्रिल रोजी अमरावतीत पत्रकार परिषदेच्या माध्यमातून केला. वडेट्टीवार म्हणाले की, '२०२३ मध्ये १०६ वी घटनादुरुस्ती करून ३३ टक्के महिला आरक्षण मंजूर झाले होते. मात्र, ते प्रत्यक्षात लागू करण्याबाबत सरकार गंभीर नाही. काँग्रेसने यापूर्वीच मागणी केली होती की, हे आरक्षण त्वरित लागू करावं. परंतु सरकारने केवळ राजकीय फायद्यासाठी विलंब केला.'

सरकार नारी शक्ती वंदन या नावानं विधेयक सादर केल्याचा उल्लेख करत वडेट्टीवार म्हणाले की, मूळ विधेयकात अशा शब्दाचा उल्लेख नव्हता. हा शब्द म्हणजे केवळ प्रचारासाठी वापरला असून महिलांच्या हक्काशी त्याचा प्रत्यक्ष संबंध नाही. महिला आरक्षण लागू करण्याऐवजी सरकारने परिसिमनाच्या नावाखाली मतदारसंघाची फेररचना करण्याचा प्रयत्न केला. २०११ च्या जनगणनेच्याआधारे हे काम केल्याचा उल्लेख करत विजय वडेट्टीवार यांनी नव्या जनगणनेशिवाय अशी प्रक्रिया योग्य नाही असं देखील स्पष्ट केलं. पाच राज्यामध्ये निवडणूक होत असताना असं विशेष अधिवेशन घेण्याची गरज नव्हती. या विशेष अधिवेशनात महिला आरक्षण विधेयक पारित झालं असतं तर या सरकारला आयोगाची रचना करण्यासोबतच त्याचा अध्यक्ष नेमण्याचा अधिकार मिळाला असता. तो अधिकार केवळ राष्ट्रपतींना आहे. मात्र स्वतःच्या अधिकारात या सरकारने मनमानी कारभार चालवला असता. महिलांच्या पदराआड लपून भाजपाला लोकशाही संपायची होती, संविधान संपायचं होतं आणि मनमानी कारभार करून सत्तेत कायम राहायचं होतं. मात्र त्यांचा डाव काँग्रेसने हाणून पाडल्यामुळं त्यांची तडफड होत आहे, असं विजय वडेट्टीवार म्हणाले. पत्रकार परिषद मध्ये खासदार बळवंत वानखडे ,माजी आमदार वीरेंद्र जगताप, जिल्हा अध्यक्ष बबलू देशमुख , शहराध्यक्ष बबलू शेखावत, महिला अध्यक्ष जयश्री वानखडे, भैय्या पवार, सुरेश रतावा, अनिकेत ढेंगले, मनोज भेले, नगरसेविका लुबना तन्वीर ,डॉ. अर्चना आत्राम आदि उपस्थित होते.

**भाजपा शासित राज्यामध्ये महिलांवर** (पान २ वर)

### बलात्कारी व्यक्तीला महत्त्व देणारा पक्ष

*न्यायालयानं बलात्कारासारख्या प्रकरणात दोषी ठरवलेल्या आसाराम बापूला अयोध्येत राम मंदिरात विशेष वागणूक देणं ही गंभीर बाब आहे. अशा व्यक्तीला पवित्र स्थळी सन्मानानं फिरवणं ही विकृत मानसिकता असल्याचा आरोप वडेट्टीवार यांनी केलाय.*




# खरातनंतर नाशिकमध्ये आणखी एका भोंदूचे कांड

## विधी करण्याच्या नावाखाली महिलेवर बलात्कार

**नाशिक/प्रतिनिधी :** येथील भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणाने संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. या प्रकरणात रोज नवनवीन हादरवून टाकणारे खुलासे होत आहेत. हे प्रकरण ताजे असतानाच नाशिकमध्ये आणखी एका भोंदूबाबाचे प्रकरण समोर आले आहे. या भोंदूबाबाने महिलेला जाळ्यात अडकवून विधी करण्याच्या नावाखाली तिला लॉजवर नेले. त्याठिकाणी त्याने महिलेवर बलात्कार केला. या घटनेमुळे नाशिकमध्ये खळबळ उडाली आहे. पोलिस सध्या या प्रकरणाचा तपास करत आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, नाशिकच्या लासलगावमध्ये आणखी एका भोंदूविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महिलेचे लैंगिक शोषण केल्याचा त्याच्याविरोधात आरोप आहे. महेश गिरी असे या भोंदूबाबाचे नाव असून त्याच्याविरोधात जादूटोणाविरोधी कायदा आणि बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



नाशिकच्या निफाड तालुक्यातील धरणगाव खडकमध्ये या भोंदूबाबाचा मठ आहे. हा मठ प्रति गाणगापूर मठ म्हणून प्रसिद्ध आहे. भोंदूबाबा महेश गिरीने समस्यांवर तोडगा काढण्याच्या बहाण्याने कुटुंबाला जाळ्यात ओढले. बाधा झाली सांगत पापनाशक कुंडात आंघोळ करण्यास आणि झाडाला फे-या मारण्यास भाग पाडले. त्यानंतर त्याने महिलेला अश्लील मेसेज पाठवण्यास सुरुवात केली. दैवी विधीच्या नावाखाली महिलेला एकांतात नेण्याचा बहाणा करायचा. नाशिक-त्र्यंबक रोडवरील एका लॉजवर नेउन महिलेवर भोंदूने बलात्कार केला. महिलेने या प्रकरणी तक्रार दाखल केली आहे. पीडितेने अंनिस पदाधिका-यांकडे यासंदर्भात तक्रार दाखल केली.




# मशिदीत महिलांच्या प्रवेशावर बंदी नाही

## मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डची सुप्रीम कोर्टात माहिती

**नवी दिल्ली :** महिलांना नमाज पठणासाठी मशिदीत प्रवेश करण्यावर कोणतीही बंदी नाही, असे आज (दि.२३) ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डाने (एआयएमपीएलबी) सर्वोच्च न्यायालयात स्पष्ट केले. ज्येष्ठ वकील एम. आर. शमशाद यांनी एआयएमपीएलबी च्या वतीने ही बाजू मांडली. मशिदींमध्ये महिलांच्या प्रवेशाची मागणी करणा-या रिट याचिका देखील सबरीमला प्रकरणाशी जोडल्या गेल्या आहेत, कारण यामध्ये कलम २५ आणि २६ च्या व्याप्तीशी संबंधित घटनात्मक प्रश्न उपस्थित झाले आहेत. (पान २ वर)



जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# नागरी सेवा दिन आणि राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान'

## सर्वोत्कृष्ट उपक्रमांतर्गत विभागीय आयुक्त कार्यालयास राज्यस्तरीय पुरस्कार

### मुख्यमंत्र्यांच्या हस्ते मुंबईत सत्कार व पुरस्कार वितरण

### अमरावती महापालिकेला 'कूल रुफ' संकल्पनेला राज्यस्तरीय प्रथम पुरस्कार



**अमरावती/प्रतिनिधीः-** राज्य शासनाच्या राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियानात सर्वोत्कृष्ट कल्पना/उपक्रमांतर्गत 'बिंदू नामावली सॉफ्टवेअर' विकसित केल्यासाठी तृतीय पुरस्कार विभागीय आयुक्त कार्यालयातील मागासवर्ग कक्षाच्या सहाय्यक आयुक्त वैशाली पाथरे यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत मुंबई येथे मंगळवारी (ता. २१ एप्रिल) प्रदान करण्यात आला.

नागरी सेवा दिन २०२६ आणि 'राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान व स्पर्धा २०२५-२६' अंतर्गत पारितोषिक वितरण सोहळा २१ एप्रिल रोजी, मुंबई येथील सह्याद्री अतिथीगृह येथे झाला. कौशल्य, रोजगार उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, सामान्य प्रशासन विभागाचे सचिव पंकजकुमार तसेच पुरस्कारार्थी यावेळी उपस्थित होते. श्रीमती पाथरे यांच्यासह मागासवर्ग कक्षाचे सहा.महसूल अधिकारी सुजन सोळंके, दत्तात्रय हातेकर यांनी सदर पुरस्कार स्विकारला.

विभागीय आयुक्त कार्यालयाच्या मागासवर्ग कक्षाव्दारे विकसित करण्यात आलेल्या 'बिंदू नामावली सॉफ्टवेअर' मुळे रोस्टर्स तयार करण्याची प्रक्रिया सुलभ झाली आहे. यामुळे शासकीय कार्यालये, शैक्षणिक संस्थामधील कर्मचाऱ्यांची आरक्षणनिहाय अचूक माहिती तयार होत असून १०० बिंदूनामावली नोंदवही संगणीकृत पध्दतीने संबंधित कार्यालयास उपलब्ध होते. या सॉफ्टवेअरमध्ये कार्यालयाच्या आस्थापनेवर असलेल्या कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती प्रर्वगानुसार सर्व माहिती विहित नमून्यात नोंदविली जाते. तसेच यात नियुक्ती प्रर्वगाचे आदेश, जात वैधता प्रमाणपत्र आदी आवश्यक दस्तावेज अपलोड करण्याची सुविधा दिली असल्यामुळे अचूक डेटा तयार होतो.

प्रत्येक भरती वर्षात बिंदूनामावली अद्ययावत करावयाची असल्यामुळे पुन्हा पुन्हा सर्व कर्मचाऱ्यांची माहिती गोळा करणे व नोंदवहीत लिहून काढण्याची आवश्यकता राहत नाही. बिंदुनामावलीत बिंदूच्या क्रमानुसार १ बिंदू क्रमांक नोंद झाल्यानंतर लगेच दुसरा बिंदू कार्यरत होतो, त्यामुळे बिंदूचा क्रम चुकत नाही. या 'बिंदू नामावली सॉफ्टवेअर' मुळे अमरावती विभागातील सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालये, शैक्षणिक संस्थामध्ये नोकरभरती व पदोन्नती, अनुकंपाची प्रकरणे लवकर मार्गी लागण्यासाठी सुविधा उपलब्ध झाली आहे.

**महापालिकेला राज्यस्तरीय प्रथम पुरस्कार-** महानगरपालिका स्तरावरून थेट प्रस्तावअंतर्गत 'कूल रुफ'करिता तत्कालिन आयुक्त सौम्या शर्मा आणि अमरावती मनपा आयुक्त वर्षा लड्डा यांना प्रथम पुरस्कार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याहस्ते प्रदान करण्यात आला.

शहरातील नागरिकांचे घर, व्यापारी संकुल, छोटे-मोठे व्यवसायांचे गाळे यावर उन्हाळ्यातील तापमान कमी करण्याच्या उद्देशाने कूल रुफ बसाविण्याचा उपक्रम महापालिकाकडून राबविण्यात आला असून यास उत्स्फूर्त प्रतिसादही मिळाला. या उपक्रमांतर्गत घराच्या किंवा दुकानांच्या छतावर तापमान कमी करण्याचे दृष्टीने सोलर यंत्रणा बसविने, उन्हाची तीव्रता कमी करणारे कलर लावणे तसेच मोझॅक स्टाईल्स लावणे आदी बाबींचा समावेश आहे.

# वेलनेस कोच किर्ती रायबोले यांना अमरावती भूषण पुरस्कार प्रदान



**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील अग्रगण्य वेलनेस कोच किर्ती रायबोले यांना लाइफ डेव्हलपमेंट सोसायटी तर्फे 'अमरावती भूषण' पुरस्काराने नुकतेच सन्मानित करण्यात आले.

असे म्हटले जाते की प्रत्येकाच्या यशामागे कोणीतरी प्रेरणा असते, पण या बाबतीत अमरावतीच्या राष्ट्रीय स्तरावर मान्यताप्राप्त अग्रगण्य वेलनेस कोच किर्ती रायबोले एक अपवाद आहेत. आयुष्याच्या सुरुवातीला अत्यंत प्रतिकूल परिस्थितीचा सामना करूनही, त्या खंबीर राहिल्या आणि धैर्याने आव्हानांना सामोरे गेल्या. आपल्या कुटुंबाचा एकमेव आधार असलेल्या आपल्या मुलीला निरोगी वातावरण आणि चांगले शिक्षण देण्यासाठी त्यांनी सतत प्रयत्न केले. कठीण काळात, त्यांनी लहान शाळकरी मुलांना शिकवणी देऊन आपल्या कारकिर्दीची सुरुवात केली, ज्यात शिवणकाम आणि विणकामापासून ते स्वादिष्ट लोणची आणि जॅम बनवण्या पर्यंत सर्व काही बनवून त्यांची मार्केटिंग केली. त्यानंतर त्यांनी महाराष्ट्र उद्योजकता विकास मंडळात विद्यार्थ्यांना विविध औद्योगिक क्षेत्रांमध्ये प्रशिक्षण दिले आणि त्यांना स्वयंरोजगार निर्माण करण्याची संधी उपलब्ध करून दिली. त्याचप्रमाणे, त्यांनी महिला बचत गटांमधील महिलांना व्यावसायिक प्रशिक्षण देण्यास सुरुवात केली. आजकाल लोक आपल्या आरोग्याबाबत अधिकाधिक निष्काळजी होत असल्याचे पाहून, त्यांनी लोकांचे आरोग्य सुधारण्यावर आपले लक्ष केंद्रित केले. आज त्या 'टर्निंग पॉइंट' नावाचे एक भव्य आरोग्य केंद्र यशस्वीपणे चालवतात. राष्ट्रीय स्तरावर प्रशिक्षित 'वेलनेस हेल्थ अँड लाइफ कोच' म्हणूनही कार्यरत आहे. या मूलभूत गुणांच्या आधारावर,किर्ती रायबोले यांना यावर्षी लाइफ डेव्हलपमेंट सोसायटी तर्फे 'अमरावती भूषण' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यांच्या कुटुंबीयांनी आणि मित्रांनी या यशाबद्दल अभिनंदन केले आहे.

# रिलेशनमध्ये राहण्यासाठी अल्पवयीन मुलीला धमकावले

-आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल

**अमरावती/प्रतिनिधीः-** रिलेशनाशिपमध्ये राहण्यासाठी अल्पवयीन मुलीवर दबाव टाकून तिच्या वडिलांना जीवाने ठार मारण्याची धमकी दिल्याची घटना नागपुरी गेट पोलीस ठाणे हद्दीत येणाऱ्या मसानगंज परिसरात समोर आली आहे. या प्रकरणात पोलिसांनी पीडितेच्या तक्रारीवरून आरोपी श्रवण महेंद्र साहू विरुद्ध कलम ७८,७८(अ),३५१(२),३५२(अ), पोक्सो कलम १२ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. माहिती नुसार आरोपी श्रवण साहू ने आपल्या ओळखीच्या व्यक्ती कडून पिडितेचा मोबाईल नंबर घेतला.



त्यानंतर तो पिडितेला नेहमी फोन करू लागला. व्हाट्सॲप वर तिला मेसेज पाठवत होता. रिलेशनशिप मध्ये राहण्यासाठी तिच्यावर दबाव आणत होता. यामुळे पिडिता वैतागली आणि तिने मोबाईल नंबर बदलला. मात्र आरोपी ट्युशनला जात असताना तिचा पाठलाग करू लागला. तिला रस्त्यात थांबवून धमकावत होता. तिच्या वडिलांना ठार मारण्याची धमकी देत होता. त्याने पिडितेच्या वडिलांच्या दुचाकीचे पण नुकसान केले होते. या सर्व प्रकारामुळे त्रस्त झालेल्या पिडितेने त्याच्याविरुद्ध पोलीस ठाण्यात तक्रार दिली. पोलिसांनी तक्रार दाखल करून तपास सुरू केला आहे.

केला जात आहे. प्रशासन, प्रशिक्षक आणि कर्मचारी यांच्या संयुक्त प्रयत्नातून ही मोहीम यशस्वी करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.यावेळी सर्व प्रशिक्षण स्थळांना योगेश पीठे उपायुक्त (१) तथा शहर जनगणना अधिकारी, ऋषिकेश पठारे जनगणना संचालनालय जिल्हा समन्वयक यांनी भेटी देऊन मार्गदर्शन केले

### दोन तरुणांच्या मृत्यूने

आपल्या राहत्या घरी गळफास घेऊन जिवन संपविले. त्यांच्या पश्चात पत्नी, लहान मुलगा-मुलगी आणि वृद्ध आई-वडील असा परिवार असून, कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे.

दुसरीकडे, त्याच दिवशी सायंकाळी गणेश शामराव अघडते (वय ३१) यांचा रस्ते अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला. दर्यापूर येवदा महामार्गावर सांगळुद नजिक त्यांचे वाहन गरम झाल्याने ते खाली उतरून इंजिनमध्ये पाणी टाकत असताना मागून आलेल्या भरधाव टिप्परने त्यांना जोरदार धडक दिली. त्यात ते गंभीर जखमी झाले. जखमी अवस्थेत त्यांना रुग्णालयात नेत असतांना रस्त्यातच अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या मागे आई, वडील मुलें असा आप्त परिवार आहे. एकाच दिवशी दोन कुटुंबांवर आलेल्या या दु:खद प्रसंगाने पिंपळोद गावात शोककळा पसरली आहे. कालपर्यंत हसणारे, बोलणारे हे दोन चेहरे आज कायमचे निघून गेले, दोघेही होतकरू तरुण अचानकपणे गेल्याने गावकरी हळहळ व्यक्त करीत आहेत.

## १ व १० वरिल उर्वरित

### महिला आरक्षणावर भाजपाची

**अत्याचार-** महिलांच्या सुरक्षेच्या प्रश्नावर ठोस उपाय योजना न करता केवळ मतांसाठी भावनिक मुद्दे भाजपाकडून पुढे केले जात आहेत. सरकारी आकडेवारी नुसार भाजपा शासित राज्यात महिलांवरील अत्याचार वाढत आहे असं स्पष्ट दिसतंय, असं देखील वडेट्टीवार म्हणाले.

काँग्रेसची भूमिका स्पष्ट असून महिलांना समान प्रतिनिधित्व मिळावं हा त्यामागचा उद्देश आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिला आरक्षण लागू करण्याचे श्रेय काँग्रेसलाच असल्याचा दावा वडेट्टीवार यांनी केला. महिला आरक्षण विधेयकात ओबीसी आणि इतर मागासवर्गीय महिलांसाठी स्वतंत्र तरतूद नसल्याचा मुद्दा वडेट्टीवार यांनी उपस्थित केला. सरकार सर्व घटकांना न्याय देण्यास अपयशी ठरत असल्याचा आरोप देखील त्यांनी केला. खरंतर भाजपा महिला विरोधी धोरण राबवत आहे. महिलांना खऱ्या अर्थानं न्याय देण्याची इच्छा सरकारमध्ये नाही. मनुवादी विचारसरणी असणारे महिलांच्या हक्काचा विचारच करू शकत नाही अशी टीका करत हा संपूर्ण विषय केवळ काँग्रेसला बदनाम करण्यासाठी वापरला जात असल्याचा आरोप विजय वडेट्टीवार यांनी केला.

### भारताला 'नरक' म्हणणे

काळात येथे येणा-या स्थलांतरितांच्या वर्गामध्ये या देशाप्रती निष्ठा जवळजवळ उरलेलीच नाही आणि पूर्वी मात्र परिस्थिती अशी नव्हती, असे सांगत डोनाल्ड ट्रम्प यांनी, जन्मसिद्ध नागरिकत्व या मुद्यावर सुरू असलेल्या एका व्यापक चर्चेचा संदर्भ दिला.

**५६ इंचाची छातीचे काय?** काँग्रेस आमदार विजय वडेट्टीवार यांनीही याबाबत एक्सवर पोस्ट करून केंद्र सरकारवर टीका केली आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताचा उल्लेख नरक असा करणे हा १४० कोटी भारतीयांचा अपमान आहे, पण दुर्दैव असे की, स्वतःला विश्वागुरू म्हणवणारे पंतप्रधान मोदी या अपमानावर गप्प आहेत. आपल्या देशाचा स्वाभिमान विकून ही कोणती मैत्री ते जपत आहेत? ट्रम्प यांच्यासमोर पंतप्रधान मोदींची ५६ इंच छाती आणि तिची ताकद कुठे जाते? भारत देश एका कमकुवत नेतृत्वामुळे अपमान सहन करत आहे. अमेरिकेचे अध्यक्ष सातत्याने भारताचा अपमान करतात आणि भारत शांतपणे ऐकून घेतो? साधा आक्षेप घेतला जात नाही, निषेध नोंदवला जात नाही..परदेशात जाउन मिठ्या मारल्याने देश मोठा होत नाही, देशाचा सन्मान जपण्यासाठी ताठ कणा लागतो!, या शब्दांत वडेट्टीवार यांनी निशाणा साधला.

### मशिदीत महिलांच्या प्रवेशावर

याचिकांना उत्तर देताना शमशाद म्हणाले की, दर्ग्यांमध्ये गर्भगृह असले तरी, मशिदीमध्ये अशी कोणतीही संकल्पना नाही. मशिदीत गर्भगृह नसेल, तर कोणीही ठराविक ठिकाणी उभे राहण्याचा किंवा नमाजचे नेतृत्व (इमाम होण्याचा) आग्रह धरू शकत नाही. यावेळी सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी विचारले की, स्पष्टतेसाठी सांगा, महिलांना मशिदीत प्रवेशाची परवानगी आहे का? शमशाद यांनी उत्तर दिले की, इस्लामच्या सर्व पंथांमध्ये महिलांच्या मशीद प्रवेशावर बंदी नसल्याबाबत एकमत आहे. मात्र, नमाजच्या सामूहिक प्रार्थनेत महिलांनी सहभागी होणे अनिवार्यनाही, यावरही एकमत आहे. सांगितले होते की महिलांना मशिदीत येण्यापासून रोखू नका. अनेक हदीसमध्ये याचे स्पष्ट उल्लेख आहेत.शमशाद यांनी स्पष्ट केले की, पुरुषांसाठी सामूहिक प्रार्थनेत सहभागी होणे बंधनकारक आहे, तर महिलांसाठी तसे नाही. महिलांनी घरीच नमाज पठण करणे श्रेयस्कर मानले जाते; परंतु एखाद्या महिलेला मशिदीत यायचे असेल, तर ती येउ शकते.

### कोणार्कला मिळणार नाही तीन

आणि दुर्गंधीमुळे परेशान झाले आहे. त्यांच्या आरोग्यावर याचे परिणाम होत आहे. कंत्राटदाराने प्रभागामध्ये अपेक्षेपेक्षा कमी कर्मचारी लावले आहे. आवश्यक वाहन व यंत्रसामग्री उपलब्ध नाही आहे. प्रत्येक प्रभागात ५४ कर्मचारी आवश्यक आहे पण त्यांनी त्यापेक्षा कमी कर्मचारी लावले आहे. कचरा घेऊन जाण्यासाठी १२ लहान आणि मोठे वाहन आवश्यक आहे, पण त्यापेक्षा कमी वाहन शहरात आहे. या मुळे शहरातील स्वच्छतेवर परिणाम होत आहे. यामुळे महापौर तेजवानी यांनी तीन महिन्याचे मानधन न देण्याचे घोषित केले. सभेमध्ये डॉ.अजय जाधव यांच्या राजीनामाची मागणी पण करण्यात आली.

**स्वच्छता कर्मचाऱ्यांचा निष्काळजीपणा-** आमसभेमध्ये स्वच्छता कर्मचाऱ्यांचा निष्काळजीपणाचा मुद्दा ही गाजला. कोणार्क कंपनीचे वतीने कामामध्ये हलगर्जीपणा दाखवला जात आहे. स्वच्छता कर्मचारी सकाळी सात ते नऊ या वेळेत कामावर येतात आणि रस्त्याच्या किनाऱ्यावर झाडू लावून परत चालले जातात. नाल्यांच्या साफसफाईकडे कोणतेही लक्ष नाही आहे. अनेक क्षेत्रांमध्ये नाल्या भरलेले आहे. कचऱ्याचे ढिगारे पाहायला मिळत आहे. आमसभेत प्रत्येक प्रभागात स्वच्छता कार्यालय आणि तक्रार निवारण केंद्र सुरू करण्याची मागणी करण्यात आली. या व्यतिरिक्त प्रभाग निहाय नगरसेवक, स्वच्छता निरीक्षक व स्वच्छता कर्मचाऱ्यांचा एक व्हाट्सअप ग्रुप बनविण्यात यावा. यासाठी सिस्टीम स्मॅनेजर अमित डेंगरे यांना आवश्यक दिशा निर्देश देण्यात आले.

### खारतळेगांवजवळ कार पलटल्याने

होऊन पलटी झाल्याने अमोल तराळ गंभीर जखमी झाले. तिथे उपस्थित नागरिकांनी त्यांना जखमी अवस्थेत जवळच्या रुग्णालयात दाखल केले. प्रकृती गंभीर असल्यामुळे उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. घटने नंतर पोलिसांनी पंचनामा केला. तराळ यांच्या मृदुभाषी स्वभावामुळे ते सर्वांचे परिचित होते. प्रत्येक सामाजिक कार्यात ते सक्रिय राहत होते. त्यांच्या अकस्मात मृत्यूमुळे दर्यापूर मध्ये शोक व्याप्त आहे. घटनेची माहिती मिळताच त्यांचे मित्र, व्यापारी आणि हितचिंतन रुग्णालय आणि त्यांच्या निवासस्थानी पोहोचले. या घटनेमुळे कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. परिसरातील काही व्यापाऱ्यांनी आपली दुकाने दुपार पर्यंत बंद ठेवून शोक संवेदना व्यक्त केली.

घटनेची माहिती मिळाल्यानंतर खासदार बळवंत वानखडे घटनास्थळी पोहोचले. त्यांनी संपूर्ण परिसराचे निरीक्षण केले आणि पोलीस अधिकाऱ्यांशी याबाबत चर्चा केली.

### गुलिस्ता नगरात बंद घरात

घरून परत आले तर त्यांना घरातील कुलूप कोंडा तुटलेला दिसला. त्यांनी आत मध्ये जाऊन पाहिले तर अलमारी मध्ये ठेवलेले दीड लाख रुपये गायब होते. त्यांनी याची तक्रार नागपुरी गेट पोलीस ठाण्यात दिली. तक्रारीची दखल घेत नागपुरी गेटचे ठाणेदार हनुमंत उरलागोंडावार यांनी घटनास्थळाचा पंचनामा केला आणि तपास सुरू केला.

### ऊर्जा क्षेत्रात 'इतिहासावर'

फिरता चषक व संबंधित अधिकाऱ्यांना प्रशस्तिपत्र प्रदान करण्यात आले. यामध्ये अमरावती जिल्ह्यातील ९ कार्यालयांनी तर यवतमाळ जिल्ह्यातील ५ कार्यालयांनी बाजी मारली. वेळेत नवीन वीजजोडणी, चालू वीजबिलासह थकबाकी वसुली, बिलिंग कार्यक्षमता, वीज चोरीला लगाम, वितरण हानी कमी करणे, स्मार्ट मीटरिंग आणि सौर प्रकल्पांची प्रभावी अंमलबजावणी आदी निकषांच्या आधारे अमरावती परिमंडलामध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या यवतमाळ मंडळाला दोन, अमरावती मंडळास एक तसेच तीन विभाग, चार उपविभाग व ४ शाखा कार्यालयांची निवड करण्यात आली.

यावेळी संचालक राजेंद्र पवार यांनी राज्याच्या ऊर्जा क्षेत्रातील बदलांवर प्रकाश टाकला. ते म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून महावितरणच्या कार्यपद्धतीत सकारात्मक आणि क्रांतिकारी बदल घडले आहेत. या बदलांमुळे संस्था आर्थिकदृष्ट्या सक्षम होत आहे. तसेच ग्राहकांना जागतिक दर्जाची सेवा देणे शक्य होत आहे. 'मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.०' ही योजना खऱ्या अर्थाने गेम चेंजर ठरली आहे. या योजनेसह मागेल त्याला सौर कृषिपंप योजनेद्वारे राज्यातील सुमारे २३ लाख शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळत आहे. तसेच 'प्रधानमंत्री सूर्यघर' योजनेत महाराष्ट्राने ५.४२ लाख घरांवर सौर प्रकल्प कार्यान्वित केल्याचे पवार यांनी सांगितले.

मुख्य अभियंता अशोक साळुंके यांनी अमरावती परिमंडळाच्या यशाचे विश्लेषण केले. यावेळी मुख्य अभियंता राजेश नाईक यांनीही कर्मचाऱ्यांनी कामात सचोटी, चिकाटी आणि सातत्य जोपासण्याचे आवाहन केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहाय्यक महाव्यवस्थापक रूपेश देशमुख यांनी केले तर पुरस्कारांचे वाचन वरिष्ठ व्यवस्थापक शिरीष शहा यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विकास बांबल व आद्यश्री कांबे यांनी केले. तर उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी मधुसूदन मराठे यांनी आभार मानले.

**अमरावती परिमंडळातील सर्वोत्तम पुरस्कार प्राप्त कार्यालय- परिमंडळातील सर्वोत्तम कामासाठी पुरस्कार प्राप्त कार्यालय**

**अमरावती जिल्हा- अमरावती मंडळ कार्यालय** :- उच्चदाब व घरगुती, वाणिज्यिक आणि औद्योगिक ग्राहकांकडून वर्षभरात एकत्रित केलेली महत्तम वीज बिल वसूली.

अचलपूर विभाग :- शासकीय कार्यालयाकडून महत्तम वीजबिल वसूलीसाठी

अमरावती ग्रामिण विभागः- निरूपयोगी साहित्याचा सामुहिक लिलाव करून महत्तम महसूल मिळविण्यासाठी.

अमरावती ग्रामिण उपविभाग :- महत्तम एकत्रित वीजबिल वसूली

वरूड २ उपविभाग :- नॉर्मल बिलींग कार्यक्षमता

अमरावती -३ उविभाग :- महत्तम रूफ टॉप सोलर स्थापन करण्यासाठी

मोर्शी उपविभाग :- तात्पूरता आणि कायम स्वरूपी वीज पुरवठा खंडित ग्राहकांकडून महत्तम वीजबिल वसूली

शेंदरजना घाट शाखा कार्यालय :- शुन्य थकबाकी

अंजनगाव बारी शाखा कार्यालय :- सर्वोत्तम स्मार्ट मीटर लावण्यासाठी

**यवतमाळ जिल्हा-** यवतमाळ मंडळ :- अपारंपरिक सौर ऊर्जा स्थापनेसाठी

यवतमाळ मंडळ :- महावितरणच्या माणकानुसार वेळेत उच्चदाब वीज जोडणी देण्यासाठी

दारव्हा विभाग:- वितरण हानीत सुधारणा करण्यासाठी

यवतमाळ (एफसीसी-६)शाखा कार्यालय :- वीज चोरी प्रकरणात महत्तम वसूली करण्यासाठी

आर्णी ग्रामीण शाखा कार्यालय:- महावितरणच्या माणकाप्रमाणे सर्वात जास्त नविन वीज जोडणी देण्यासाठी

### पट्ट्याने मारहाण, ट्रिमरने

होती. दुसऱ्याच दिवशी, १६ एप्रिल रोजी, तक्रार दाखल करण्यात आली. पुढे तिला बाल कल्याण समितीसमोर सादर करण्यात आले असता, तिने कोणत्याही दबावाशिवाय घडलेली संपूर्ण घटना स्पष्टपणे मांडली. पीडितेच्या सुरक्षिततेस प्राधान्य देत तिची तात्पुरती व्यवस्था शासकीय मुलींच्या वसतिगृहात करण्यात आली आहे. बाल कल्याण समिती आणि महिला व बाल विकास विभागाच्या अहवालांच्या आधारे वरुड पोलिसांनी दोन्ही आरोपींविरुद्ध विविध गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सुरू असून, संबंधित आरोपींवर कडक कारवाई होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### अमरावतीत जनगणना २०२७

स्कूल येथेही प्रशिक्षण कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. सर्व केंद्रांवर संबंधित अधिकारी, प्रशिक्षक आणि गणक-पर्यवेक्षक उपस्थित होते. या प्रशिक्षण कार्यक्रमाचा मुख्य उद्देश जनगणना प्रक्रियेला अधिक अचूक, पारदर्शक आणि प्रभावी बनवणे हा आहे. यामध्ये सहभागी होणाऱ्या गणक व पर्यवेक्षकांना घरगुती सर्वेक्षणाची पद्धत, लोकसंख्येची अचूक माहिती गोळा करण्याचे तंत्र, डिजिटल उपकरणांचा वापर, माहिती नोंदवही व्यवस्थापन, तसेच नागरिकांशी सुसंवाद साधण्याचे कौशल्य याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात येणार आहे.विशेषतः या वेळच्या जनगणनेत डिजिटल माध्यमांचा अधिक वापर अपेक्षित असल्याने मोबाईल ॲप्लिकेशन, ऑनलाइन डेटा एंट्री, आणि तांत्रिक अडचणी हाताळण्याबाबतही सखोल प्रशिक्षण दिले जाणार आहे. तसेच माहिती संकलन करताना गोपनीयता राखणे, अचूकता टिकवणे आणि कोणत्याही प्रकारच्या त्रुटी टाळणे यावर प्रशिक्षकांकडून विशेष भर दिला जात आहे. महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले की, जनगणना ही देशाच्या नियोजन प्रक्रियेसाठी अत्यंत महत्त्वाची असते. यामधून मिळणाऱ्या आकडेवारीच्या आधारे विविध शासकीय योजना, पायाभूत सुविधा विकास, शिक्षण, आरोग्य, रोजगार आदी क्षेत्रांमध्ये धोरणे आखली जातात. त्यामुळे ही प्रक्रिया काटेकोरपणे आणि जबाबदारीने पार पाडणे अत्यावश्यक आहे. प्रशिक्षणादरम्यान विविध प्रात्यक्षिके, गटचर्चा, प्रश्नोत्तर सत्रे आणि प्रत्यक्ष सराव यांचा समावेश करण्यात आला आहे. यामुळे गणक व पर्यवेक्षकांना प्रत्यक्ष काम करताना येणाऱ्या अडचणींवर मात करण्यास मदत होणार आहे. प्रत्येक झोनमध्ये प्रशिक्षणाचे वेळापत्रक ठरविण्यात आले असून, सर्व संबंधित कर्मचाऱ्यांनी नियोजित वेळेत उपस्थित राहण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. या उपक्रमामुळे अमरावती शहरातील जनगणना प्रक्रिया अधिक सुकर, वेगवान आणि विश्वासार्ह होईल, असा विश्वास व्यक्त

### महाराष्ट्र वैद्यकीय परिषद निवडणूकः

राजपत्रानुसार ही निवडणूक होत आहे. अमरावती जिल्ह्यातील मतदानासाठी श्रीकृष्ण पेठ येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (जिल्हा स्त्री सामान्य रुग्णालय परिसर) येथे व्यवस्था करण्यात आली आहे. यामध्ये फिजीऑलॉजी प्रॅक्टिकल हॉल क्रमांक १ आणि २ मध्ये प्रत्येकी दोन याप्रमाणे एकूण ४ मतदान केंद्रे असतील. केंद्र क्रमांक १ मध्ये १ ते ६४४, केंद्र क्रमांक २ मध्ये ६४५ ते १२८२, केंद्र क्रमांक ३ मध्ये १२८३ ते १९२५ आणि केंद्र क्रमांक ४ मध्ये १९२६ ते २५६५ या अनुक्रमांकाचे मतदार आपले मतदान करू शकतील.

निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी ५ मतदान पथके नियुक्त करण्यात आली असून, यामध्ये एकूण २५ कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. या कर्मचाऱ्यांचे पहिले प्रशिक्षण पार पडले असून द्वितीय प्रशिक्षण २५ एप्रिल रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात होणार आहे. हे कर्मचारी २५ एप्रिल रोजी सकाळी ११:३० वाजता निवडणूक साहित्यासह केंद्रांकडे रवाना होतील. २६ एप्रिल रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ५ या वेळेत मतदान होईल. प्रत्येक मतदाराला एकूण ९ मते देण्याचा अधिकार देण्यात आला आहे.

मतदानासाठी ओळख पटविण्यासाठी महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेचे नोंदणी प्रमाणपत्र किंवा ओळखपत्र सादर करणे अनिवार्य आहे. याव्यतिरिक्त आधार कार्ड, पॅन कार्ड, वाहन चालक परवाना, पासपोर्ट किंवा निवडणूक आयोगाने मान्यता दिलेली इतर छायाचित्रित ओळखपत्रेही ग्राह्य धरली जातील. विवाहित महिला मतदारांच्या नावामध्ये बदल असल्यास त्यांनी नाव बदलल्याचा पुरावा सोबत ठेवणे आवश्यक आहे. मतदारांना सुलभतेसाठी प्रशासनाने क्यूआर कोडची सुविधा उपलब्ध करून दिली असून, तो स्कॅन करून मतदारांना मतदार यादीतील आपला अनुक्रमांक शोधता येणार आहे. तरी जिल्ह्यातील सर्व डॉक्टरांनी या निवडणूक प्रक्रियेत सहभागी व्हावे, असे प्रशासनातर्फे कळविण्यात आले आहे.

### नगरसेवकांमधील आपसातील

दिल्याची माहिती समोर येत आहे. यामुळे १ कोटी रुपयांच्या निधीतून शहरात उभारण्यात येणाऱ्या आणि नागरिकांच्या स्वप्नांवर पाणी फेरले. वास्तविक हे उद्यान शहरातील मुले, वृद्ध आणि महिलांसाठी एक चांगला पर्याय ठरू शकले असते. ज्यामध्ये महाराष्ट्र प्रशासनाने सर्व महत्त्वाच्या सुविधांची काळजी घेतली होती. परंतु नगरसेवकांमधील आपापसातील वादामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे दिसते. शहर विकासाच्या कामांमध्ये सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्षाने आपले मतभेद बाजूला ठेवून शहर विकासावर लक्ष केंद्रित करावे, अशी चर्चा शहरवासीयांमध्ये सुरू आहे. जेणेकरून शहर विकासात पुढे जाईल. परंतु येथे नगरसेवक स्वतःच्या स्वार्थाकडे लक्ष देत आहेत, ज्यामुळे नमो उद्यानासाठीचा निधी काढून घेण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे तर नमो गार्डनला पुढील आदेश मिळेपर्यंत स्थगिती दिल्याची चर्चा शहरातील नागरीक करीत आहेत. विकास कामांवर एकंदरीत भाजपा नगरसेवकांनी प्रश्न चिन्ह निर्माण केले आहे.शहरात नमो गार्डन होणार की नाही या विषयावर जनतेत चर्चेला उधाण आले आहे.

### अल्पवयीन मुलीवर अत्याचाराचा

पळ काढला.मुलीच्या तक्रारीवरून पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस करीत आहे.

### वृद्धाकडून अल्पवयीन मुलीचा विनयभंग

लागल्याने पाणी पिण्यासाठी घराच्या आत गेली असता, तिथे कोणीही नसल्याची संधी साधून नराधम आरोपीने तिच्याशी अश्लील कृत्य करून विनयभंग केला. या प्रकारामुळे प्रचंड घाबरलेल्या मुलीने तात्काळ धावत जाऊन आईला घडलेला सर्व प्रकार सांगितला. जेव्हा पीडितेच्या आईने आरोपीला जाब विचारला, तेव्हा त्याने पश्चात्ताप व्यक्त करण्याऐवजी उलट पीडितेच्या कुटुंबालाच धमकावले. जर कोणाला काही सांगितले तर जीवे मारीन, अशी धमकी त्याने दिली. आरोपीच्या धमकीला न घाबरता पीडितेच्या आईने वरुड पोलिस ठाणे गाठून तक्रार दिली. पोलिसांनी या तक्रारीची गंभीर दखल घेत ६० वर्षीय आरोपीविरोधात बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्याच्या (पॉक्सो) विविध कलमांखाली गुन्हा नोंदवला आहे.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १४७ ■ शुक्रवार, २४ एप्रिल २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


## काँग्रेसचा 'उदय' की मनोजचा डाव:जिल्ह्यात नेतृत्वावरून रणधुमाळी

### -गटागटातील संघर्षामुळे पक्षाची एकजूट धोक्यात : अर्ज नाही तरी पसंती

**वर्धा जनमाध्यम :** जिल्हाध्यक्ष निवडीच्या निमित्ताने काँग्रेसला नवसंजीवनी मिळेल, अशी अपेक्षा होती. मात्र प्रत्यक्षात चित्र उलटच दिसत असून अर्ज नाही तरी पसंती या विचित्र प्रकाराने पक्षाचा अंतर्गत कारभार पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे. एकीकडे नेतृत्वासाठी चढाओढ आणि दुसरीकडे गटबाजीचा विळखा या सगळ्यात काँग्रेसची अवस्था घरात भांडण, बाहेर शांतता अशी झाल्याची टीका राजकीय वर्तुळात होत आहे.

जिल्हाध्यक्षपदाच्या शर्यतीत मनोज चांदुरकर, उदय मेघे आणि सुनील कोल्हे ही तीन प्रमुख नावे पुढे असली तरी, खरी लढाई मात्र अंतर्गत गटांमध्येच रंगलेली आहे. या निवड प्रक्रियेत शेखर शेंडे, हेमलता मेघे, मनोज वसु, अनंता मोहोड, प्रवीण हिवरे, शैलेश अग्रवाल, चंद्रशेखर झोरे, धर्मपाल ताकसांडे, अशोक दौड, प्रशांत ठाकरे यांच्यासह बाळा माऊस्कर आणि नंदकुमार कांबळे यांचीही चर्चा आहे. विशेष म्हणजे, यातील काहींनी अर्ज न भरताही त्यांना पसंती दर्शवली गेल्याने ही निवडणूक आहे की कार्यकर्त्यांचा गोंधळ असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

दरम्यान, काँग्रेसचे माजी आमदार रणजीत कांबळे यांचा जिल्ह्यातील प्रभाव अजूनही निर्णायक मानला जात आहे. त्यांनी सुनील कोल्हे यांचे नाव पुढे केल्याने समीकरणे बदलण्याची शक्यता निर्माण झाली आहे. मात्र कार्यकर्त्यांमध्ये यावर तीव्र नाराजी आहे. प्रभारी जिल्हाध्यक्ष असताना कोल्हे यांचे कार्य शुन्य तरीही पुन्हा त्यांचेच नाव पुढे का असा प्रश्न काँग्रेसच्या तळागाळातून विचारला जात आहे.



दुसरीकडे, मनोज चांदुरकर यांच्याबाबतही असंतोष लपलेला नाही. शेती व्यवसायाच्या पुढे जाऊन त्यांनी पक्ष मजबूत करण्यासाठी काय केले असा प्रश्न कार्यकर्ते खुलेपणाने विचारत आहेत. त्यामुळे दोन्ही प्रमुख दावेदारांभोवती समाधानापेक्षा संशयाचे वातावरण अधिक गडद झाले आहे.

याच पार्श्वभूमीवर उदय मेघे हे तिसरे प्रमुख नाव पुढे येत असून ते सध्या आघाडीवर असल्याची चर्चा आहे. माजी जागतिक बँक सल्लागार आणि महात्मा गांधी विचारधारेचे समर्थक श्रीकांत बाराहाते यांचा त्यांना पाठिंबा असल्याने 'उदय मेघे यांच्या गळ्यात अध्यक्षपदाची माळ पडू शकते अशी राजकीय वर्तुळात चर्चा रंगली आहे.

मात्र या सर्व गोंधळात एक मोठा प्रश्न उभा राहतो काँग्रेसमध्ये नेमका निर्णय कोण घेतो आणि कोणाच्या आधारावर ही नावे पुढे येतात काही दावेदार राज्य पातळीवर काम केलेले असताना ही जिल्हाध्यक्षपदासाठी का उत्सुक आहेत, यावरही कार्यकर्त्यांमध्ये चर्चा सुरू आहे. ज्यांनी राज्य पातळीवर काम केले त्यांनी तिथेच नेतृत्व करावे, असा स्पष्ट सूर तळागाळातून उमटत आहे.

सगळ्यात महत्त्वाची बाब म्हणजे काँग्रेस कार्यकर्त्यांची अपेक्षा अगदी साधी आहे, तळागाळात काम करणारा, जनतेत मिसळणारा आणि पक्षाला पुन्हा उभारी देणारा नेता जिल्हाध्यक्ष व्हावा. मात्र सध्याच्या घडामोडी पाहता गटबाजी, नावांची स्पर्धा आणि अंतर्गत कुरघोडी यावरच पक्ष अडकलेला दिसतो. त्यामुळे पक्ष उभा राहणार की अजून खाली जाणार, हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.

वर्षानुवर्षे शेंडे-राव, शेंडे-कांबळे, कांबळे-टोकस अशा गटांत विभागलेली काँग्रेस आजही त्याच चक्रात अडकलेली आहे. प्रत्येक गट स्वतःचे वर्चस्व सिद्ध करण्याच्या नादात पक्षाची एकजूट कमकुवत करत असल्याची टीका होत आहे. नवा जिल्हाध्यक्ष ही गटबाजी मोडणार का, की पुन्हा त्याच संघर्षाला खतपाणी घालणार याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

दरम्यान, सत्ताधाऱ्यांविरोधात रस्त्यावर उतरून लढण्याऐवजी काँग्रेस अजूनही अंतर्गत सत्तासंघर्षात अडकलेली दिसत आहे. त्यामुळे विरोधक आहेत तरी कुठे हा जनतेचा प्रश्न अधिक तीव्र होत आहे. जिल्हाध्यक्षपदाची ही निवडणूक आता केवळ पदासाठीची नसून काँग्रेसच्या अस्तित्वाची खरी कसोटी ठरली आहे. निर्णय काहीही झाला तरी एक गोष्ट स्पष्ट आहे, काँग्रेसला आता नावांचा नव्हे, तर जमिनीवर काम करणाऱ्या नेतृत्वाचा शोध आहे.

## डायल ११२; संकटात धावणारी पोलिसांची 'हेल्पलाइन' ठरली जीवनवाहिनी

### - तीन महिन्यांत ५,८८६ कॉल्सची नोंद; ५,२३१ घटनांवर तत्काळ कारवाई

**वर्धा जनमाध्यम :** संकटाच्या क्षणी नागरिकांच्या मदतीला धावणारी डायल ११२ ही पोलिसांची आपत्कालीन सेवा वर्धा जिल्ह्यात प्रभावी ठरत असून, अवघ्या तीन महिन्यांत या यंत्रणेने हजारो नागरिकांना वेळेवर मदत पोहोचवली आहे. १ जानेवारी २०२६ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत या सेवेला तब्बल ५,८८६ कॉल्स प्राप्त झाले असून, यातील ५,२३१ घटनांवर तात्काळ कार्यवाही करण्यात आली आहे.




आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांना जलद पोलिस मदत मिळावी, या उद्देशाने सुरू करण्यात आलेली ही प्रणाली आता जिल्ह्यात विश्वासार्ह आधार ठरत आहे. कॉल आल्यानंतर संबंधित व्यक्तीचे लोकेशन स्वयंचलितपणे ओळखले जाते आणि जवळील पोलिस पथक तत्काळ घटनास्थळी रवाना केले जाते. त्यामुळे मदतीचा विलंब मोठ्या प्रमाणात कमी झाला आकमी

जिल्ह्यात दारूबंदी असतानाही अवैध दारू निर्मिती, वाहतूक, तस्करी तसेच विविध गुन्हेगारी घटनांचा पोलिसांवर मोठा ताण असतानाही डायल ११२मुळे आपत्कालीन मदत व्यवस्थापन अधिक वेगवान झाले आहे. अनेक प्रसंगी अपघात, कौटुंबिक वाद, चोरी, मारामारी तसेच इतर आपत्कालीन घटनांमध्ये पोलिसांनी तातडीने हस्तक्षेप केला आहे.

**सरासरी ५ मिनिटांत प्रतिसाद**

या प्रणालीअंतर्गत पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, प्रत्येक इव्हेंट हाताळण्यासाठी सरासरी ५ मिनिट ५१ सेकंद इतकाच वेळ लागत आहे. काही प्रकरणांमध्ये ७ मिनिटांच्या आत घटनास्थळी मदत पोहोचवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल आणि अप्पर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली ही सेवा जिल्ह्यात प्रभावीपणे राबवली जात असून, पोलिस यंत्रणा अधिक गतिमान झाली आहे.

**ऑनलाईन प्रणालीमुळे वेग वाढला-** डायल ११२ प्रणालीमध्ये तक्रारदाराचा कॉल प्रथम नवी मुंबई येथील नियंत्रण कक्षात जातो. तेथून प्राथमिक माहिती घेऊन कॉल संबंधित जिल्हा नियंत्रण कक्षाकडे पाठवला जातो. त्यानंतर जवळील पोलिस पथकाला तत्काळ सूचना देण्यात येते. संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन असल्याने प्रतिसादाचा वेग लक्षणीय वाढला आहे.

**लोकेशन ट्रॅकिंगमुळे मोठा दिलासा**

पूर्वी १०० क्रमांकावर कॉल केल्यास अचूक लोकेशन मिळण्यात अडचणी येत होत्या. मात्र डायल ११२ प्रणालीमुळे आता कॉल येताच तक्रारदाराचे लोकेशन स्वयंचलितपणे समजते. त्यामुळे घटनास्थळी पोहोचण्यास होणारा विलंब जवळपास संपुष्टात आला आहे.

**३ महिन्यातील आकडे**

५,८८६ : एकूण कॉल्स

५,२३१ : हाताळलेल्या घटना

५ मिनिट ५१ सेकंद : सरासरी प्रतिसाद वेळ,एकूणच, डायल ११२ ही सेवा आता वर्धा जिल्ह्यातील नागरिकांसाठी संकटसमयीचा सर्वात मोठा आधार बनत असून, पोलिस यंत्रणेच्या कार्यक्षमतेचे नवे प्रतीक ठरत आहे.

## भूमिका चौबेचा नगराध्यक्षांच्या हस्ते गौरव



**वर्धा जनमाध्यम :** बजाज विज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थिनी भूमिका चौबे हिने राष्ट्रीय स्तरावरील आंतरविद्यापीठीय वक्तृत्व स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावत उल्लेखनीय यश मिळवले. तिच्या या कामगिरीबद्दल वर्धा शहराचे नगराध्यक्ष सुधीरभाऊ पांगुळ यांच्या हस्ते तिचा सत्कार करण्यात आला. ॲड. अजित धोटे यांच्या पुढाकाराने आयोजित या कार्यक्रमात भूमिकाला रोख पाच हजार रुपये व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. यावेळी तिचे मार्गदर्शक प्रा. राजेश डंभारे यांचीही उपस्थिती होती. विद्यार्थीदशेत आत्मसात केलेल्या कला व्यक्तिमत्व विकासासाठी महत्त्वाच्या ठरतात. त्यात वक्तृत्व कलेचे विशेष स्थान आहे. भूमिकाने सातत्य, मेहनत आणि शिकण्याची जिद्द यांच्या बळावर अल्पावधीतच या क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात तिने अनेक वक्तृत्व स्पर्धांमध्ये यश संपादन केले आहे.

यावेळी नगराध्यक्ष सुधीरभाऊ पांगुळ यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचा गौरव करत, योग्य संधी आणि मार्गदर्शन मिळाल्यास असे विद्यार्थी मोठी झेप घेऊ शकतात, असे मत व्यक्त केले.

## मजुरांतील वाद चिघळला; दुचाकीला आग लावून ३० हजारांचे नुकसान

**वर्धा जनमाध्यम :** सावंगी मेघे परिसरातील दयाल नगर येथे मजुरांमधील किरकोळ वाद चिघळून गंभीर स्वरूप धारण केल्याची घटना समोर आली आहे. कामावर येण्याच्या कारणावरून झालेल्या वादात एका मजुराने संतापाच्या भरात सहकाऱ्याच्या दुचाकीला आग लावून सुमारे ३० हजार रुपयांचे नुकसान केल्याची तक्रार वर्धा शहर पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आली आहे. आरोपी सध्या फरार असून पोलिसांकडून त्याचा शोध सुरू आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, अप.क्र. ४४६/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम ३२६ (फ), ११८(१), ३५१(२), ३५२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी नेमीचंद बिरबल यादव (वय ३३), रा. सावंगी मेघे, हे स्टाईल फिटींगचे काम करतात. आरोपी दिनेश कैथवास, रा. दयाल नगर, सावंगी मेघे, हा सध्या फरार आहे.

घटना २१ एप्रिल रोजी सायंकाळी ७ ते ७.३० वाजताच्या सुमारास घडली. फिर्यादी हे आपल्या दोन सहकाऱ्यांसह आरोपीच्या घरी जाऊन रामटेक येथील कामावर येण्याबाबत विचारणा करत होते. यावेळी आरोपीने संतापून शिवीगाळ करत लोखंडी रॉडने मारहाण केली. यात फिर्यादीच्या डाव्या हाताच्या अंगठ्याला दुखापत झाली.

यानंतर आरोपीने रागाच्या भरात घरातून माचीस आणून फिर्यादीची होंडा शाईन (क्र. एमएच ३२ यू ०४१९) दुचाकी पेटवून दिली. दुचाकी पूर्णतः जळून खाक झाली. तसेच फिर्यादीस जीवे मारण्याची धमकी देण्यात आल्याचे तक्रारीत नमूद आहे.

या प्रकरणी पोलीस हवालदार नितीन इंटकर यांनी फिर्याद नोंदवून घेतली असून पुढील तपास सुरू आहे. प्रभारी अधिकारी पोनि अजय भुसारी यांच्या मार्गदर्शनाखाली आरोपीचा शोध घेतला जात आहे.

## SRM E-Tender Notice

MAHATRANSCO

Digitally signed online bids are invited for following tender through SRM E-tender process of MSETCL

| Sr. No. | Tender No.05 & Particulars of work | Sale period | Date & Time of opening of bid |
|---|---|---|---|
| 1 | RFx no. 7000039601; "Engaging Unskilled Manpower on Outsourcing Basis at various substations/ Subdivisions & Division office under EHV O&M Division, MSETCL Wardha for FY 2026-27; Estimated cost is Rs. 35,28,707.57/-, EMD to Deposit Rs.35,287/-, Cost of Tender 500/- +taxes extra. Note- All future amendments to these tenders will be published on MSETCL's website only. | 22.04.2026 to 07.05.2026 | 08.05.2026 @ 11:00 Hrs (If possible) |

For further details visit our Website http://srmetender.mahatransco.in

Executive Engineer, EHV (O&M) Division, MSETCL, Wardha

## जाहीर सुचना

वर्धा जिल्ह्याकरीता विधानसभा क्षेत्रातील मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना २०२५-२६ करीता दर निश्चित करण्यासाठी विधानसभा क्षेत्र निहाय यंत्रसामुग्रीचे (यंत्रसामुग्री + इंधन + मनुष्यबळ) प्रति तासिका दर ई-निविदाद्वारे खाजगी यंत्रसामुग्री धारकाकडून दर मागविण्यात येत आहेत.

त्या अनुषंगाने निविदामध्ये प्राप्त न्यूनतम दराला जिल्हास्तरीय कार्यकारीणी समितीद्वारे मंजुरी प्राप्त झालेली असून ते दर पुढीलप्रमाणे आहेत.

### यंत्रसामुग्रीचे मंजूर केलेले दर (प्रति तास)

| अ.क्र. | मशिनरीचे नांव | जिल्हा कार्यकारी समितीने मंजूर केलेले दर |
|---|---|---|
| १ | ७० HP JCB | ३६००/- |
| २. | २०० HP Poclain | ९६००/- |
| ३. | Static Roller | २५००/- |
| ४. | Vibratory Roller | ४४००/- |

### Is NP 3 Hume Pipe मंजूर केलेले दर (प्रति Rmt.)

| अ.क्र. | IS NP 3 Hume Pipe | जिल्हा कार्यकारी समितीने मंजूर केलेले दर |
|---|---|---|
| १. | १२०० mm | ६५००/- |
| २. | ९०० mm | ५४००/- |
| ३. | ८०० mm | ४८००/- |
| ४. | ६०० mm | ३८००/- |
| ५. | ४५० mm | ३२५०/- |

### P C C grade M 10 Concrete मंजूर केलेले दर (प्रति Cum.)

| अ.क्र. | M10 Concrete | जिल्हा कार्यकारी समितीने मंजूर केलेले दर |
|---|---|---|
| १. | Nominal Mix 1:3:6 (Hand Mixing) Concrete/Cum. | 6900/- |

तरी वर नमुद कामांकरीता निविदेमधील अटी व शर्ती पूर्ण करणाऱ्या ज्या कंत्राटदाराकडे स्वमालकीची यंत्रसामुगी अशा कंत्राटदाराने जिल्हास्तरीय समितीने मंजूर केलेल्या दरानुसार तसेच ज्या विधानसभा क्षेत्रामध्ये काम करण्यास ईच्छुक असलेल्या त्या विधानसभा क्षेत्राचा प्राधान्यकम दर्शवून पात्रताधारक कंत्राटदाराने योग्य व आवश्यक दस्ताऐवजासह निविदा फी रु.१०,०००/- चा धनाकर्ष (Demand Draft) व रुपये १५.०० लक्ष चा FDR कार्यालयामध्ये जमा करुन नामनिर्देशन (Empanelment) करीता आवेदन पत्र दिनांक २४.०४.२०२६ ते ०४.०५.२०२६ पर्यत खालील पत्त्यावर कार्यालयीन दिवशी व वेळेत सादर करावेत. दिनांक ०४.०५.२०२६ नंतर प्राप्त होणाऱ्या आवेदन पत्राचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

**कार्यालयाचा पत्ता -**
**उपविभागीय अधिकारी, कार्यालय वर्धा**
**महात्मा गांधी पुतळा परिसर**
**सेवाग्राम रोड, सिव्हील लाईन्स**
**वर्धा-४४२००१**

**स्वा/-**
**(दिपक कोरडे)**
**उपविभागीय अधिकारी, वर्धा**


**(क.संगावज/नाग/४४/२०२६)**

## कार-ऑटोरिक्षा समोरासमोर धडक; तिघे जखमी

### -केळझर नजीक भीषण अपघात

**सेलू जनमाध्यम :** सिंदी येथून केळझरकडे प्रवासी घेऊन निघालेल्या ऑटोरिक्षा व नागपूरच्या दिशेने भरधाव वेगाने येणाऱ्या कारमध्ये झालेल्या समोरासमोर धडकेत तिघे जण जखमी झाल्याची गंभीर घटना केळझर नजीक सुनीता नर्सिंग कॉलेजसमोर गुरुवारी (दि. २३) दुपारी ४.४० वाजण्याच्या सुमारास घडली. अपघाताच्या तीव्रतेमुळे परिसरात काही वेळासाठी भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. मिळालेल्या माहितीनुसार, ऑटोरिक्षा क्रमांक MH ३२ AK ११६९ ही सिंदी येथून प्रवासी घेऊन केळझरच्या दिशेने येत होती. सुनीता नर्सिंग कॉलेजजवळील वळणावर ती





विरुद्ध दिशेने वळत असताना समोरून भरधाव वेगाने येणाऱ्या कार क्रमांक MH २९ R ६३५५ ने ऑटोरिक्षाला जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की ऑटोरिक्षाचा पुढील भाग मोठ्या प्रमाणात चेंदामेंदा झाला. या अपघातात ऑटोरिक्षातील प्रवासी तसेच कारमधील चालक व एक महिला प्रवासी असे मिळून तिघे जण जखमी झाले. अपघातानंतर ऑटोरिक्षा चालकाने घटनास्थळावरून पलायन केल्याची माहिती आहे, ज्यामुळे स्थानिकांमध्ये संताप व्यक्त करण्यात येत आहे.

### नापिकी, कर्जाचा भार असह्य

## सेलू तालुक्यातील शेतकऱ्याने विहिरीत उडी घेऊन जीवनयात्रा संपवली

**सेलू जनमाध्यम :** सततची नापिकी, वाढते कर्ज आणि कुटुंबाच्या जबाबदाऱ्यांचे ओझे असह्य झाल्याने सेलू तालुक्यातील वडगाव जंगली येथील ६७ वर्षीय शेतकऱ्याने आपल्या शेतातील विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केल्याची हृदयद्रावक घटना घडली आहे.



या घटनेने परिसरात शोककळा पसरली असून ग्रामस्थांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मृत शेतकऱ्याचे नाव ज्ञानेश्वर देवाजी भुसे असे आहे. ते १८ एप्रिलपासून घरातून बेपत्ता होते. कुटुंबीयांनी नातेवाईक व परिसरात शोध घेऊनही त्यांचा ठावठिकाणा लागत नव्हता. अखेर २२ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास वडगाव जंगली शिवारातील त्यांच्या शेतातील विहिरीत एक मृतदेह तरंगताना आढळून आला. स्थानिकांनी दिलेल्या माहितीनुसार, तो मृतदेह ज्ञानेश्वर भुसे यांचाच असल्याचे स्पष्ट झाले.

## संविधानाच्या प्रकाशातच देशाची वाटचाल... बाबासाहेबांच्या विचारांचीच खरी दिशा-खा.काळे

**बोरगाव (मेघे) जनमाध्यम :** देशाच्या प्रगतीचा पाया हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधानात आहे. त्यामुळे देश चालविताना त्यांच्या विचारांची दिशा अंगीकारणे अत्यावश्यक आहे, असे मत खासदार अमर काळे यांनी व्यक्त केले. सिद्धार्थ नगर चौक परिवार, बोरगाव (मेघे) यांच्या वतीने आयोजित भिमगीतांच्या संगीतमय प्रबोधन कार्यक्रमात ते बोलत होते.



ते म्हणाले, १४० कोटी लोकसंख्येचा भारत आजही एकसंध आणि सक्षम आहे, याचे श्रेय संविधानाला जाते. बाबासाहेबांनी दिलेली समता, बंधुता आणि न्यायाची मूल्ये हीच देशाची खरी ताकद आहे. संविधान बदलण्याच्या चर्चांवर त्यांनी अप्रत्यक्ष टीका करत जनतेने योग्य वेळी योग्य निर्णय घेतल्याचेही नमूद केले. महिला आरक्षणाच्या विषयावर बोलताना काळे यांनी सांगितले की, महिलांना समान हक्क मिळणे ही काळाची गरज आहे. २०२३ मध्ये मंजूर झालेले महिला आरक्षण विधेयक तात्काळ लागू करावे. याबाबत विरोधी पक्ष एकमताने पाठिंबा देईल, असे त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला गौतम बुद्ध व डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. जवादे, शहजादभाई, माजी सरपंच मनोज चौधरी यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.भिमगीतांच्या सुरेल वातावरणात साकारलेला हा कार्यक्रम केवळ सांस्कृतिक न ठरता, समाजमनात जागृतीची नवी ज्योत पेटवणारा ठरला. संविधानाच्या मूल्यांची जपणूक करण्याचा संदेश उपस्थितांच्या मनात खोलवर रुजवून गेला.

## जैन अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष ललित गांधी यांचा दौरा

**वर्धा जनमाध्यम :** जैन अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष व महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाचे सदस्य ललित गांधी आज सकाळी ८ वाजता वर्धा शहरातील विविध जैन मंदिरांना भेटी देतील. सकाळी ९.३० वाजता चंद्रप्रभ जैन मंदिर येथे जैन समाज प्रतिनिधी व पदाधिकारी यांची बैठक घेतील. सकाळी ११.१५ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय येथे आयोजित आढावा बैठकीस उपस्थिती. दुपारी ३ वाजता पत्रकार परिषदेस उपस्थिती. दुपारी ४ वाजता सेवाग्राम आश्रमास भेट देतील. सायंकाळी ६ वाजता पुलगाव येथील जैन मंदिरास भेट व समाज प्रतिनिधीं सोबत बैठक घेतील. सायंकाळी ७ वाजता पुलगाव येथून नागपूरकडे प्रयाण करतील.

## नावात बदल

माझे पासपोर्ट नंबर N6207617 वरील माझे NURJAHA SHEKH HAMID असे नाव होते. माझ्या आधार व पॅन कार्ड वरील NURZABEE SHAIKH HAMID SHAIKH हे नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

पत्ता :- तुरक लेआऊट दीपक मंगल कार्यालय जवळ वर्धा ४४२००१

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# सरकारी कर्मचा-यांचा संप चौथ्या दिवशीही सुरूच राहणार!

## तोडगा नाहीच

**मुंबई/प्रतिनिधी :**सरकारी कर्मचा-यांच्या सुधारित निवृत्ती वेतन योजनेसह १८ मागण्यांवर कोणताही तोडगा न निघाल्याने उद्या सलग चौथ्या दिवशी हा संप कायम राहणार आहे. कर्मचा-यांच्या मागण्यांवर मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी



सकारात्मक प्रतिसाद दिला मात्र बैठकीचे इतिवृत्त अद्यापपर्यंत कर्मचारी संघटनांना देण्यात आलेले नाही. सुधारित पेन्शन योजनेबाबतही कोणताच ठोस निर्णय झालेला नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांकडूनच मागण्यांबाबत योग्य भूमिका जाहीर करण्यात यावी, अशी भूमिका कर्मचारी संघटनेकडून घेण्यात आली आहे.

सरकारी कर्मचा-यांचा संप २१ एप्रिलपासून सुरू झाला असून २२ एप्रिल रोजी कर्मचा-यांच्या मागण्यांबाबत सरकारी-निमसरकारी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी समन्वय समितीला मुख्य सचिवांकडून चर्चेसाठी निमंत्रित करण्यात आले. यावेळी कर्मचा-यांच्या १८ प्रलंबित मागण्यांबाबत चर्चा करण्यात आली. यावेळी सकारात्मक प्रतिसाद दर्शविल्यानंतरही कोणताही ठोस निर्णय सरकारकडून जाहीर करण्यात आला नाही. त्याचप्रमाणे या बैठकीचे इतिवृत्तही संघटनांना देण्यात आले नाही. सुधारित निवृत्ती वेतन योजनेबाबतही कोणताही निर्णय घेण्यात आला नाही. त्यामुळे मुख्यमंत्री फडणवीस यांच्यास्तरावर अधिकृत बैठक झाल्याशिवाय ठोस निर्णय होउ शकणार नाही का, असा सवाल कर्मचारी समन्वय समितीचे निमंत्रक विश्वास काटकर यांनी केला. मागील १५ महिने लक्षवेधी आंदोलन करून शासनाकडून विनम्रपणे योग्य निर्णयाची अपेक्षा केली; परंतु सरकारने आजपर्यंत दुजाभाव दाखवला आहे. कर्मचा-यांचा संप आंदोलनाला पूर्ण पाठिंबा असून शिक्षकही मोठ्या प्रमाणात संपात उतरले असल्याचा दावा कमर्चारी संघटनेकडून करण्यात आला आहे. मागील तीन दिवस संप आंदोलनाद्वारे न्यायाची अपेक्षा करीत असताना सरकारकडून योग्य प्रतिसाद दिला जात नसल्याने उद्या शुक्रवारी सलग चौथ्या दिवशी संप सुरूच ठेवण्याचा निर्णय समन्वय समितीच्या सुकाणू समितीच्या झालेल्या बैठकीत घेण्यात आला.

## अनुसूचित जाती उपवर्गीकरणाबाबत निवेदन स्वीकारण्यास मुदतवाढ

**मुंबई/प्रतिनिधी :**राज्यातील अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाच्या अनुषंगाने अर्ज किंवा निवेदने सादर करण्यासाठीची मुदत ३० एप्रिल २०२६ पर्यंत वाढविण्यात आली असल्याची माहिती सामाजिक न्याय विभागाने प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे. अनुसूचित जातीच्या आरक्षणात उपवर्गीकरण संदर्भात न्यायमूर्ती अनंत मनोहर बदर (निवृत्त न्यायाधीश, उच्च न्यायालय, पाटणा) यांच्या अध्यक्षतेखालील एक सदस्यीय समितीने शिफारशींसह १६ मार्च २०२६ रोजी आपला अहवाल शासनास सादर केला होता. या अहवालावर पुढील कार्यवाहीसाठी मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या १० एप्रिल २०२६ च्या प्रसिद्धीपत्रकान्वये, संबंधितांना आपल्या मते मांडण्यासाठी १५ एप्रिल २०२६ पर्यंत अर्ज करण्याची मुदत देण्यात आली होती तसेच सुनावणी १७ व १८ एप्रिल २०२६ रोजी आयोजित करण्यात येणार होती. मात्र, सामाजिक संघटना तसेच विविध स्तरांतून कालावधी अपुरा असल्याने मुदतवाढ देण्याची मागणी करण्यात आली. त्यानुसार, dg-sw@barti.in या ई-मेल आयडीवर अर्ज किंवा निवेदन सादर करण्यासाठी आता ३० एप्रिल २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. तसेच, मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील समितीसमोर होणा-या सुनावणीची वेळ, स्थळ व दिनांक याबाबतची माहिती यथावकाश कळविण्यात येणार असल्याचेही प्रसिद्धीपत्रकात स्पष्ट करण्यात आले आहे.

## विधानपरिषदेच्या 10 जागांसाठी 12 मे रोजी मतदान व मतमोजणी

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारे होणा-या नउ जागांकरिता भारत निवडणूक आयोगाने द्विवार्षिक निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे. या नउ सदस्यांची मुदत १३ मे २०२६ रोजी संपणार आहे. त्याचप्रमाणे ड?. प्रज्ञा सातव यांच्या राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या विधानपरिषदेच्या एका जागेसाठी निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. भारत निवडणूक आयोगाने नउ जागांसाठी द्विवार्षिक निवडणूक तर एक जागेसाठी पोटनिवडणूक कार्यक्रम घोषित केला आहे. या एकूण १० जागेसाठी मंगळवार १२ मे २०२६ रोजी सकाळी ९ ते दुपारी ४ वाजेपर्यंत मतदान तर सायंकाळी ५ वाजल्यानंतर मतमोजणी करण्यात येणार आहे. विधानपरिषद सदस्य संजय केणेकर, नीलम गो-हे, उद्धव ठाकरे, संदीप जोशी, दादाराव केचे, अमोल मिटकरी, रणजितसिंह मोहिते-पाटील, राजेश राठोड आणि शशिकांत शिंदे या नउ सदस्यांच्या सदस्यत्वाची मुदत १३ मे २०२६ रोजी संपणार आहे. त्याचप्रमाणे विधानपरिषद सदस्य डॉ.प्रज्ञा सातव यांच्या सदस्यत्वाची मुदत २७ जुलै २०३० रोजी संपणार आहे. या निवडणुकीची अधिसूचना गुरूवार, २३ एप्रिल २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल तर नामनिर्देशन पत्र गुरूवार, ३० एप्रिल २०२६ रोजी सादर करण्यात येतील. नामनिर्देशन पत्रांची छाननी शनिवार २ मे २०२६ रोजी तर उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा दिनांक सोमवार ४ मे २०२६ असा आहे. ही संपूर्ण प्रक्रिया बुधवार १३ मे २०२६ रोजी पूर्ण करण्यात येईल, असे मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय, महाराष्ट्र राज्य यांनी कळविले आहे.

## व्यावसायिक वाहनचालकांना मराठी भाषा शिकवण्यासाठी साहित्यिकांचा पुढाकार

**मुंबई/प्रतिनिधी :** रिक्षा, टॅक्सी तसेच ई-बाईक टॅक्सी सेवांमधील व्यावसायिक वाहनचालकांना प्रवाशांशी मराठीतून संवाद साधता यावा, यासाठी मुंबई मराठी साहित्य संघ आणि कोकण मराठी साहित्य परिषदेशी निगडीत साहित्यिकांनी चालकांना व्यावहारिक मराठी शिकवण्यासाठी पुढाकार घेण्याची तयारी दर्शविली आहे. त्यासाठी आवश्यक अभ्यासक्रम लवकरच तयार करण्यात येणार असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. परिवहन मंत्री सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयीन दालनात यासंदर्भात बैठक झाली. बैठकीस परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर, मराठी भाषा विभागाचे उपसचिव नामदेव भोसले, राज्य मराठी विकास संस्थेचे संचालक डॉ.शामकांत देवरे तसेच तज्ज्ञ, साहित्यिक उपस्थित होते. वाहनचालकांना खेळीमेळीच्या वातावरणात व्यावहारिक मराठी शिकविण्यासाठी कोकण मराठी साहित्य परिषद आपल्या ७२ शाखांमधून शिकवणी वर्ग सुरू करण्याची तयारी दर्शवित आहे. तसेच, मुंबई मराठी साहित्य संघाने आपल्या स्वयंसेवी शिक्षकांच्या माध्यमातून ऑनलाईन मराठी भाषा प्रशिक्षण देण्याची तयारी दर्शविली आहे. या प्रशिक्षणासाठी चालकांकडून कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही, असे परिवहन मंत्री सरनाईक यांनी सांगितले. महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधत संपूर्ण राज्यभर रिक्षा व टॅक्सी चालकांच्या परवान्यांची तपासणी मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेदरम्यान इतर नियमांसोबतच चालकांना मराठी भाषेचे व्यवहारज्ञान आहे की नाही, याचीही पडताळणी केली जाणार आहे. वाहनचालकांमध्ये मराठी भाषेबद्दल आत्मीयता निर्माण होण्यासाठी प्रयत्न केले जाणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. मुंबई मराठी साहित्य संघाच्या अध्यक्षा उज्ज्वला मेहेंदळे तसेच ज्येष्ठ साहित्यिक महेश केळुसकर, संतोष राणे, अशोक बागवे, बाळ कांदळकर, सुनील तांबे, शिवाजी गावडे, सतीश सोळांकुरकर, अरुण म्हात्रे, एकनाथ आव्हाड, प्रसाद कुलकर्णी, प्राचार्य अशोक चिटणीस, ज्येष्ठ साहित्यिका अनुपमा उजगरे, दीपा ठाणेकर आणि मनीषा राजपूत आदींच्या मार्गदर्शनामुळे चालकांना मराठी भाषेचे व्यवहारज्ञान मोहिमेला अधिक बळ मिळेल, अशी अपेक्षा परिवहन मंत्री सरनाईक यांनी व्यक्त केली.

# राज्यात लवकरच ५३ स्वयंचलित वाहन तपासणी केंद्रे ऊभारण्याचे काम तातडीने पूर्ण करा -मुख्यमंत्री

**मुंबई/प्रतिनिधी :**राज्यातील वाहनांची फिटनेस तपासणी केवळ नोंदणीकृत स्वयंचलित वाहन तपासणी केंद्राद्वारे (ऑटोमेटेड टेस्टिंग स्टेशन - एटीएस) केली जावी, यासाठी राज्यात ५३ स्वयंचलित वाहन तपासणी केंद्रे उभारण्याचे काम प्रगतीपथावर असून ही कामे तत्काळ पूर्ण करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. राज्यात स्वयंचलित वाहन तपासणी केंद्रे उभारण्यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली वर्षा निवासस्थानी बैठक झाली. या बैठकीस परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, परिवहन राज्यमंत्री माधुरी मिसाळ, अपर मुख्य सचिव संजय सेठी, परिवहन आयुक्तराजेश नार्वेकर, उपसचिव चेतन निकम, एआरएआय. उपसंचालक मकरंद पाठक आदी उपस्थित होते.

केंद्रीय मोटार वाहन नियम ६२ मध्ये २३ सप्टेंबर २०२३ रोजीच्या अधिसूचनेनुसार परिवहन संवर्गातील सर्व वाहनांची फिटनेस चाचणी केवळ नोंदणीकृत स्वयंचलित वाहन तपासणी केंद्रांमार्फत करणे १ एप्रिल २०२५ पासून अनिवार्य करण्यात आले आहे. त्यामुळे आता पारंपरिक मानवी तपासणी पद्धती बाद होणार आहे. याच अनुषंगाने राज्यात ७ केंद्रे पूर्ण झाली असून उर्वरित ३७ स्वयंचलित वाहन तपासणी केंद्रे ऑगस्ट अखेर कार्यान्वित होतील आणि प्रलंबित तपासणी केंद्राबाबत अन्य विभागाशी समन्वयाने कार्यवाही करून तातडीने ती केंद्रे सुरू करण्याबाबतचे नियोजन करावे, असे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.



राज्यातील स्वयंचलित वाहन तपासणी केंद्रे पूर्णत्वास न आल्याने राज्यातील काही परिवहन कार्यालयांच्या परिवहन/वाहन पोर्टल प्रवेशावर केंद्र सरकारने टप्प्याटप्प्याने निर्बंध लागू केले आहेत. या निर्णयामुळे वाहनधारक व वाहतूकदारांना अडचणी निर्माण होत असल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पोर्टल प्रवेश तातडीने पुनर्संचयित करण्याची मागणी केंद्र शासनाकडे केली आणि केंद्रानेही यास सकारात्मक प्रतिसाद देउन निर्बंध उठविण्यात आले.

एटीएस प्रणालीमुळे वाहन तपासणी प्रक्रिया स्वयंचलित, संगणकीकृत आणि पारदर्शक

राज्यात सध्या सुमारे ४.३३ कोटी वाहने असून, त्यापैकी ३६.८० लाख वाहने परिवहन प्रवर्गातील आहेत. यातील सुमारे ९ लाख वाहनांना दरवर्षी फिटनेस चाचणी करणे आवश्यक ठरणार आहे. एटीएस प्रणालीमुळे वाहन तपासणी प्रक्रिया पूर्णपणे स्वयंचलित, संगणकीकृत आणि पारदर्शक होणार असून, मानवी हस्तक्षेप कमी झाल्याने अचूकतेत वाढ होणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. महाराष्ट्रात एकूण ५३ शासकीय एटीएस केंद्रे उभारण्यात येत असून, देशातील एकूण २१४ केंद्रांपैकी सुमारे २५ टक्के केंद्रे राज्यात असणार आहेत. या प्रकल्पासाठी पाच वर्षांच्या संचालन व देखभालीसाठी सुमारे १,०३५ कोटी रु पयांचा खर्च अपेक्षित असून, केंद्र शासनाकडून ३३७.७४ कोटी रु पयांचे अनुदान मिळाले असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

## उद्धव ठाकरे हे महाविकास आघाडीचा चेहरा

### हर्षवर्धन सपकाळ यांच्या विधानाची चर्चा

**मुंबई/प्रतिनिधी :** सध्या राज्यात विधानपरिषदेच्या निवडणुकीची चर्चा आहे. राज्यात एकूण ९ जागांसाठी निवडणूक होणार असून १२ मे रोजी मतदान होणार आहे. या निवडणुकीसाठी कोणाला उमेदवारी द्यावी, यासाठी सर्वच पक्षांत खल सुरू आहे. महाविकास आघाडीतही उमेदवारीवरून खलबतं सुरू आहेत. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी नुकतेच माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. उद्धव ठाकरे यांनी विधानपरिषदेची निवडणूक लढवावी, अशीच भूमिका महाविकास आघाडीच्या राष्ट्रवादी (शरद पवार गट) आणि काँग्रेसची आहे. असे असतानाच आता सपकाळ यांनी ठाकरेंच्या भेटीनंतर सूचक विधान केले आहे. त्यांच्या या विधानानंतर राजकारणात वेगवेगळ्या चर्चा रंगल्या आहेत.

***तिन्ही पक्ष एकत्र बसतील त्यानंतर-*** महाविकास आघाडीतील घटकपक्ष म्हणून आमच्यात संवाद झाला. या पार्श्वभूमीवर आमची चर्चा झाली. भविष्यातील आव्हानांवरही आम्ही चर्चा केली. आजची राजकीय परिस्थिती, भूतकाळातील निर्णय यांचे सिंहावलोकन झाले. येणा-या काळात तिन्ही पक्ष एकत्र बसतील आणि विधानपरिषदेविषयी निर्णय घेतला जाईल,, असे सपकाळ यांनी सांगितले.

***ते विधानपरिषदेत जात असतील तर आनंदच आहे-*** तसेच, उद्धव ठाकरे यांच्या उमेदवारीबाबत आमची भूमिका तुमच्या सर्वांसमोर आहे. राज्यसभेच्या निवडणुकीच्या अगोदरपासून आमची हीच भूमिका राहिलेली आहे. राज्यसभेच्या निवडणुकीत आम्हाला उमेदवारी मिळू शकली नाही. मात्र उद्धव ठाकरे हे महाविकास आघाडीचा चेहरा आहेत. ते विधानपरिषदेत जात असतील तर आम्हाला आनंदच आहे. आम्ही



याबाबत अगोदरच सांगितलेले आहे, असेही सपकाळ यावेळी म्हणाले.

***सुप्रिया सुळे यांचेही ट्वीट-*** विधानपरिषदेच्या उमेदवारीबाबत आम्ही या बैठकीत चर्चा झाली नाही. भविष्यात कशी वाटचाल राहिली पाहिजे, यावर आम्ही चर्चा केली. उद्धव ठाकरे यांच्या भूमिकेविषयी मी भाष्य करणे योग्य नाही. त्यांच्या उमेदवारीबाबत तेच बोलतील, असे बोलत काँग्रेसही उद्धव ठाकरे यांच्या उमेदवारीबाबत अनुकूल असल्याचे त्यांनी अप्रत्यक्षपणे सांगितले. दरम्यान, याआधी खासदार सुप्रिया सुळे यांनीदेखील ट्वीट करत उद्धव ठाकरे यांनी विधानपरिषदेची निवडणूक लढवावी, अशी भूमिका मांडली. त्यामुळे आता नेमकं काय होणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## उदंचन जलविद्युत प्रकल्पासाठी तात्यासाहेब कोरे वारणा नवशक्ती निर्माण संस्थेबरोबर 5 हजार 200 कोटींचा करार

**मुंबई/प्रतिनिधी :** जलसंपदा विभाग आणि तात्यासाहेब कोरे वारणा नवशक्ती निर्माण संस्था मर्यादित यांच्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत तीन उदंचन जलविद्युत प्रकल्पांसाठी सुमारे ५ हजार २०० कोटी रु पयांचा आज सामंजस्य करार करण्यात आला. महाराष्ट्राच्या उर्जा क्षमतेत वाढ करण्यासाठी हा करार महत्त्वाचा टप्पा ठरणार असून या माध्यमातून कमी खर्चात मोठ्या प्रमाणावर उर्जा साठवणूक करून राष्ट्रीय ग्रीड स्थिर ठेवण्याची क्षमता राज्यात निर्माण होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला. वर्षा या शासकीय निवासस्थानी झालेल्या कार्यक्रमास जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, जलसंपदा सचिव संजय बेलसरे, आमदार डॉ. विनय कोरे, नवशक्ती निर्माण संस्थेचे अध्यक्ष नामदेव एच. पाटील, मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्रा, प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी आदि उपस्थित होते. तात्यासाहेब कोरे वारणा नवशक्ती निर्माण संस्थेच्या वतीने कुंभी ऑफ स्ट्रीम क्लोज्ड लूप उदंचन प्रकल्प, जि. कोल्हापूर / सिंधुदुर्ग येथे दोन व शाहूवाडी येथे कडवी ऑफ स्ट्रीम क्लोज्ड लूप उदंचन प्रकल्प हा एक असे तीन प्रकल्प उभारण्यात येणार आहे. या माध्यमातून सुमारे ५ हजार १९९ कोटी रु पयांची गुंतवणूक होणार असून ११०० मेगावॅट वीज निर्मिती क्षमता स्थापित होणार आहे. या तीनही प्रकल्पातून ११०० मनुष्यबळ रोजगार निर्मिती होणार आहे. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, महाराष्ट्राने उदंचन जलविद्युत प्रकल्पांमध्ये आतापर्यंत ८०,००० मेगावॅट क्षमतेचा टप्पा ओलांडला असून अपारंपरिक उर्जा क्षेत्रातही मोठी झेप घेतली आहे. अशा परिस्थितीत उदंचन जलविद्युत प्रकल्प (पीएसपी) हे भविष्यातील उर्जा गरजा पूर्ण करण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहेत.

देशातील अनेक राज्ये सौरउर्जेमध्ये

- तीन प्रकल्पातून 1100 मेगावॅट वीज निर्मिती क्षमता स्थापित होणार
- 1110 रोजगार निर्मिती होणार
- राज्यातील उदंचन प्रकल्पांची 80 हजार मे.वॅ. वीज निर्मिती क्षमता

आघाडीवर आहेत. राजस्थान आणि गुजरातसारख्या राज्यांकडे विस्तीर्ण वाळवंट क्षेत्र असल्याने तेथे मोठ्या प्रमाणावर सौर प्रकल्प उभे राहत आहेत. मात्र महाराष्ट्राची खरी ताकद पंप्ड स्टोरेज प्रकल्पांमध्ये आहे.या करारामुळे राज्यातील उर्जा पायाभूत सुविधांना चालना मिळणार असून भविष्यातील वाढत्या विजेच्या मागणीला तोंड देण्यासाठी महाराष्ट्र सक्षम होणार असल्याचा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. राज्यात मोठ्या प्रमाणावर डेटा सेंटर्स उभारले जात असून पुढील ३ ते ४ वर्षांत विजेची मागणी झपाट्याने वाढणार आहे. विशेषतः अपारंपरिक उर्जेवर आधारित वीज या डेटा सेंटर्समध्ये मोठ्या प्रमाणावर वापरली जाणार आहे. त्यामुळे अशा प्रकल्पांची उभारणी ही काळाची गरज असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. सहकार क्षेत्राच उर्जा निर्मितीत प्रवेश होत असल्याबद्दल त्याचे स्वागत करत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, वारणा समूहाने विविध क्षेत्रांत उत्तम कामगिरी केली असून उर्जा क्षेत्रातही ते महत्त्वाची भूमिका बजावतील. या प्रकल्पांना अँकर प्रोजेक्ट म्हणून सहकार्य देण्याचा राज्य सरकारचा विचार असून वीज खरेदी करार (पीपीए) तसेच वित्तीय सहाय्याबाबत सकारात्मक भूमिका घेतली जाईल. जलसंपदा विभागाने या क्षेत्रात प्रभावी कामगिरी केली आहे. केंद्र सरकारकडून ३,००० कोटी रु पयांपर्यंतच्या प्रकल्पांसाठी राज्यात स्वतंत्र यंत्रणा उभारण्याचे निर्देश दिले असून राज्य सरकार या प्रक्रियेला गती देणार असल्याचेही त्यांनी सांगितले. जलसंपदा मंत्री गिरीश महाजन म्हणाले की, राज्यात पूर्वी नागरिकांना एप्रिल-मे महिन्यांत मोठ्या प्रमाणावर लोडशेडिंगचा सामना करावा लागत होता. मात्र गेल्या काही वर्षांत राज्यातील उर्जा क्षेत्रात झालेल्या बदलांमुळे ही परिस्थिती मोठ्या प्रमाणात सुधारली आहे.

## एसटी'ची सेवा अधिक लोकाभिमुख करण्यासाठी प्रयत्नशील-परिवहन मंत्री

**मुंबई/प्रतिनिधी :** एसटी ही महाराष्ट्राची लोकवाहिनी असून ती अधिक गतिमान, सुरक्षित आणि आरामदायी करण्यासाठी राज्य शासनाने अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. त्यामुळे सर्वसामान्य जनतेच्या जिव्हाळ्याची 'एसटी' लवकरच नव्या रूपात जनतेसमोर येईल, असे प्रतिपादन परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केले.

राज्यातील अधिस्वीकृतीधारक पत्रकारांना महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसेसमधून मोफत प्रवासाची सुविधा दिली जाते. या सुविधेचा लाभ सुलभपणे घेण्यासाठी एनसीएमसी स्मार्ट कार्ड वितरण मंत्रालयातील पत्रकार कक्षात करण्यात आले. यावेळी अभिनेते रितेश देशमुख, एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर, वित्तीय सल्लागार गिरीश देशमुख, मंत्रालय व विधिमंडळ वार्ताहर संघाचे अध्यक्ष दिलीप सपाटे, सरचिटणीस दीपक भातुसे तसेच पत्रकार उपस्थित होते. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक आणि




अभिनेता रितेश देशमुख यांच्या हस्ते वरिष्ठ पत्रकारांना स्मार्ट कार्डचे वितरण करण्यात आले. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले की, एसटीच्या ताफ्यात मोठ्या प्रमाणावर इलेक्ट्रिक बसेस समाविष्ट करण्यात येत असून, येत्या काही वर्षांत डिझेलवर चालणा-या बस टप्प्याटप्प्याने बंद केल्या जातील. यामुळे पर्यावरण संवर्धनालाही चालना मिळेल. एसटी स्थानकांची स्वच्छता राखण्यासाठी खाजगी कंत्राटे देण्यात आली असून, दर चार तासांनी स्वच्छतागृहांची साफसफाई केली जाईल. बस स्थानकेही स्वच्छ व सुटसुटीत ठेवण्यावर भर दिला जाणार आहे. त्यामुळे लवकरच एसटीचा चेहरामोहरा पूर्णपणे बदललेला दिसेल, असेही परिवहन मंत्री सरनाईक यांनी सांगितले. एसटीचे ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून अभिनेते रितेश देशमुख आणि जेनेलिया देशमुख यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ही जबाबदारी स्वीकारल्याबद्दल परिवहन मंत्री सरनाईक यांनी दोघांचे आभार मानले. अभिनेता रितेश देशमुख यांनी सांगितले की, त्यांचे वडील आणि माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी परिवहन खाते सांभाळले होते. एसटी हा त्यांच्यासाठी अत्यंत जिव्हाळ्याचा विषय होता. त्यामुळे कोणतीही अपेक्षा न ठेवता आपण एसटीचे ब्रँड ॲम्बेसेडर होण्याचा निर्णय घेतला.

## महानीती प्लॅटफॉर्मचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते लोकार्पण



**मुंबई/प्रतिनिधी :**महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेला १ ट्रिलियन डालरच्या दिशेने वेग देण्यासाठी मित्रा यांच्या वतीने महानीती ही एकात्मिक प्रणाली विकसित करण्यात आली आहे.या प्रणालीचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते वर्षा निवासस्थानी करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्रा, मुख्यमंत्री कार्यालयाचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, मित्रा (महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फार ट्रान्सफार्मेशन) चे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी, बीआयएसएजी-एन चे महासंचालक डॉ. टी. पी. सिंह, मित्राचे वरिष्ठ सल्लागार डॉ. विराज लोलियाना, संशोधन अधिकारी सुमेरन बालसेकर तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते. ही प्रणाली मुख्यमंत्री गती शक्ती या संकल्पनेवर आधारित असून याअंतर्गत नैसर्गिक साधनसंपत्ती व विविध मालमत्तांची सर्वसमावेशक माहिती प्रणाली विकसित करण्यात येणार आहे. तसेच विविध प्रकल्पांचे नियोजन, अंमलबजावणी आणि निरीक्षणासाठी या प्रणालीचा वापर करण्यात येणार आहे.

# राज्यातील सर्व कृषी विद्यापीठात 50 ॲग्री-बेस्ड इनक्यूबेशन सेंटर्स स्थापन करा-राज्यपाल जिष्णु देव वर्मा

**मुंबई/प्रतिनिधी :**राज्यातील सर्व कृषि विद्यापीठात कृषी उत्पादन विक्रीला प्रोत्साहन देण्यासाठी पहिल्या टप्प्यात ५० अग्री-बेस्ड इनक्यूबेशन सेंटर्स सुरू करा. कृषी विद्यापीठात तयार होणा-या कृषी उत्पादनांची विक्री व्हावी, शेतक-यांना प्रशिक्षण मिळावे व कृषी विद्यापीठातील विद्यार्थ्यांना कृषी उद्योजक होण्यासाठी प्रोत्साहन मिळावे यासाठी हा उपक्रम राबवावा असे निर्देश राज्यपाल तथा कुलपती जिष्णु देव वर्मा यांनी दिले. राज्यपाल वर्मा यांच्या अध्यक्षतेखाली लोकभवन, मुंबई येथे कृषी, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विकास विभाग व कृषी विद्यापीठांच्या उपक्रमांवर उच्चस्तरीय बैठक पार पडली. या बैठकीस पशुसंवर्धन विभागाचे सचिव एन.रामस्वामी, राज्यपाल यांचे सचिव डॉ.प्रशांत नारनवरे, कृषी आयुक्त सूरज मांढरे, मत्स्यव्यवसाय आयुक्त प्रेरणा देशभ्रतार, पशुसंवर्धन विभागाचे आयुक्त डॉ. किरण पाटील, आणि राज्यातील





प्रमुख कृषी विद्यापीठांचे कुलगुरू उपस्थित होते. राज्यपाल वर्मा म्हणाले की, शेतक-यांना पोस्ट-हार्वेस्ट मॅनेजमेंटबाबत योग्य मार्गदर्शन व सुविधा, शेतीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, शेतकरी उत्पादक कंपनीना याबाबत मार्गदर्शन करून त्यांना सक्षम करण्यावर भर दिला पाहिजे. कृषी विद्यापीठांनी शैक्षणिक व प्रशासकीय कार्यक्षमतेत वाढ करून राष्ट्रीय स्तरावरील यूजीसी क्रमवारीत प्रगती साधावी. संशोधन, शैक्षणिक गुणवत्ता व संस्थात्मक प्रशासन सुधारण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात. यशस्वी शेतक-यांच्या यशोगाथा सर्वांपर्यंत पोहोचवा. शेतक-यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी प्रभावीपणे काम करावे असे निर्देशही त्यांनी दिले. राज्यपाल वर्मा म्हणाले की, नंदूरबार येथे आदिवासी महाविद्यालयात कृषि विभागाच्या वतीने कौशल्य प्रशिक्षण राबविण्यात यावे. कृषी, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय क्षेत्रात शाश्वतता, नवोन्मेष आणि शेतकरी-केंद्रित उपाययोजना राबविण्यासाठी विद्यापीठे, संशोधन संस्था आणि शासनाचे विविध विभाग यांच्यात समन्वय वाढवावा. शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी शासनाच्या योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी समन्वयातून सर्वांनी काम करावे. शेतक-यांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी व शेतक-यांना शाश्वत उत्पन्नाचे स्रोत निर्माण होउन त्यांचा उदरनिर्वाह अधिक सक्षम होईल असे उपक्रम राबविण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## विधेयकाचे चर्वितचर्वण

स्वातंत्र्योत्तर काळापासून महिलांच्या प्रतिनिधित्वाविषयी सातत्याने चर्चा, शिफारसी आणि आंदोलन होत आले असले तरी प्रत्यक्ष राजकीय सत्तेत त्यांचे स्थान अपेक्षित प्रमाणात निर्माण झालेले नाही, ही वस्तुस्थिती आजही तितकीच ठळक आहे. संसद आणि राज्य विधानसभांमध्ये महिलांसाठी आरक्षण देण्याची मागणी अनेक दशकांपासून प्रलंबित राहिली असून या मागणीला कायदेशीर स्वरूप देण्यासाठी महिला आरक्षण विधेयक पुढे आले. या विधेयकाभोवतीची चर्चा केवळ संसदीय औपचारिकतेपुरती मर्यादित नाही. ती सामाजिक न्याय, समान संधी आणि लोकशाही सहभाग यांपर्यंत विस्तारली आहे. या विधेयकाचा मुख्य हेतू केवळ महिलांची संख्यात्मक उपस्थिती वाढवणे नसून निर्णयप्रकियेत प्रभावी, सशक्त आणि अर्थपूर्ण सहभाग सुनिश्चित करणे हा आहे. असे असले तरी संसदीय पातळीवर विविध राजकीय हितसंबंध, प्रादेशिक अपेक्षा आणि विचारसरणीतील भिन्नता यांमुळे एकसंध सहमती निर्माण होण्यात अडथळे निर्माण झाल्यामुळे विधेयकाचा प्रवास अपेक्षित वेगाने पुढे सरकू शकलेला नाही. या परिस्थितीकडे केवळ अपयश म्हणून पाहणे एकांगी ठरते, कारण भारतीय राजकीय इतिहासात अनेक सुधारणा प्रारंभी तीव्र विरोधानंतरच व्यापक स्वीकारापर्यंत पोहोचल्या आहेत. पंचायत राज व्यवस्थेत महिलांसाठी राखीव जागांची अंमलबजावणी सुरुवातीला विवादित होती, परंतु आज ती ग्रामीण लोकशाहीचा मजबूत आधारस्तंभ बनली आहे. त्याच धर्तीवर महिला आरक्षण विधेयकही दीर्घकालीन सामाजिक परिवर्तनाचा महत्त्वाचा टप्पा मानला जाऊ शकतो. या विधेयकाभोवतीची राजकीय हाताळणी ही दीर्घकालीन धोरणात्मक नियोजन आणि टप्प्याटप्प्याने निर्णय प्रक्रियेचा भाग म्हणून पाहता येते. त्यामुळे या विधेयकाभोवती निर्माण झालेली सध्याची स्थिती ही अंतिम अपयशाची खूण नसून लोकशाहीतील नैसर्गिक आणि आवश्यक संक्रमण अवस्था आहे, ज्यातून भविष्यात अधिक परिपक्व, समावेशक आणि समतोल धोरणनिर्मितीची दिशा स्पष्ट होण्याची शक्यता अधिक दृढ होते. भारतीय राजकारणातील महिला प्रतिनिधित्वाचा प्रश्न हा केवळ आकडेवारी, घटनात्मक तरतुदी किंवा कायदेशीर चौकटीपुरता मर्यादित नसून समाजाच्या खोलवर रुजलेल्या मानसिक संरचनेशी आणि ऐतिहासिक परंपरेशी घट्ट जोडलेला आहे. भारताच्या विविध सामाजिक व आर्थिक स्तरांमधील विकासातील असमानतेमुळे महिलांच्या राजकीय सहभागात प्रादेशिक तफावत दिसून येते. ग्रामीण भागात अजूनही परंपरागत कुटुंबव्यवस्था, सामाजिक बंधने, आर्थिक अवलंबित्व आणि निर्णयप्रकियेतील पुरुषप्रधान वर्चस्व या घटकांचा प्रभाव महिलांच्या सार्वजनिक जीवनातील प्रवेशावर मर्यादा आणतो. त्याउलट शहरी भागात शिक्षणाचा विस्तार, आर्थिक स्वावलंबन, जागतिकीकरणाचा प्रभाव आणि स्पर्धात्मक वातावरणामुळे महिलांचा सहभाग तुलनेने अधिक दिसून येतो. या विषम परिस्थितीमुळे राष्ट्रीय स्तरावर एकसंध आणि सर्वसमावेशक धोरण राबवणे अत्यंत आव्हानात्मक ठरते. महिला आरक्षण विधेयकाच्या चर्चेदरम्यान हे वास्तव अधिक ठळकपणे समोर आले, कारण विविध राजकीय पक्षांनी यावर एकसमान भूमिका घेतलेली नाही. काही पक्षांनी हे विधेयक ऐतिहासिक आणि आवश्यक सामाजिक सुधारणा म्हणून स्वीकारले, तर काहींनी त्याच्या अमलबजावणीतील तांत्रिक गुंतागुंत, लोकसंख्येचे प्रतिनिधित्व, प्रादेशिक समतोल आणि संघराज्यीय रचनेवरील परिणाम यांसारख्या मुद्द्यांवर प्रश्न उपस्थित केले. सरकारने गेल्या काही वर्षामध्ये महिला सक्षमीकरणासाठी विविध उपक्रम राबवले आहेत, ज्यामध्ये स्वयं सहायता गटांचे सशक्तीकरण, आर्थिक समावेशनासाठी बँक खात्यांची सार्वत्रिकता, कौशल्य विकास कार्यक्रम आणि स्वयंरोजगाराला प्रोत्साहन देणाऱ्या योजना यांचा समावेश होतो. स्वयंसहायता गटांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील लाखो महिलांनी आर्थिक स्वावलंबन प्राप्त केले आहे.आणि सामाजिक प्रतिष्ठा वाढवली आहे. तथापि राजकीय प्रतिनिधित्वाचा प्रश्न अद्याप पूर्णपणे सुटलेला नाही, कारण सामाजिक मानसिकता बदलण्याची प्रक्रिया कायदेशीर सुधारणांपेक्षा अधिक संथ आणि दीर्घकालीन असते. समाजातील पारंपरिक धारणा, लिंगभेदावर आधारित भूमिका आणि निर्णयप्रकियेतील असमानता या घटकांमुळे महिलांचा राजकीय प्रवेश मर्यादित राहतो. त्यामुळे महिला आरक्षण विधेयकाचा मुद्दा हा केवळ संसदीय चर्चेपुरता मर्यादित नसून तो व्यापक सामाजिक परिवर्तनाशी थेट आणि खोलवर संबंधित आहे. ग्रामीण आणि शहरी भारतातील विकासातील असमतोल लक्षात घेता धोरणात्मक संतुलन साधणे अत्यावश्यक ठरते. या सर्व घटकांचा विचार करता हे स्पष्ट होते, की सध्याची स्थिती ही स्थगिती नसून दीर्घकालीन सामाजिक आणि राजकीय परिवर्तनाच्या दिशेने सुरू असलेली एक महत्त्वपूर्ण आणि अपरिहार्य प्रक्रिया आहे, जी भविष्यात अधिक समावेशक, न्याय्य आणि परिणामकारक धोरणनिर्मितीसाठी मजबूत पाया घालणारी ठरू शकते. राजकीय रणनीतीच्या दृष्टिकोनातून महिला आरक्षण विधेयकाचा विचार केला तर ते केवळ एक कायदेशीर प्रस्ताव न राहता दीर्घकालीन सत्ताकारणाच्या व्यापक आराखड्याचा निर्णायक घटक ठरते. आधुनिक भारतीय राजकारणात धोरणे तात्कालिक गरजांवर आधारित न राहता भविष्यातील सामाजिक बदल, मतदारसंघीय गणिते आणि निवडणूक परिणाम यांचा सखोल विचार करून आखली जातात.या पार्श्वभूमीवर १०६ वी घटनादुरुस्ती ऐतिहासिक महत्त्वाची ठरते, ज्याद्वारे लोकसभा आणि राज्य विधानसभांमध्ये महिलांसाठी ३३ टक्के आरक्षणाची तरतूद करण्यात आली आहे. या तरतुदीची अंमलबजावणी तत्काळ न होता लोकसभा परिसीमनानंतर लागू होणार असल्याने टप्प्याटप्प्याने पुढे जाणारी नियोजित प्रक्रिया आहे. ही तरतूद दीर्घकालीन राजकीय नियोजनाचे स्पष्ट उदाहरण आहे, कारण तिची अंमलबजावणी टप्प्याटप्प्याने केली जाणार आहे, कारण ती राजकीय स्थैर्य, लोकसंख्येचे प्रमाण, प्रादेशिक संतुलन आणि प्रतिनिधित्वाचे न्याय्य विभाजन या सर्व घटकांचा समतोल राखण्याचा प्रयत्न करते. त्यामुळे सध्याचा अडथळा सुविचारित धोरणात्मक प्रक्रियेचा एक नैसर्गिक भाग मानला जातो. म्हणूनच त्या निमित्ताने होत असलेले विचारांचे, भूमिकांचे आदानपदान लोकशाही व्यवस्थेतला एक महत्वाचा टप्पा मानला पाहिजे.

# सिंचन कायदा अंमलात आणा

**जर सिंचन कायदा अंमलात आला, तर पाणीवाटपातील अन्याय आपोआप थांबेल, कालवे सुरक्षित राहतील आणि आपत्तीच्या काळात योग्य ती भरपाई मिळेल. याकडे सरकारने दुर्लक्ष केले, तर रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याशिवाय शेतकऱ्यांकडे दुसरा पर्याय राहणार नाही.**

**उत्तरार्ध**

महाराष्ट्र सिंचन अधिनियम १९७६ हा कायदा एक जानेवारी १९७७ पासून लागू झाला. मात्र या कायद्याला नियम नसल्याचा आणखी एक भीषण परिणाम म्हणजे सिंचनाच्या पायाभूत सुविधांची होणारी तोडफोड ! समृद्धी एक्स्प्रेस वेच्या बांधकामादरम्यान एमएसआरडीसी आणि त्याच्या कंत्राटदाराने अप्पर वर्धा प्रकल्पाची कालवा व्यवस्था मोठ्या प्रमाणात उद्ध्वस्त केली, असे वृत्त २९ ऑगस्ट २०२२ रोजी एका वृत्तपत्राने दिले होते. विशेष म्हणजे यासाठी जलसंपदा विभागाची कोणतीही परवानगी किंवा ना-हरकत प्रमाणपत्र (एनओसी)घेण्यात आले नव्हते. यामुळे ३६० हेक्टर सिंचनयोग्य जमिनीचे कायमचे नुकसान झाले. धामणगाव आणि चांदूर रेल्वे तालुक्यातील सिंचन वितरिका (डिस्ट्रिब्युटरीज) वाहतुकीमुळे उद्ध्वस्त झाल्या. हाच प्रकार कोहाळ लघु सिंचन प्रकल्प, यवतमाळमधील नेर तालुका, वर्ध्यातील बोर मोठा प्रकल्प आणि पंचधारा मध्यम प्रकल्पातही घडला आहे.

महाराष्ट्र सिंचन अधिनियम १९७६ च्या कलम ९३ (कालव्याचे नुकसान केल्यास शिक्षा) आणि कलम ९४ (कालव्याच्या स्थिरतेला धोका) नुसार हा दखलपात्र गुन्हा आहे. यासाठी पोलिस विना वॉरंट अटक करू शकतात. परंतु हा कायदा कागदावरच राहिला आहे आणि महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ सारख्या सरकारी कंपन्या बिनधास्तपणे कालवे फोडत आहेत. महाराष्ट्र सरकारने एक लाख कोटींहून अधिक किमतीचे ग्रीनफिल्ड एक्स्प्रेसवे प्रकल्प जाहीर केले आहेत, ज्यामुळे भविष्यात महाराष्ट्रातील एकही मोठा सिंचन प्रकल्प असणार नाही की त्यात अशी नासाडी झाली नाही.

**बागायती जमीन, जिरायती मोबदला**

नियमांच्या अभावाचा सर्वांत मोठा आर्थिक फटका शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्तीच्या काळात बसतो. पूर किंवा अवकाळी पावसामुळे पिकांचे नुकसान झाल्यास राष्ट्रीय आपत्ती निवारण निधीच्या (एनडीआरएफ) निकषांनुसार भरपाई दिली जाते. हे निकष बागायती आणि जिरायती जमिनीसाठी वेगवेगळे आहेत. बागायती जमीन : १७,००० रु. प्रति हेक्टर (राज्याचे वाढीव पॅकेज ५०,०००+ रु.), जिरायती जमीन : ८,५०० रु. प्रति हेक्टर, लाभक्षेत्र अधिसूचित नसल्यामुळे सरकार बहुतेकदा बागायती क्षेत्रातील शेतकऱ्यांनाही 'जिरायती' या सदराखाली भरपाई देते. यामुळे शेतकऱ्याला ८,५०० प्रति हेक्टरचे नुकसान सोसावे लागते.

गेल्या दहा वर्षांत (२०१५-२०२४) केवळ अवकाळी पावसाने ५१९ लाख हेक्टर क्षेत्राचे नुकसान केले आहे. समजा, यातील फक्त ६० लाख हेक्टर हे सिंचित कमांड क्षेत्रातील आहे, ज्यांना कमी भरपाई मिळाली. ८,५०० प्रति हेक्टरच्यातफावतीने हा आकडा



होतो : ६० लाख हेक्टर × ८,५०० रुपये - ५,१०० कोटी रु. ही रक्कम फक्त किमान दराच्या तफावतीची आहे. राज्याच्या वाढीव पॅकेजनुसार (५०,००० रु.) हा फरक पाहिल्यास ही रक्कम हजारो कोटींनी वाढू शकते. ही रक्कम म्हणजे शेतकऱ्यांच्या खिशातून सरकारने कायदेशीर पाठबळ नसतानाही हिरावलेला पैसा आहे.

**संवैधानिक तत्त्वांची पायमल्ली?**

अखिल भारतीय किसान सभेने आपल्या निवेदनात हेही स्पष्ट केले आहे की ही केवळ प्रशासकीय किंवा आर्थिक समस्या नसून संविधानाच्या मूलभूत चौकटीवरचा घाव आहे.

-कलम २१ (जीविताचा अधिकार) : सर्वोच्च न्यायालयाने 'पाण्याचा अधिकार' हा जीविताच्या अधिकाराचा भाग असल्याचे मानले आहे. नियमांअभावी हा अधिकार हिरावला जात आहे.

-पब्लिक ट्रस्ट डॉक्ट्रीन: पाणी हे सार्वजनिक संसाधन असून राज्य हे त्याचे विश्वस्त आहे. नियम न करणे म्हणजे विश्वस्त म्हणून कर्तव्यात कसूर करणे होय.

-कलम १४ (समानतेचा अधिकार) : समान परिस्थितीत असलेल्या बागायतदार शेतकऱ्यांना कमी भरपाई देणे हा भेदभाव आहे.

-कलम ३००-अ (मालमत्तेचा अधिकार) : योग्य प्रक्रियेशिवाय योग्य भरपाई न देणे ही मालमत्ता हिरावून घेण्याची कृती आहे.

**किसान सभेच्या पाच ठोस मागण्या**

-एक महिन्यात नियम अधिसूचित करा : महाराष्ट्र सिंचन अधिनियम, १९७६ अंतर्गत नियम तयार करून ते ३० दिवसांच्या आत अधिसूचित करावेत. अन्यथा, अखिल भारतीय किसान सभा न्यायालयात अवमान याचिका दाखल करेल.

-लाभक्षेत्र व नद्यांची तातडीची अधिसूचना : सर्व प्रमुख व मध्यम प्रकल्पांसाठी कलम ३ (कमांड अधिसूचना) आणि कलम ११ (नदी अधिसूचना) अन्वये त्वरित राजपत्र जारी करावे.

-विशेष भरपाई न्यायाधिकरण: गेल्या दहा वर्षांत (२०१५-२०२६) ज्या शेतकऱ्यांना पूर व अवकाळी पावसाची योग्य भरपाई मिळाली नाही, त्यांच्या नुकसानीचे मूल्यमापन करण्यासाठी स्वतंत्र न्यायाधिकरण स्थापन करावे. ५०,००० रु. प्रति हेक्टर या वाढीव दराने व १२ टक्के व्याजासह भरपाई द्यावी.

-५,१०० कोटींची अंतरिम मदत : संपूर्ण मूल्यमापन होईपर्यंत, सध्याच्या वर्षी बाधित शेतकऱ्यांना तातडीची अंतरिम मदत म्हणून ही रक्कम त्वरित जाहीर करावी.

भूतकाळाचे लेखापरीक्षण : गेल्या दशकभरात वाटप केलेल्या सर्व आपत्ती नुकसान भरपाईची चौकशी करून ज्या शेतकऱ्यांची फसवणूक झाली त्यांना आपोआप उर्वरित रक्कम मिळण्याची यंत्रणा करावी.

१९९९ च्या चितळे आयोगाच्या अहवालात सिंचन विभागातील गोंधळ आणि नियमांच्या अभावाची नोंद होती.त्याला २७ वर्षे उलटून गेली तरी परिस्थिती'जैसे थे' आहे. महाराष्ट्रातील शेतकरी वारंवार पीकविम्याच्या प्रतीक्षेत आणि कर्जमाफीच्या आशेवर जगतो. पण जर सिंचन कायदाच अंमलात आला, तर पाणीवाटपातील अन्याय आपोआप थांबेल, कालवे सुरक्षित राहतील आणि आपत्तीच्या काळात योग्य ती भरपाई मिळेल. आता सरकार कृती करते की न्यायालयाच्या अवमानाच्या मार्गाने जाते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. सरकारने दुर्लक्ष केले, तर रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याशिवाय शेतकऱ्यांकडे दुसरा पर्याय राहणार नाही, असा स्पष्ट इशाराही या लेखाद्वारे देत आहे. शेतकरी बांधवांनो, हा प्रश्न फक्त कायद्याचा नाही, तर तुमच्या पोटातील घास आणि शेतातील पिकाशी निगडित आहे. सरकार जागे होईपर्यंत आपण जागरूक राहणे, ही गरज आहे.

**राजन क्षीरसागर**
मो.९८६०४८८८६०
(लेखक अखिल भारतीय किसान सभेचे अध्यक्ष आहेत.)

# ममता सत्तेवर रहाणार की जाणार ?

पश्चिम बंगालचे एक वैशिष्ट्य आहे,ते?म्हणजे, तेथील जनतेचा एखाद्या राजकीय पक्षावर विश्वास बसला की ती (जनता) त्या पक्षाला लवकर सत्तेवरून खाली उतरवत नाही.इतर राज्यांप्रमाणे अँटी इन्क्युंबन्सी फॅक्टरचा, पश्चिम बंगालमध्ये फारसा प्रभाव पडत नाही.पश्चिम बंगालचा आजवरचा राजकीय इतिहास पाहिला तर, कोणताही सत्ताधारी पक्ष सत्तेवरून लवकर पायउतार झालेला नाही.याचे कारण पश्चिम बंगाल मधील जनतेला 'जैसे थे' परिस्थिती फार आवडते.पश्चिम बंगालवर सुरूवातीला २५ वर्षे कॉंग्रेसने राज्य केले.त्याला अपवाद फक्त १९६७ ते १९७२ या काळात सत्तेवर आलेल्या बांगला कॉंग्रेस आणि युनायटेड फ्रंट या अल्पकालीन राजवटींचा.त्या काळात,अजय मुखर्जी आणि प्रफुल्ल चंद्र घोष हे अल्पकाळासाठी मुख्यमंत्री पदावर राहिले.१९७२ साली सिद्धार्थ शंकर रे यांच्या नेतृत्वाखालील कॉंग्रेसचे सरकार पश्चिम बंगालमध्ये सत्तेवर आले.हे सरकार आणीबाणीच्या काळात पश्चिम बंगालमध्ये सत्तेवर होते.

१९७७ साली आणीबाणीच्या पार्श्वभुमीवर झालेल्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत, मार्क्सवादी कम्युनिस्ट प्रणीत डाव्या आघाडीचे सरकार राज्यात सत्तेवर आले.ते सरकार कंटाळा येईपर्यंत सत्तेवर राहिले.अखेर ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील तृणमूल कॉंग्रेसने २०११ साली झालेल्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत डाव्या आघाडीचा पराभव केला आणि डाव्या आघाडीची ३४ वर्षांची प्रदीर्घ राजवट संपुष्टात आणली.अर्थात त्या पराभवाला पार्श्वभूमी होती,ती नंदिग्राम मधील शेतकरी आंदोलनाची.एसइझेड (स्पेशल इकॉनॉमिक झोन )साठी नंदिग्राम येथील शेतकऱ्यांच्या जमिनी बळजबरीने ताब्यात घेण्याचा प्रयत्न, त्यावेळी पश्चिम बंगालमध्ये सत्तेवर असलेल्या, बुद्धदेव भट्टाचार्य यांच्या नेतृत्वाखालील सरकारने चालवला होता. त्याला विरोध करण्यासाठी तेथील शेतकऱ्यांनी आंदोलन सुरू केले होते.त्या आंदोलकांवर पोलिसांनी केलेल्या गोळीबारात काही आंदोलक मृत्युमुखी पडले होते. ममता बॅनर्जी यांनी त्या आंदोलकांचे नेतृत्व करुन,तो विषय लावून धरला होता.अखेर सरकारने त्या आंदोलकांसमोर नमते घेतले होते.नंदिग्राम प्रकरणाचा नंतर ममता बॅनर्जी यांच्या पक्षाला २०११ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत फायदा झाला.पश्चिम बंगाल मधील जनतेने त्या निवडणुकीत तृणमूल कॉंग्रेसला भरभरून मतदान केले आणि डाव्या आघाडीला सत्तेवरुन खाली उतरवले.

२०११ साली राज्यात सत्तेवर आल्यानंतर तृणमूल कॉंग्रेसने आपली संघटना मजबूतपणे बांधली.दंडेलशाहीचा वापर करून पक्षाने निरनिराळ्या निवडणुका जिंकल्या.ही कला पक्षाने, मार्क्सवादी कम्युनिस्ट प्रणीत डाव्या आघाडीकडून अवगत केली होती.ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने, बांगलादेश मधून, पश्चिम बंगालमध्ये घुसखोरी करणाऱ्यांना उत्तेजन देऊन,आपली व्होट बँक तयार केली आणि त्या व्होट बँकेच्या मदतीने गेली पंधरा वर्षे पश्चिम बंगालवर बिनधोकपणे राज्य केले.त्याचबरोबर राज्यात निरनिराळ्या कल्याणकारी योजना सुरू करून,जनतेचा भरभक्कम पाठिंबा मिळवला.महिलांसाठी, विद्यार्थ्यांसाठी, बेरोजगार युवकांसाठी निरनिराळ्या योजना सुरू करून ममतांनी त्यांना खूष ठेवले आहे. विशेषत: ममतांनी महिलांसाठी सुरू केलेली 'लक्ष्मीर भंडार' ही योजना राज्यातील महिला वर्गामध्ये अतिशय लोकप्रिय ठरली असून या योजनेच्या जोरावर, ममतांच्या तृणमूल कॉंग्रेसला महिला वर्गाकडून निवडणुकीत मोठ्या प्रमाणात मतदान केले जात आहे.

वरील सर्व गोष्टी ममतांना अनुकूल असल्यातरी यावेळची निवडणूक सर्वार्थाने वेगळी आहे.एसआयआर प्रक्रियेत राज्यातील सुमारे ९१ लाख मतदारांची नावे मतदार यादीतून वगळण्यात आली आहेत.विशेषत: बांगलादेशच्या सीमेला लागून असलेल्या, पश्चिम बंगाल मधील, मुर्शिदाबाद, नडिया,माल्डा आणि उत्तर दिनाजपूर या जिल्ह्यांमध्ये, मतदार



यादीतून वगळण्यात आलेल्या मतदारांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे.अल्पसंख्य बहूल असलेले हे जिल्हे आजवर, तृणमूल कॉंग्रेसचे बालेकिल्ले राहिले आहेत.एसआयआर प्रक्रियेत या जिल्ह्यांमधील मतदारांची नावे मोठ्या प्रमाणात वगळण्यात आल्याने,याचा फटका, तृणमूल कॉंग्रेसला, या खेपेच्या निवडणुकीत बसण्याची दाट शक्यता आहे.यंदाच्या निवडणुकीत पश्चिम बंगालमध्ये केंद्रीय सुरक्षा दलाची मोठ्या प्रमाणात असलेली उपस्थिती, तृणमूल कॉंग्रेससाठी प्रतिकूल ठरणार आहे.निवडणुकांचा आजवरचा इतिहास पाहिला तर, एखाद्या राज्यात होणाऱ्या निवडणुकीत इतक्या मोठ्या प्रमाणात केंद्रीय सुरक्षा दल तैनात असणे ही गोष्ट अभूतपूर्व अशीच मानावी लागेल.इतका कडेकोट बंदोबस्त असल्याने सत्ताधारी पक्षाच्या कार्यकर्त्यांना दादागिरी करता येणार नाही.मतदार निर्भयपणे मतदान करु शकतील.हिंसाचार रोखता येईल.बोगस मतदानाला आळा घालता येईल.एसआयआर प्रक्रियेत, मृत्यू पावलेल्या मतदारांची नावे वगळण्यात आल्याने, सत्ताधारी पक्षाच्या कार्यकर्त्यांना,त्यांच्या नावावर बोगस मतदान करता येणार नाही.या संबंधीचा आरोप, तृणमूल कॉंग्रेसच्या कार्यकर्त्यांवर विरोधी पक्षांकडून वारंवार करण्यात आला आहे.

ममतांनी आपल्या निवडणूक प्रचार सभांमध्ये,बंगाली अस्मिता या मुद्द्यावर विशेष भर दिला आहे.भाजप हा बाहेरचा पक्ष असून बंगाली अस्मितेशी त्याला काहीही देणेघेणे नाही,असा त्यांच्या म्हणण्याचा उद्देश आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी,गृहमंत्री अमित शहा वगैरे भाजपाचे बडे नेते निवडणुकीपुरते राज्यात येतात आणि नंतर गायब होतात असा त्यांच्या म्हणण्याचा मतितार्थ आहे.गमतीची गोष्ट म्हणजे भाजप हा बाहेरचा पक्ष कसा असू शकतो,ही न पटणारी गोष्ट आहे.भाजपचा पुर्वावतार असलेल्या जनसंघाची स्थापना एका बंगाली माणसाने केली होती.त्या माणसाच नाव होत डॉ.शामाप्रसाद मुखर्जी.जो पक्ष बंगाली मातीत रुजला तो पक्ष बाहेरचा कसा असू शकतो? पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा,उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ हे बंगाल बाहेरचे नेते निवडणूक प्रचारात अग्रभागी असल्याने ममतांकडून भाजप हा बाहेरचा पक्ष असल्याचा आरोप केला जातो.पण,त्यात काही तथ्य नाही. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी जनसंघाची स्थापना केल्यानंतर, दोनच वर्षांत त्यांचे निधन झाले.त्यामुळे पश्चिम बंगालमध्ये पक्ष संघटना बांधणीसाठी त्यांना पुरेसा वेळच मिळाला नाही.त्यानंतर जनसंघाच्या तत्कालीन नेतृत्वाने पश्चिम बंगालमधील संघटना बांधणीकडे गांभीर्याने लक्ष पुरविले नाही.१९८० साली भाजपाची स्थापना झाल्यानंतरही तत्कालीन पक्षनेतृत्वाने पश्चिम बंगालमधील संघटना बांधणीकडे पुरेसे लक्ष दिले नाही.त्याचा परिणाम म्हणजे जनसंघाला आणि नंतर भाजपाला १९९१ च्या विधानसभा निवडणुकीपर्यंत, पश्चिम बंगालमध्ये एक टक्क्याच्या आसपासही मते मिळाली नाहीत.१९९१ मध्ये झालेल्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत, रामजन्मभूमी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर, भाजपाला अकरा टक्के मते मिळाली.मात्र भाजपा ची ती प्रगती त्या निवडणुकीपुरतीच मर्यादित राहिली.

नंतर विधानसभा निवडणुकीत दहा टक्क्यांपेक्षा जास्त मते मिळवण्यासाठी भाजपाला, पंचवीस वर्षे वाट पहावी लागली.२०१६ मध्ये झालेल्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत भाजपाला दहा टक्क्यांपेक्षा जास्त मते मिळाली.त्याचे श्रेय अर्थातच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या लोकप्रियतेला होते.त्यानंतर मात्र पश्चिम बंगालमध्ये भाजपाने मागे वळून पाहिले नाही.२०१९ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपाला ४० टक्क्यांपेक्षा जास्त मते मिळाली आणि २०२१ च्या विधानसभा निवडणुकीत व २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपाला मिळालेल्या मतांची टक्केवारी ४० च्या आसपास राहिली.भाजपाला यंदाच्या निवडणुकीत यश मिळाले तर त्याचे बरेचसे श्रेय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या लोकप्रियतेला द्यावे लागेल.त्याच बरोबर पश्चिम बंगाल विधानसभेतील विरोधी पक्षनेते सुवेंदू अधिकारी हेही निवडणूक प्रचारात अग्रभागी आहेत.त्यांच्या रूपाने एक मासबेस असलेला स्थानिक नेता भाजपाला गवसला आहे.ते मुळचे तृणमूल कॉंग्रेसचे असले तरी भाजपामध्ये त्यांनी चांगला जम बसवला आहे.गेल्या खेपेस त्यांनी नंदिग्राम मधून खूद्द, ममता बॅनर्जी यांचा पराभव केला होता.या खेपेस त्यांनी ममतांना,त्यांचा गढ असलेल्या भवानीपूर मतदारसंघातून कडवे आव्हान दिले आहे.पश्चिम बंगालमध्ये हळूहळू भाजपात स्थानिक नेतृत्व तयार होत आहे.सुवेंदु अधिकारी यांच्याशिवाय, दिलीप घोष,सुकांता मुजुमदार,समिक भट्टाचार्य यांच्यासारखे स्थानिक नेते निवडणूक प्रचारात अग्रभागी आहेत.या पार्श्वभूमीवर यंदाच्या निवडणुकीत,भाजपा, तृणमूल कॉंग्रेसला तोडीसतोड लढत देणार, हे वेगळे सांगण्याची गरज नाही.

**अभय गोखले**

## निवडणूक आणि पैसा

नुकतीच पश्चिम बंगालमधील एक बातमी वाचली. तिथे निवडणुका सुरु आहेत. एका मतदार संघात कॉंग्रेसच्या एका नेत्याच्या घरी मतदारांना वाटण्यासाठी खूप पैसे आ… आहेत,अशी निवडणूक आयोगाला माहिती मिळाली. त्यामुळे अत्यंत कर्तव्यदक्ष व तत्पर निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यां… त्या घरावर धाड टाकून ती रक्कम पकडली व रकमेच्या चैल्या ते आपल्या जीपकडे नेत असताना काही गुंडांनी त्यांच्यावर हल्ला करून थैल्या पळवल्या. या प्रकारामुळे परिसरातील नागरिक- विशेषतः मतदार-अतिशय संतापले, ती रक्कम परत मिळवून मतदारांमध्ये वाटण्यात यावी असा त्यांचा आक्रोश होता.या प्रकरणावरून मला एक कल्पना सुचली. आयपीएल मध्ये जसा खेळाडूंचा लिलाव होतो आणि (प्रेक्षक वगळता) सर्व संबंधित मंडळींचा आर्थिक लाभ होतो तशाप्रकारची काही योजना निवडणुकीसंबंधी करण्यास हरकत नाही. म्हणजे देशातील मोठमोठ्या भांडवली अथवा औद्योगिक व व्यापारी कंपन्यांनी प्रत्येक लोकसभा किंवा विधानसभा मतदार संघातील वेगवेगळ्या … राजकीय पक्षांचे उमेदवार स्पॉन्सर करावे. त्या … त्या मतदार संघातील सर्व मतदारांना त्यांच्या … आर्थिक स्थितीप्रमाणे निवडणुकी पूर्वी जाहीर …न वाटून टाकावी. ज्या उमेदवाराच्या स्पॉन्सर कडून सर्वाधिक पैसे मिळतील त्यालाच स्वाभाविकपणे अधिक मते मिळतील. पुढील पाच वर्षे उमेदवाराने आपल्या स्पॉन्सर सोबत जे काही आगाऊ करार केले असतील, त्यांचे पालन करावे. मग लाडकी बहिण किंवा अन्य योजनांवर सरकारचा पैसा खर्च होणार नाही. निवडणूक पद्धती अधिक पारदर्शक होईल आणि मतदारांसह सर्वांचेच भले होईल.

**पु.रा.अमरावतीवाला**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सत्य

# घाटंजीत अवैध सावकारांवर धडक कारवाई
## वसंत नगरात झडती, ७ आक्षेपार्ह कागदपत्रे जप्त



**जनमाध्यम प्रतिनिधी**

घाटंजी : जिल्ह्यात वाढत्या अवैध सावकारीला आळा घालण्यासाठी प्रशासनाने कडक पाऊल उचलत घाटंजी येथील वसंत नगर परिसरात मोठी कारवाई केली. महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ अंतर्गत सावकारी पथकाने छापा टाकत संशयित अवैध सावकारांच्या घरांची झडती घेतली आणि महत्त्वाची कागदपत्रे जप्त केली..

मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, यवतमाळ यांच्या आदेशानुसार दि. २३ एप्रिल २०२६ रोजी ही कारवाई करण्यात आली. गैरअर्जदार प्रकाश अनंतराव खंदार व इतर दोघे (रा. वसंत नगर, ता. घाटंजी, जि. यवतमाळ) यांच्या निवासस्थानी कलम १६ अंतर्गत झडती घेण्यात आली. या दरम्यान ७ संशयास्पद दस्तऐवज, सौदेपत्रे व खरेदीखत जप्त करण्यात आले.

ही कारवाई प्रतिभा उज्ज्वल सोनटक्के व उज्ज्वल उमेशराव सोनटक्के यांनी २७ मार्च २०२६ रोजी दिलेल्या तक्रारीनंतर करण्यात आली. संबंधितांकडून अवैध सावकारी सुरू असल्याची तक्रार प्राप्त झाल्यानंतर पथकाने पडताळणी करत थेट कारवाई केली. जप्त कागदपत्रांची सखोल तपासणी करण्यात येणार असून, त्याआधारे संबंधितांवर महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ नुसार पुढील कडक कारवाई प्रस्तावित असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. ही कारवाई जिल्हा उपनिबंधक नानासाहेब चव्हाण यांच्या नियोजनात पार पडली. सावकारी पथक प्रमुख ए. के. नाईक यांच्यासह विविध सहकार विभागातील अधिकारी, महसूल व पोलीस प्रशासनाचे कर्मचारी, तसेच पंचांच्या उपस्थितीत ही झडती घेण्यात आली. जिल्हाधिकारी विकास मीना (भा.प्र.से.) व पोलीस अधीक्षक कुमार चिंता (भा.पो.से.) यांच्या मार्गदर्शनाखाली सहकार, महसूल व पोलीस विभागाच्या संयुक्त पथकाने ही कारवाई यशस्वीरीत्या पार पाडली. अवैध सावकारीविरुद्ध प्रशासनाचा इशारा

या कारवाईमुळे जिल्ह्यातील अवैध सावकारांमध्ये खळबळ उडाली असून, अशा बेकायदेशीर व्यवहारांवर प्रशासनाचा कठोर नजर असल्याचा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे.

# राळेगाव प्रकरण तापले: "खोट्या आरोपांनी आदिवासी समाज बदनाम"
## 28 एप्रिलला मोर्चा, सत्ताधाऱ्यांवर कारवाईची मागणी

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - राळेगाव येथील कथित आदिवासी मुली विक्री प्रकरणावरून जिल्ह्यातील राजकारण आणि सामाजिक वातावरण अधिकच तापले असून, ठोस पुराव्याअभावी करण्यात आलेल्या आरोपांमुळे "आदिवासी समाजाची जाणीवपूर्वक बदनामी" होत असल्याचा आरोप करत विविध संघटना आणि विरोधक आक्रमक झाले आहेत. याच पार्श्वभूमीवर यवतमाळ येथे ॲड. सीमा तेलंग यांच्या नेतृत्वात संविधान जागर व आदिवासी युवकांकडून पत्रकार परिषद पार पडली.



पत्रकार परिषदेत बोलताना ॲड. सीमा तेलंग यांनी सत्ताधाऱ्यांवर जोरदार टीका करत आदिवासी विकासमंत्री, राज्याचे गृहमंत्री तसेच भाजप जिल्हाध्यक्ष यांच्यावर निशाणा साधला. "मतदारसंघ सांभाळता येत नसेल तर संबंधित मंत्र्यांनी राजीनामा द्यावा, महिलांवरील अत्याचार थांबत नसतील तर गृहमंत्र्यांनी जबाबदारी स्वीकारावी," अशी मागणी त्यांनी केली. तसेच "आदिवासी समाजाची बदनामी करणाऱ्यांवर ॲट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा दाखल करावा," अशी ठाम भूमिका मांडण्यात आली."34 आदिवासी मुलींच्या विक्री"संदर्भात पसरवण्यात आलेला प्रचार पूर्णतः निराधार असल्याचा दावा करत, हा प्रकार समाजात भीती व तणाव निर्माण करण्यासाठी मुद्दाम रचला गेल्याचा आरोप करण्यात आला. याआधीही भाजप आमदार राजू तोडसाम यांनी या दाव्याचे खंडन करत तो अपप्रचार असल्याचे स्पष्ट केले होते, याची आठवण करून देण्यात आली. दरम्यान, या संपूर्ण प्रकरणामुळे राळेगाव तालुक्यातील आदिवासी मुलींकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन बदलण्याची भीती व्यक्त करण्यात आली. विवाह व इतर सामाजिक व्यवहारांमध्ये अडथळे निर्माण होऊ शकतात, अशी चिंता व्यक्त करत "ही बदनामी अक्षम्य आहे," असेही नमूद करण्यात आले. या प्रकरणाच्या निषेधार्थ 28 एप्रिल रोजी समता मैदान येथून जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयावर मोर्चा काढण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली. अखिल भारतीय आदिवासी विकास परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष लकी जाधव यांच्या नेतृत्वात होणाऱ्या या मोर्चाद्वारे संबंधितांवर ॲट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची मागणी केली जाणार आहे.एका बाजूला राजकीय स्तरावर आरोपांची मालिका सुरू असताना, दुसरीकडे पोलीस प्रशासनाने ठोस पुराव्याशिवाय निष्कर्ष काढण्यास नकार देत संयमी भूमिका घेतली आहे. त्यामुळे "आरोप विरुद्ध तपास" असा संघर्ष निर्माण झाला असून, सायबर तपास आणि पुढील चौकशी अहवालानंतरच या प्रकरणाचे वास्तव स्पष्ट होण्याची शक्यता आहे. या वादाला धार्मिक रंग देत सामाजिक सलोखा बिघडवण्याचा प्रयत्न झाल्याचाही आरोप करण्यात आला. "जिल्ह्यात तणावाचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न झाला, असे सांगत संबंधितांनी जबाबदारी स्वीकारावी, अशी मागणी पत्रकार परिषदेला ॲड. सीमा तेलंग, जयसिंग चव्हाण, अमित ढोबळे, गोविंद चव्हाण, विनोद दोन्दल यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

पालकमंत्र्यांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह : जिल्ह्यात इतके गंभीर प्रकरण घडत असताना पालकमंत्र्यांनी अद्याप स्पष्ट भूमिका मांडलेली नाही.यावरून प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले. "घटनेचे गांभीर्य लक्षात घेता त्यांनी तत्काळ भूमिका स्पष्ट करणे अपेक्षित होती असे मत व्यक्त करण्यात आले. शासनाकडून समाधानकारक कारवाई न झाल्यास न्यायालयात दाद मागण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला.

## • वेचक



### कर्मचाऱ्यांच्या संपात तिस-या दिवशीही तोडगा नाही

यवतमाळ - राज्य कर्मचाऱ्यांच्या संपात तिस-या दिवशीही तोडगा न निघाल्यामुळे बेमुदत संप उद्यालाही सुरू राहणार बअसल्याचे आज संपवाल्यांनी कळविले आहे. उन्हाची तीव्रता लक्षात घेता राज्य सरकारी कर्मचार्यांनी संपाचे ठिकाण जिल्हा परिषद बचत भवनात हलविले.संपातील कर्मचाऱ्यांचा उत्साह आजही कायम होता. माध्यवर्तीच्या सुकाणू समितीसोबत काल सचिवस्तरीय बैठक संपन्न झाली. मात्र बैठकीचे इतिवृत्त अप्राप्त असल्याने संप कायम ठेवण्यात आला. नियमित कर्मचारी संपावर असल्याने अनेक कार्यालये कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या भरवशावर सुरू असून शासनासाठी ही लाजिरवाणी बाब असल्याचे संपात सहभागी कर्मचार्यांनी मनोगत व्यक्त केले. हळू हळू प्रशासन यंत्रणा कंत्राटी लोकांना बहाल करून ए.आय. व चॅट जीपीटी च्या वापराने भविष्यात कर्मचारी कपातीचे धोरण शासन राबवू शकते त्यामुळे नवीन तंत्रज्ञानाचे फायदे व तोटे लक्षात घेऊन कर्मचार्यांनी संघटित राहण्याची गरज असल्याचेही मत व्यक्त केले. जिल्हा परिषद पतसंस्था परिसरात कर्मचार्यांनी प्रचंड घोषणा दिल्या. आज जर संपाबाबत सन्मानजनक तोडगा निघाला नाही तर संपाची तीव्रता वाढविण्याचा इशारा देण्यात आला आहे.

### सायन्स अँड आर्ट्स पुसद येथे बक्षीस वितरण समारंभ!

पुसद - गुलाम नबी आझाद उर्दू हायस्कूल व ज्युनियर कॉलेज ऑफ सायन्स अँड आर्ट्स पुसद मध्ये मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा टप्पा 03 अंतर्गत घेण्यात आलेल्या वेग वेगळ्या उपक्रमाबद्दल सहभागी विद्यार्थ्यांना बक्षीस देण्यात आले या कार्यक्रमाचे अध्यक्षा फराह दिबा मॅडम होत्या तर प्रमुख म्हणून बिल्कीस मॅडम, तारिक अहेमद सर होते तर आयोजक मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियानाचे नोडल अधिकारी सैय्यद सलमान सर होते. यामध्ये अभियाना अंतर्गत निबंध स्पर्धा,वारली चित्रकला स्पर्धा,वक्तृत्व स्पर्धा, हस्तकला स्पर्धा, आदर्श विद्यार्थी स्पर्धा आशा वेगवेगळ्या उपक्रमाचे बक्षीस प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांकानुसार देण्यात आले. बक्षीस मिळाल्या नंतर विद्यार्थी खूपच आनंदित झाले आणि उत्साहपूर्ण मनोगत व्यक्त केले.आशा प्रकारच्या प्रोत्साहनामुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचे विकास होतो व त्यांच्या कलागुणांना वाव मिळते. विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी आणि प्रोत्साहना करिता ठेवण्याला या बक्षीस वितरण समारंभ करिता शाळेचे मुख्याधापक मोहम्मद सादिक शेख सरांनी नोडल ऑफिसर सैय्यद सलमान सरांचे या कार्याचे कौतुक केले आणि गुणवंत विद्यार्थ्यांना पुढील वाटचाली करिता शुभेच्छा दिल्या.

# पुसद नगरपरिषद मधील जन्म:मृत्यू विभागात अवैध जन्म-मृत्यु नोंदणीची तात्काळ चौकशी करा

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पुसद - नगरपरिषद अंतर्गत येत असलेल्या जन्म/मृत्यू नोंद विभागातील झालेल्या जन्म व मृत्यू अवैध नोंदणीची चौकशी करून फौजदारी व निलंबनाची कारवाई करण्यासंदर्भात पत्रकार तथा सामाजिक कार्यकर्ते कांबळे यांनी मुख्याधिकारी यांच्याकडे तक्रार दाखल केली आहे. सविस्तर वृत्त असे की नगरपरिषद अंतर्गत जन्म व मृत्यू नोंदणी विभागात नोंद नसलेले नागरिकांना नोंद करण्यासाठी शासनाच्या नियमाप्रमाणे तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार त्यांच्याकडे अधिकार देण्यात आले आहे.

त्यानुसार नगरपरिषद कडून नोंद नसलेल्या नागरिकांना नोंद नसल्या बाबतचा दाखला घेऊन सर्व कागदपत्राची पूर्तता करून केस दाखल करावी लागते. पुढे तहसीलदार यांच्याकडून नोटीसद्वारे दैनिक वृत्तपत्रात कुणाचा काही आक्षेप असल्याबाबत नोटिस प्रसिद्ध केल्यानंतर काही दिवसांनी तहसीलदार त्यांनी केलेल्या आदेशाची प्रत घेऊन नगरपरिषद मध्ये जन्म व मृत्यूची नोंद करावी लागते. या सर्व गोष्टी करण्यासाठी बराच कालावधी लागतो त्यामुळे काही लोकांना जन्म मृत्यू नोंदणी विभागातील काही दलाल हे नागरिकांना डायरेक्ट सल्ला देऊन नोंद करण्याबाबत १०ते १५ हजार रुपये आर्थिक देवाण-घेवाण करून अशा अनेक अवैध जन्म-मृत्यूच्या नोंदी करण्यात आलेल्या आहे. याबाबत अनेक लोकांनी तक्रारी केल्या असून त्या तक्रारीची अद्याप पर्यंत कोणत्याही प्रकारची कारवाई झालेली नाही. दुसरा प्रकार शहरात व बाहेरगावी राहत असलेले काही नागरिक जन्म व मृत्यू दाखल्यासाठी येतात अर्ज करून आठ- दहा दिवस त्यांना फिरवण्याचे काम हा बुलबुले करत असतो नंतर त्यांचे दलाल हे अर्जदारांना भेटून ५००/ ते १०००/ रुपये जन्म व मृत्यू दाखल्याचे जादा घेऊन त्यांना तात्काळ दाखले काढून देण्याचे काम करतात असा गोरख धंदा येथे सुरु आहे. शासनाने कळविल्याप्रमाणे तहसीलदार यांच्या आदेशानुसार ज्या लोकांचे जन्म किंवा मृत्यू नोंद नगरपरिषदेला नसल्यामुळे यांच्या आदेशाविना नोंदी घेण्यात येऊ नये असा शासनाचा कडक नियम असतांना सुद्धा सदर लिपिक संजय बुलबुले यांनी हजारो रुपये घेऊन जन्म व मृत्यूच्या अवैध नोंदणी केलेल्या आहे. तसेच सामान्य नागरिकांना उद्धटपणे बोलून अरेरावीची भाषा करतो व अंगावर मारण्यासाठी सुद्धा जातो असा एक व्हिडियो मागील महिन्यात समाज माध्यमावर व्हायरल झाला होता परंतु ते प्रकरण चिघळण्या अगोदर समोरच्या व्यक्तींना मॅनेज करण्यात आले व प्रकरण रफादफा करण्यात आले. त्यामुळे लिपिक संजय बुलबुले यांच्या कार्यकाळात झालेल्या जन्म व मृत्यू नोंदीच्या संपूर्ण कागदपत्राची तपासणी करून चौकशी अंति जबाबदार आढळल्यास त्यांच्यावर फौजदारी व निलंबनाची कारवाई करण्यात यावी अन्यथा उपोषण आंदोलन करण्याचा इशारा तक्रारीतून देण्यात आला आहे..



# प्रभाग क्रमांक १४ मधील निकृष्ट दर्जाचे नाली बांधकाम केलेल्या कंत्राटदार व मजूर सोसायटीला ब्लॅकलिस्ट करा!

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पुसद - नगरपरिषद अंतर्गत प्रभाग क्रमांक १४ मधील लक्ष्मीनारायण नगर येथे होत असलेल्या सिमेंट कॉंक्रेट नालीचे बांधकाम हे इस्टिमेट प्रमाणे न करता अत्यंत निकृष्ट दर्जाचे होत असल्यामुळे सदर बांधकाम थांबवून चौकशी करण्यात यावी अशा विषयाची पुसद येथील रहिवासी तथा सामाजिक कार्यकर्ते यांनी उपविभागीय अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग पुसद यांच्या कडे तक्रार दाखल केली आहे.

तक्रारी मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे नगरपरिषद अंतर्गत येत असलेल्या प्रभाग क्रमांक १४ मध्ये पुसद बोरगडी रोड लगत असलेल्या लक्ष्मीनारायण नगर मध्ये सांडपाण्याच्या सिमेंट कॉंक्रेट नालीचे बांधकाम होत आहे. सदर बांधकाम हे वैशिष्ट्यपूर्ण योजनेतून मंजुर आहे, या कामाची अंदाजे रक्कम ४० लाख रुपये असून सदर काम हे कुलस्वामिनी मजूर सोसायटी यांच्या मार्फत करण्यात येत आहे. परंतु हे बांधकाम मंजुर सोसायटी व कंत्राटदार यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वर्क ऑर्डर तथा दिलेल्या एस्टिमेट प्रमाणे न करता अत्यंत निकृष्ट दर्जाचे मटेरियल वापरून सदर काम हे लाईन दोरीत व व्यवस्थित न करता वाकडे-तिकडे व नगरातील रोडच्या लांबी रुंदीला धरून माप न घेता अत्यंत निकृष्ट दर्जाचे करत असल्यामुळे या कामाची कॉलिटी इस्टिमेट प्रमाणे व्हायला पाहिजे तसे होतांना दिसत नाही, त्यामुळे ते बांधकाम येत्या पाच ते सहा महिन्यात भेगा पडून खचून जाणार आहे. त्यामुळे सदर नालीच्या कामाचे आपल्या मार्फत तक्रारदार यांना सोबत घेऊन चौकशी करण्यात यावी तसेच अभियंता कॉलिटी कंट्रोल अमरावती यांच्यामार्फत सदर कामाची तपासणी करून कारवाई करण्यात यावी तो पर्यंत सदर कामाचे (देयके, बिल) देण्यात येऊ अन्यथा आपणास जबाबदार धरण्यात येईल असाही तक्रारीत नमूद केले आहे. सदर तक्रार अर्जाची तात्काळ दखल न घेतल्यास सदर मागणीसाठी अधीक्षक अभियंता व जिल्हाधिकारी यवतमाळ यांच्या कार्यालयासमोर लोकशाही व संविधानीक मार्गाने जनहितार्थ उपोषणास बसून आंदोलन करण्यात येईल असाही इशारा तक्रारकर्ते यांनी दिला आहे.



सदर तक्रारी दोन महिने होऊनही अद्याप पर्यंत कनिष्ठ अभियंता मंदाडे यांनी सदर कामाची आद्यापर्यंत पाहणी सुद्धा केली नाही त्यामुळे उपविभागीय अभियंता सां.बां.विभाग उमाकांत कांबळे हे कोणत्या प्रकारे कारवाई करणार याकडे तक्रारदार तथा नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# उबाठासेनेचे जिल्हा समन्वयक संजय पळसकर यांच्या आंदोलनाच्या इशाऱ्याने प्रशासनाला आली जाग

**जनमाध्यम प्रतिनिधी**

उमरखेड - शहरासह तालुक्यातील रस्त्यांची अर्धवट अवस्थेत ठेवलेली कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करा , अन्यथा तिव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे जिल्हा समन्वयक संजय पळसकर यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन जनतेसाठी त्रासदायक ठरलेल्या रस्त्यांच्या कामांची तत्काळ दखल घ्यावी अन्यथा तिव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा दिल्यानंतर आठवड्याच्या आतच संबंधित ठेकेदाराकडून पुन्हा कामाला सुरुवात करण्यात आली आहे.

शिवसेना (उबाठा )जिल्हा समन्वयक संजय पळसकर यांनी उपविभागीय अधिकारी, उमरखेड यांच्यामार्फत दिलेल्या निवेदनात संबंधित बांधकाम विभागाने उमरखेड शहर आणि तालुक्यात अनेक ठिकाणी रस्ते खोदून ठेवले आहेत, ज्यामुळे वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण होत आहे. पुढे पावसाळा तोंडावर आला असताना ही कामे पूर्ण न झाल्यास चिखल आणि खड्ड्यांमध्ये पाणी साचून अपघातांची शक्यता नाकारता येत नाही . जीवितहानी झाल्यास त्याला संबंधित बांधकाम विभागाचे अधिकारी जबाबदार राहतील, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला होता . तसेच उमरखेड शहरात आंबेडकर पुतळा ते संजय गांधी चौक रस्ता खोदून सहा महिने लोटले पाऊस पडल्यास तलाव निर्माण होतो . छत्रपती शिवाजी महाराज चौकातही अशीच परिस्थिती आहे , काही सिमेंट रोडच्या बाजूला माती मिश्रित मुरूम टाकला जात असल्याचा आरोपही या पत्रात करण्यात आला यामुळे रस्त्याच्या मजबुतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. ल्हिाधिकाऱ्यांनी नागरिकांच्या या गंभीर समस्येकडे जातीने लक्ष घालून पावसाळ्यापूर्वी शहरातील व तालुक्यातील सर्व प्रलंबित रस्त्यांची कामे पूर्ण करण्याचे निर्देश द्यावेत, अशी मागणी करण्यात आली होती . प्रशासनाने तातडीने ही समस्या मार्गी न लावल्यास शिवसेना (उबाठा) उमरखेडच्या वतीने रास्ता रोको आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा उबाठा सेनेचे जिल्हा समन्वयक संजय पळसकर यांनी उपविभागिय अधिकाऱ्यांमार्फत जिल्हाधिकाऱ्यांना पाठविलेल्या निवेदनाद्वारे दिल्यानंतर संबंधित बांधकाम ठेकेदाराकडून आठवड्याच्या आत शहरातील पुसद रस्त्याच्या कामाला सुरुवात झाल्याने नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

संबंधित बांधकाम विभागाच्या ठेकेदारांकडून मागील जवळपास सहा महिन्यांपासून शहरातील रस्त्याची कामे अर्धवट स्थितीत सोडली होती त्या कामाला आता सुरुवात होऊन कामाने गती घेतली आहे .उमरखेड ते हरदडा या रमतगमत चाललेल्या रस्त्याच्या कामालाही प्रशासनाने संबंधित ठेकेदाराचे कान टोचून पावसाळ्यापूर्वी गती द्यावी अशी अपेक्षा ग्रामीण नागरिक प्रशासन व लोकप्रतिनिधीप्रती व्यक्त करीत आहे .

# "34 मुली बेपत्ता" आरोपांवरून आदिवासी समाज संतप्त..!
## बदनामी करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी

**जनमाध्यम प्रतिनिधी**

राळेगाव - यवतमाळ जिल्ह्यातील राळेगाव तालुक्यात आदिवासी समाजातील ३४ मुली बेपत्ता झाल्याच्या आणि मानवी तस्करीच्या संशयावरून काही राजकीय पदाधिकारी व हिंदू संघटनांकडून करण्यात आलेल्या आरोपांमुळे आदिवासी समाजात तीव्र संताप निर्माण झाला आहे. कोणतीही खात्री न करता सोशल मीडिया, इलेक्ट्रॉनिक माध्यमे आणि वृत्तपत्रांतून या संदर्भातील बातम्या प्रसारित झाल्याने संपूर्ण आदिवासी समाजाची सार्वजनिक बदनामी झाल्याचा आरोप करण्यात आला आहे.

याप्रकरणी राष्ट्रीय आदिवासी स्वायत्त परिषद व ट्रायबल फोरम राळेगाव यांच्या वतीने पोलीस स्टेशन राळेगाव येथे निवेदन देण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की, "३४ मुली बेपत्ता" असा सरसकट उल्लेख करून आदिवासी समाजाला लक्ष्य केले जात असून हा केवळ संबंधित मुलींचाच नव्हे तर संपूर्ण समाजाचा अपमान आहे. त्यामुळे समाजामध्ये मोठ्या प्रमाणावर असंतोष निर्माण झाला आहे. आदिवासी समाज आर्थिकदृष्ट्या दुर्बल असला तरी आपल्या मुलींविषयी प्रामाणिक आहे. कोणतीही पडताळणी न करता समाजाची प्रतिमा मलिन करण्याचा अधिकार कुणालाही नाही.असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.दरम्यान, जर तपासात मानवी तस्करीसारखा प्रकार उघड झाला तर संबंधित आरोपी, मध्यस्थ व खरेदीदारांवर कठोर कारवाई करावी, अशीही मागणी करण्यात आली आहे. मात्र, संपूर्ण समाजावर बोट दाखवणारी बदनामी तात्काळ थांबवावी, असे स्पष्ट करण्यात आले. आदिवासी समाजाची बदनामी करणाऱ्यांनी दोन दिवसांत जाहीर माफी मागावी, अन्यथा ॲट्रॉसिटी कायदा १९८९ अंतर्गत कलम ३(१)(r), ३(१)(u) तसेच भारतीय न्याय संहिता कलम ३५६ (पूर्वीचे ५००/५०१) आणि कलम ३५३ (पूर्वीचे १५३) अन्वये गुन्हे दाखल करण्याची मागणी पोलीस प्रशासनाकडे करण्यात आली आहे. या वेळी रजनीकांत परचाके, शंकर पंधरे, दिलीप किनाके, मनोहर कुडमथे, मधुकर पावले, मडावी, आत्राम आदींसह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.तहसीलदार राळेगाव यांनाही देण्यात आली असून तात्काळ कारवाईची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.



# वणी शहरात जनगणनेच्या पहिल्या टप्प्याच्या प्रशिक्षणास प्रारंभ

**जनमाध्यम प्रतिनिधी**

वणी - स्वतंत्र भारतातील १६ व्या जनगणनेच्या प्रक्रियेला वणी शहरात औपचारिक सुरुवात झाली असून, नगर परिषद अंतर्गत होणाऱ्या जनगणनेसाठी पहिल्या टप्प्याचे प्रशिक्षण गुरुवारी (दि. २३ एप्रिल) येथील लायन्स कॉन्व्हेन्ट येथे सुरू करण्यात आले. उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वणी नगर परिषदेचे मुख्याधिकारी तथा चार्ज अधिकारी डॉ. सचिन गाडे होते. प्रमुख अतिथी म्हणून शिक्षण विभागाचे प्रशासन अधिकारी गजानन कासावार उपस्थित होते. प्रशिक्षक म्हणून मयुरेश केंद्रे व प्रशांत कांबळे यांनी मार्गदर्शन केले.



यावेळी बोलताना डॉ. गाडे यांनी जनगणनेचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, जनगणना ही देशातील लोकसंख्या तसेच सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व सांस्कृतिक स्थितीची अधिकृत नोंद असते. देशाच्या सर्वांगीण विकासासाठी ही प्रक्रिया अत्यंत महत्त्वाची आहे. भारतात दर दहा वर्षांनी जनगणना केली जाते आणि स्वातंत्र्यानंतरही ही परंपरा कायम आहे. गजानन कासावार यांनी सांगितले की, जनगणना ही केवळ लोकसंख्या मोजणी नसून शासकीय नियोजनाचा पाया आहे. शिक्षण, आरोग्य, रोजगार, गृहनिर्माण व पायाभूत सुविधांसाठी निधी वाटप व धोरणे आखताना जनगणनेतील आकडेवारी महत्त्वाची ठरते.प्रशिक्षकांनी दिलेल्या माहितीनुसार, यंदा डिजिटल पद्धतीने जनगणना होणार असून प्रत्येक घरातून ३४ प्रश्नांद्वारे माहिती संकलित केली जाणार आहे. नागरिकांना मोबाईल ॲपद्वारे स्वयं-जनगणना करण्याची सुविधाही उपलब्ध असेल. वणी शहरातील १४ प्रभागांतील सुमारे १२५ भागांसाठी १२५ प्रगणक व २० पर्यवेक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. हे प्रशिक्षण २३ एप्रिल ते ८ मे दरम्यान चार टप्प्यांत होणार आहे. नागरिकांनी जनगणना प्रक्रियेस सहकार्य करावे, असे आवाहन उपविभागीय जनगणना अधिकारी नितीनकुमार हिंगोले यांनी केले.

# राळेगाव प्रकरणात भाजपवर टीका..! निष्पक्ष चौकशीची मागणी



**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - राळेगाव तालुक्यातील कथित मुलींच्या तस्करीच्या प्रकरणामुळे राज्यभरात चर्चा रंगली असताना परस्परविरोधी विधानांमुळे नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर शेतकरी चळवळी, यवतमाळ यांच्या वतीने गुरुवारी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात सुरुवातीला भाजप जिल्हाध्यक्ष प्रफुल्ल चौव्हाण यांनी ऑडिओ क्लिप्सच्या आधारे 'लव्ह जिहाद' व मुलींच्या तस्करीचा संदर्भ देत केलेल्या वक्तव्यांचा उल्लेख करण्यात आला आहे. मात्र, आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांनी कोणत्याही विशिष्ट समुदायाबाबत ठोस निष्कर्ष काढता येणार नसल्याचे स्पष्ट केले. तसेच इतर पदाधिकाऱ्यांनीही हा विषय कोणत्याही एका समाजा पुरता मर्यादित नसल्याचे मत मांडले आहे. दरम्यान, जिल्हा पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांनी अद्याप कोणतीही अधिकृत तक्रार नसून आरोप सिद्ध झालेला नसल्याचे सांगितले. त्यामुळे प्रारंभीच्या विधानांमुळे सामाजिक तणाव वाढण्याची शक्यता व्यक्त होत आहे. शेतकरी चळवळीने सत्ताधाऱ्यांनी संवेदनशील विषयांवर जबाबदारीने भूमिका मांडावी, अशी मागणी करत प्रकरणाची सखोल व निष्पक्ष चौकशी, अप्रमाणित माहितीवर नियंत्रण आणि दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

# पारधी समाजातील युवक, शेतकऱ्यांसाठी विविध कार्यशाळा योजना
## 30 एप्रिलपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ : एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पुसद यांच्या वतीने सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षात पारधी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी विविध योजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. या योजनांचा लाभ घेण्यासाठी पात्र लाभार्थ्यांकडून आवेदन अर्ज मागविण्यात आले आहेत.

प्रकल्प अधिकारी कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात पुसद, दिग्रस, आर्णी, दारव्हा, उमरखेड आणि नेर या तालुक्यांचा समावेश असून, या भागातील पारधी समाजातील युवक व शेतकऱ्यांसाठी विविध व्यावसायिक कार्यशाळा व शेती मार्गदर्शन कार्यशाळा आयोजित करण्यात येणार आहेत. यामध्ये पारधी समाजातील सुशिक्षित बेरोजगार युवकांसाठी शेळीपालन व कुक्कुटपालन व्यवसायाचे निवासी कार्यशाळा, इलेक्ट्रीशियन व प्लंबिंग व्यवसायिक निवासी कार्यशाळा, तसेच सोलर पॅनल इन्स्टॉलेशन व मेंटेनन्स संदर्भातील निवासी कार्यशाळांचा समावेश आहे. याशिवाय शेतकऱ्यासाठी आधुनिक शेतीचे तंत्रज्ञान व जैविक शेतीविषयी मार्गदर्शन कार्यशाळाही आयोजित करण्यात येणार आहेत. या योजनांसाठी अर्ज प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पुसद (उपजिल्हा रुग्णालयाजवळ, संत सेवालाल चौक) येथे उपलब्ध आहेत. इच्छुक लाभार्थ्यांनी ३० एप्रिल २०२६ पर्यंत आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करावेत. निर्धारित कालावधीनंतर आलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. लाभार्थ्यांसाठी आवश्यक अटींमध्ये अर्जदार पारधी समाजातील असणे, प्रकल्प क्षेत्रातील रहिवासी असणे, रहिवासी दाखला, जात प्रमाणपत्र, आधारकार्डाची प्रत तसेच शैक्षणिक कागदपत्रे सादर करणे बंधनकारक आहे अशी माहिती प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पुसद अमोल मेतकर यांनी दिली आहे.

# सोयाबीनने प्रथमच ओलांडला हमीभावाचा टप्पा

## प्रतिक्विटलला ५,५०० रुपयांचा उच्चांकी भाव

**अमरावती / का.प्र.**

राज्यातील कृषी बाजार पेठांमध्ये सध्या सोयाबीनच्या दरात लक्षणीय वाढ नोंदवली जात असून, अमरावती कृषी उत्पन्न बाजार समितीत सोयाबीनच्या दराने प्रथमच हमीभावाचा टप्पा ओलांडला आहे. येथे प्रतिक्विटलला ५,५०० रुपयांचा उच्चांकी भाव मिळाला आहे. बाजारात सध्या उत्साहाचे वातावरण असले तरी, हंगामाच्या सुरुवातीलाच बहुतांश शेतकऱ्यांनी कमी दरात माल विकल्याने या नव्या दरवाढीचा प्रत्यक्ष फायदा मोजक्याच शेतकऱ्यांना होत असल्याचे विदारक चित्र आहे.

यंदा केंद्र सरकारने सोयाबीनसाठी ५,३२८ रुपये प्रतिक्विटल हमीभाव निश्चित केला होता. मात्र, हंगामाच्या सुरुवातीला बाजारात सोयाबीनचे दर ४,५०० रुपयांपर्यंत गडगडले होते.त्यातच शासनामार्फत 'नाफेड'ची खरेदी केंद्रेही उशिराने सुरू झाली. दरात सुधारणा होईल या अनिश्चिततेमुळे आणि सणासुदीच्या काळातील आर्थिक कोंडीमुळे अनेक शेतकऱ्यांनी साठवलेला माल कवडीमोल भावाने विकला. ज्यांनी माल रोखून धरला, त्यांनाच आता या तेजीचा लाभ मिळत आहे. यंदाच्या अतिवृष्टीचा सोयाबीन पिकाला मोठा फटका बसला. शेतात पाणी साचल्याने उत्पादनात मोठी घट झाली.परिणामी, बाजारातील आवक मंदावली. पुरवठा कमी आणि मागणी जास्त, या अर्थशास्त्रीय गणितामुळे सध्या दरांना भक्कम आधार मिळत आहे.

**दरवाढीची प्रमुख कारणे**

बाजारातील या तेजीमागे अनेक घटक कारणीभूत आहेत. प्रामुख्याने खाद्यतेलाच्या दरात झालेली वाढ आणि पशुखाद्यासाठी वापरल्या जाणाऱ्या सोयापेंडची (डीओसी) वाढलेली मागणी (४,२०० ते ४,३०० रुपये) यामुळे बाजाराला चालना मिळाली आहे. पावसाळ्यापूर्वी तेल गिरण्यांनीही खरेदीचा वेग वाढवला सद्यस्थितीत सोयाबीनला ५ हजार ते ५ हजार ५०० रुपयांच्या दरम्यान असून, काही ठिकाणी ५,७०० रुपयांपर्यंतचे व्यवहार झाले आहेत. सरासरी भाव मिळत असून, ही दरवाढ आणखी काही काळ टिकून राहील, असा अंदाज बाजार विश्लेषकांनी व्यक्त केला आहे.



**कापसालाही जागतिक घडामोडींचा आधार**

सोयाबीनपाठोपाठ देशातर्गत बाजारात कापसाच्या दरातही मागील काही दिवसांपासून सकारात्मक सुधारणा पाहायला मिळत आहे. जागतिक पातळीवर इराण संघर्षामुळे 'पॉलिस्टर'चे दर वधारले आहेत, ज्याया बेट फायदा कापूस बाजाराला होत आहे. अमरावती बाजार समितीत कापसाने ८ हजार ५०० रुपयांचा टप्पा गाठला असून, सध्या सरासरी दर ८ हजार २०० ते ८ हजार ४७५ रुपयांच्या घरात आहेत. बाजारातील आवक मर्यादित राहणार असल्याने आणि मागणी टिकून असल्याने कापसाचे हे चढे दर आगामी काळातही स्थिर राहण्याची शक्यता अभ्यासकांकडून वर्तवण्यात आली आहे.

# दत्तापूर येथे महाआरोग्य शिबीर आज

**धामणगाव रेल्वे/ वार्ताहर**

धामणगाव रेल्वे येथे लायन्स क्लब एलाईट व पाणी पुरवठा सभापती विलास बुटले मित्र परिवार यांच्या वतीने २४ एप्रिल रोजी महाआरोग्य शिबिराचे आयोजन दत्तापूर येथे करण्यात आले आहे.

हृदयरोग, स्त्री रोग, नेत्ररोग व इतरही आजारांवर तज्ज्ञ डॉक्टर मंडळी रुग्णांची तपासणी करुन रोग निदान करणार आहे.

हृदयरोगतज्ज्ञ डॉ. आकाश येंडे, डॉ. असित पसारी, बालरोग तज्ज्ञ अमित गुल्हाने, जनरल फिजिशियन सर्जन डॉ. अमित कारमोरे, डॉ. हार्दिक पटेल, डॉ. महेक अग्रवाल, डॉ. मिलिंद सूर्यवंशी, डॉ. सविता अप्तुरकर, डॉ.प्रतिज्ञा मेश्राम, डॉ. संदीप दुबे, डॉ. प्रविणा देशमुख, डॉ. सांगली खडसे यांच्यासह ग्रामीण रुग्णाल याच्या वैद्यकीय अधीक्षक डॉ. कांचन रहांगडाले, तालुका आरोग्य अधिकारी विवेक सुदेवाड उपस्थित राहतील.

या आरोग्य महाशिबिराचा लाभघेण्याचे आवाहन शिबिर संयोजक पाणीपुरवठा सभापती विलास बुटले, लायन्स क्लबचे प्रमोद कुचेरिया, चेतन कोठारी, जितेंद्र चौधरी, कुंदन ठाकूर, निवृत्ती लोखंडे, गोपाल लोदे, नगरसेवक अंशुल बडगया, स्वप्नील ठाकरे, चेतन कटयारमल यांनी केले आहे.

# जिल्ह्यात सरासरी ६.८१ लाख हेक्टर पेरणी क्षेत्र

## कापूस, सोयाबीन, तुरीसह मका पिकाकडे शेतकऱ्यांचा कल, कृषी विभागाकडून पेरणीची लगबग

**अमरावती / का.प्र.**

कृषी विभागाकडून खरीपाच्या तयारीची लगबग सुरू झाली आहे. एप्रिल एण्डिंगपर्यंत तालुका निहाय आमदारांच्या अध्यक्षते खाली बैठका घेऊन पेरणीचे नियोजन केले जात आहे. यंदा ६ लाख ७७ हजार हेक्टर क्षेत्रात खरिपाची पेरणी अपेक्षित असून कापूस, सोयाबीन, तुरीसह मका या पिकाच्या पेरणीकडे शेतकऱ्यांचा कल दिसून येत आहे. त्यादृष्टीने कृषी विभागाने बियाण्यांची मागणी नोंदविली आहे.



जिल्ह्यात खरीप हंगामात सरासरी ६.८१ लाख हेक्टर क्षेत्र पेरणीयोग्य आहे. गतवर्षीच्या हंगामात ६.७७ लाख हेक्टर क्षेत्रात पेरणी झाली होती.

यंदाही हेच प्रमाण राहण्याचा कृषी विभागाचा अंदाज आहे. खरिपात प्रामुख्याने कापूस, सोयाबीन व तूर हे प्रमुख पिके असून मक्याची पेरणी धारणी व चिखलदरा तालुक्यात वाढली आहे. कापसाखालील क्षेत्रात यंदा वाढ अपेक्षित असून सोयाबीनचे क्षेत्र सरासरी इतकेच राहणार आहे. १.२० लाख हेक्टरवर तुरीची लागवड अपेक्षित असून मक्याखाली अंदाजे ४४ हजार हेक्टर क्षेत्र राहण्याची शक्यता आहे.

कृषी विभागाने खरीप हंगामाच्या नियोजनाची तयारी पूर्ण केली असून तालुकानिहाय आमदारांच्या अध्यक्षतेत आढावा बैठकी घेण्यात येत आहेत. या बैठकीत येणाऱ्या सुचनांचा अंतिम नियोजनात समावेश करण्यात येणार असल्याचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राहुल सातपुते यांनी सांगितले. यंदाच्या खरीप हंगामासाठी बियाणे व खतांची मागणी नोंदविण्यात आली आहे. पेरणीसाठी कापूस वगळता एकूण बियाण्यांच्या ३५ टक्के बियाण्यांची मागणी नोंदविण्यात आली असल्याचे कृषी अधिक्षक राहूल सातपुते यांनी सांगितले.

**खरिपासाठी सुमारे १३.२८ लाख विंचटल बियाण्यांचे नियोजन**

जिल्ह्यात खरिपासाठी कापूस व मकाचे शंभर टक्के तर इतर पिकांकरिता ३५ टक्के बियाण्यांचे नियोजन करण्यात आले आहे. यामध्ये अडीच लाख हेक्टर कापसाकरिता १२.५० लाख क्विटल बियाणे अपेक्षित आहे. (प्रति पाकीट ४७५ ग्रॅम) तसेच सोयाबीन करिता ६५,३५० किंचटल, तूर ५,७६० किंचटल व मकासाठी ७,०७२ क्विटल बियाण्यांची आवश्यकता लागणार आहे.

# सकल मुस्लिम युवक संघटनेच्या अमरावती जिल्हाध्यक्षपदी मोहम्मद शहेजाद सौदागर

**चांदूर रेल्वे/ वार्ताहर**

सामाजिक व राजकीय क्षेत्रात सक्रिय कार्य करणारे चांदूर रेल्वे येथील मोहम्मद शहेजाद अब्दुल मजीद सौदागर यांची सकल मुस्लिम युवक महाराष्ट्र संघटनाच्या अमरावती जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीमुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.



सामाजिक प्रश्नांची जाण, चळवळीतील सक्रिय सहभाग आणि विविध जनहिताच्या उपक्रमांमधील योगदान याची दखल घेत संघटनेचे प्रदेशाध्यक्ष अझरुद्दीन सय्यद यांनी ही नियुक्ती जाहीर केली. समाजातील वंचित घटकांसाठी सातत्याने काम करणाऱ्या शहेजाद भाईंच्या कार्याचा गौरव म्हणून त्यांना ही जबाबदारी सोपवण्यात आल्याचे सांगण्यात आले. चांदूर रेल्वे येथील रहिवासी असलेले शहेजाद सौदागर हे सामाजिक, शैक्षणिक व संवैधानिक अधिकारांच्या प्रश्नांवर सातत्याने काम करत आहेत. त्यांच्या नेतृत्वामुळे अमरावती जिल्हामध्ये संघटनेचे कार्य अधिक प्रभावीपणे विस्तारेल, असा विश्वास कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे. त्यांच्या निवडीबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# भाजपाची तालुका आढावा बैठक

## तालुक्यात पक्ष संघटन मजबूत करण्याचा निर्धार

**चांदूरबाजार/ वार्ताहर**

भारतीय जनता पार्टीच्या वतीने चांदूरबाजार तालुका, आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.नुकत्याच संपन्न झालेल्या या बैठकीत, तालुकाध्यक्ष रमेश तायवाडे यांनी तालुक्यात, पक्ष संघटन अधिक मजबूत करण्याचा निर्धार व्यक्त केला.त्यासाठी तालुक्यातील कार्यकर्त्यांसोबत सविस्तर चर्चा करण्यात आली.



बैठकी दरम्यान सर्कल प्रमुख, बूथ प्रमुख तसेच शक्ती केंद्रप्रमुख यांच्या माध्यमातून मतदारसंघात प्रभावीपणे काम कसे करावे यावर भर देण्यात आला. भारतीय जनता पक्ष प्रत्येक घरापर्यंत पोहोचवा. त्यासाठी प्रत्यक्ष जनतेच्या समस्या जाणून घेऊन, त्यांचे निराकरण व्हावे. तसेच पक्षाच्या विविध उपक्रमांची माहिती जनतेपर्यंत पोहोचावी. हा या बैठकीचा मुख्य उद्देश होता. त्याच प्रमाणे केंद्र व राज्य शासनाच्या विविध शासकीय व निमशासकीय योजनांची माहिती पक्ष कार्यकर्त्यांनी जनतेपर्यंत पोहोचवावी, असे आवाहनही या बैठकीत करण्यात आले.

बैठकीत अचलपूर आ.प्रवीण तायडे यांच्या कामाचा आढावा घेत त्यांच्या विकासकामांची माहिती जनतेपर्यंत पोहोच विण्याचा संकल्प करण्यात आला.तालुकाध्यक्षांनी आपल्या पक्षाचे आमदार प्रवीण तायडे हे, जनतेच्या प्रश्नांवर सातत्याने काम करत आहेत .जी कामे मागील काळात झाले नाहीत. ती कामे आज प्रभावीपणे होत आहे. जनतेची सेवा करण्याचा त्यांचा ध्यास भाजप पक्षांसह, आमदार तायडे यांचा ही आहे .त्यामुळे भारतीय जनता पक्ष, अधिकाधिक लोकप्रिय होत आहेत.तरी ही पक्षाची ही लोकप्रियता टिकवून ठेवणे.ही पक्षांच्या पदाधिकाऱ्यांसह प्रत्येक कार्यकर्त्याची जबाबदारी आहे असे आ.तायडे यांनी, आपल्या मार्गदर्शनात कार्यक र्त्यांना संबोधित केले.आढावा बैठकीला आमदार, विद्यमान तालुका अध्यक्ष यांचे सह, माजी तालुकाध्यक्ष किरण शिणकर. तसेच तालुक्यातील सर्व प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.भारतीय जनता पक्ष तालुक्यात अधिकाधिक बळकट करण्याच्या उद्देशाने, ही बैठक यशस्वीपणे पार पडली.

### प्रा. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंटमध्ये

# एमबीए विभागातर्फे दोन दिवसीय कार्यशाळेचे उद्घाटन

**अमरावती/ का.प्र.**

प्रा. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट बडनेरा येथील एमबीए विभागातर्फे प्रथम वर्ष विद्यार्थ्यां साठी आयोजित करण्यात आलेल्या दोन दिवसीय दिशा दर्शन कार्यक्रमाचे उद्घाटन उत्साहात संपन्न झाले.




कार्यक्रमा ला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय ठाकरे, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या एमबीए विभागप्रमुख डॉ. वाय. एन. चाचरकर, एमबीए विभागप्रमुख डॉ. शशिकांत थोरात, कार्यक्रम समन्वयक व डीन पब्लिक रिलेशन डॉ. लोभस घडेकर, तसेच डॉ. संध्या भगत आणि डॉ. प्रणिता गिरी उपस्थित होते.

प्रास्ताविक डॉ. शशिकांत थोरात यांनी केले. या कार्यक्रमाचा उद्देश नव्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन वातावरण, अभ्यासक्रम, विविध उपक्रम तसेच करिअरच्या संधींबाबत मार्गदर्शन करणे हा होता.यावेळी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या एमबीए विभाग आणि महाविद्यालय यांच्यात समजुतीचा करार करण्यात आला. प्रमुख पाहुणे डॉ. चाचरकर यांनी आपल्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांना प्रेरित केले तसेच महाविद्यालयाच्या कार्याचे कौतुक केले.

यावेळी प्राचार्य डॉ. अजय ठाकरे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, 'दिशादर्शन कार्यक्रम हा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाचा मजबूत पाया असतो. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना योग्य दिशा, आत्मविश्वास आणि करिअर विषयक स्पष्टता मिळते. दोन दिवसीय कार्यक्रमामध्ये विविध सत्रांचे आयोजन करण्यात आले असून, त्यामध्ये तज्ज्ञांचे मार्गदर्शन, व्यक्तिमत्व विकास, करिअर नियोजन तसेच उद्योगजगताशी संबंधित माहिती विद्यार्थ्यांना देण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आपली उत्सुकता दर्शविली.कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे, उपाध्यक्ष अ‍ॅड. उदय देशमुख कोषाध्यक्ष प्रा. डॉ. हेमंत देशमुख, सचिव युवराजसिंग चौधरी, कार्यकारी सदस्य नितीन हिवसे, डॉ. पूनम चौधरी, पंकज देशमुख, प्रा. विनय गोहाड, प्रा. गजानन काळे यांचे मार्गदर्शन लाभले.कार्यक्रमाला प्रा आतिफ सईद, प्रा दिशा भोयर, विद्यार्थी उपस्थित होते.संचालन गौरी गिरणाले व ऋतुजा राऊत आभार प्रदर्शन श्रुतिका बाजड हिने केले.

# कर्मचाऱ्याचा तिसऱ्या दिवशीही संप सुरूच

## विविध विभागातील कर्मचाऱ्यांचा सहभाग; कामकाज विस्कळीत

**अचलपूर/ वार्ताहर**

विविध मागण्यांसाठी शासकीय कर्मचाऱ्यांनी पुकारलेल्या संपाचा तिसरा दिवस असून बहुतांश शासकीय कार्यालयांवर याचा परिणाम दिसत आहे.मात्र याचा त्रास सर्वसामान्य नागरिकांना सोसावा लागत असल्याचे चित्र आहे. शासनाने या मागण्यांकडे तातडीने लक्ष पुरवावे. अशी मागणी कर्मचारी संघटनेसह आता नागरिकांनी पुढे येत आहे.



सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेच्या अंमल बजावणी बाबत स्पष्टीकरणात्मक अधिसूचना जारी करावी.सरकारी, निमशासकीय कर्मचारी तसेच शिक्षण विभागातील शिक्षक व शिक्षकत्तर कर्मचाऱ्याच्या समस्या सोडवाव्या, सर्व कंत्राटी रोजनदारी व अंशकालीन कर्मचाऱ्याच्या सेवा नियमित करण्यात याव्या, चतुर्थश्रेणी कर्मचारी व वाहनचालक भरतीवरील बंद तात्काळ उठवण्यात यावी यासह आदी विविध प्रलंबित मागण्या साठी कर्मचारी संघटनांकडून संपाचे हत्यार उपसले आहे. यामध्ये अचलपूर तहसिल कार्यालय, उपविभागीय अधिकारी कार्यालय, उपजिल्हा रुग्णालय, औद्यगिक प्रशिक्षण संस्था आदी विविध विभागातील कर्मचाऱ्याचा सहभाग आहे. यामध्ये कैलास गुळसुंदरे, योगेश रेवस्कर, अरविंद सूरोशे, अमोल नवले, निलेश उभाड, निलेश काळे ,रोशन महानकर ,संदीप गडम, सत्यपाल आठवले, गजानन गेठे ,विनोद कोठार, विनायक नेवारे, देवेंद्र संभे, संदीप लांडे पौर्णिमा कांबळे ,मीनाक्षी घोटेकर ,रोशनी कस्तुरे पल्लवी मेश्राम ,सुरेखा वाघमारे ,हर्षदा उजाडे आदी विभागातील कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना अमरावती जिल्हा निमंत्रण डी.एस.पवार यांनी कैलाश गुळसुंदरे यांच्या मोबाईलवर फोन करून तहसील परिसरात जमलेल्या शेकडो कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले. आणि जिल्हा सह मुंबईत मंत्रालयात संघटना बजावत असलेल्या भुमिकेबाबत सांगितले.

## संक्षिप्त

### त्रैवार्षिक अधिवेशन आज

**अमरावती-** महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती, शाखा अमरावती च्या वतीने २४ एप्रिल २०२६ रोज शुक्रवार ला दुपारी २ वाजता अमरावती शाखेचे त्रैवार्षीक अधिवेशन संत गाडगे महाराज समाधी स्थळ सभागृह येथे आयोजित केलेले आहे.कार्यक्रमाचे अध्यक्ष गोकुलदास राऊत हे राहणार असून कार्यक्रमाचे उद्घाटक अजयानंद पवार यांच्या हस्ते होणार असुन विशेष सत्कार मुर्ती संभाजी रेवाळे, प्रमुख पाहुणे राजेश सावरकर, प्रविणा कोल्हे, शैलेंद्र दहातोंडे, सरिता काठोळे, विनीता घुलक्षे, आल्हाद तराळ ,प्रेमसुख ठोंबरे यांची उपस्थिती राहणार आहे.यावेळी अमरावती तालुका नुतन कार्यकारिणीचे गठीत होणार आहे.तसेच महीला करीता हळदी कुंकू व स्वागत समारंभ आयोजित करण्यात आले आहे.यावेळी संत गाडगे महाराज समाधि मंदिर, गाडगे नगर, अमरावती येथे स्वरूची भोजन वेळ १२.३० ते २.०० पर्यंत ठेवण्यात आले आहे.

### साफल्य विद्यालयात जागतिक वसुंधरा दिन

**लेहेगाव-** साफल्य विद्यालय, सावरखेड पिंगळाई येथे जागतिक वसुंधरा दिन साजरा करण्यात आला.विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रशांत आजनकर यांनी वसुंधरा दिनानिमित्त मानवी कल्याणा करिता पर्यावरणाचे असलेले महत्त्व विशद केले. यानिमित्त विद्यार्थ्यांना वृक्षारोपण करणे, वृक्ष संवर्धन करणे व त्यांचे जतन करणे हे येणाऱ्या पिढी करिता किती गरजेचे आहे याविषयी माहिती दिली. विद्यालयातील विज्ञान शिक्षक नरेंद्र सुळे सर यांनी निसर्गातील साधन संपत्ती, जैवविविधता, ऑक्सीजन पार्क, फुलपाखरांचे स्वच्छंदी जीवन व त्यांचा मानवी जीवनाशी निकट संबंध इत्यादी बाबत विद्यार्थ्यांना माहिती दिली. तसेच गणित शिक्षक श्रीराम गुंजीटे यांनी जागतिकीकरणामुळे पर्यावरणाचा समतोल कशाप्रकारे बिघडलेला आहे त्याबद्दल आपले मनोगत व्यक्त केले. जागतिक वसुंधरा दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी शालेय परिसरात प्रत्यक्ष कृतीद्वारे छोट्या झाडांना खुरपणी करून पाणी घातले. हा दिन साजरा करण्यासाठी विद्यालयातील शिक्षिका योगिता हिरुळकर, प्र. परिचर राजेश मालपे शिपाई बि.ओ. ठाकूर यांनी परिश्रम घेतले.

### माहेश्वरी संघटनेच्या तालुकाध्यक्षपदी मुकेश राठी

**धामणगाव रेल्वे-** तालुका माहेश्वरी संघटनेची निवडणूक सर्वसंमतीने पार पडली. तालुका अध्यक्ष पदासाठी मुकेश राठी यांची पुन्हा एकदा अविरोध निवड करण्यात आली. तसेच सचिवपदी सत्यनारायण मुंधडा यांची निवड करण्यात आली आहे.जिल्हा निवडणूक अधिकारी अ‍ॅड. राधेश्याम लढ्ढा यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच जिल्हा पर्यवेक्षक अ‍ॅड. रमेशचंद्र चांडक यांच्या देखरेखीखाली निवडणूक घेण्यात आली. यावेळी तालुका समन्वयक लक्ष्मीनारायण चांडक, दिलीप भंडारी, जिल्हाध्यक्ष अशोकचंद्र राठी प्रमुख उपस्थित होते. सन २०२६ ते २०२९ हा कार्यकारणीचा कार्यकाळ असणार आहे. कार्यकारणीत उपाध्यक्ष सचिन राठी (वाढोणा), सचिव सत्यनारायण (पप्पू) मूंधडा (मंगरूळ दस्तगिर), कोषाध्यक्ष घनश्याम चांडक, सहसचिव अनिल चांडक, संघटन मंत्री धर्मेश गांधी, प्रचार-प्रसार मंत्री योगेश मूंधडा, कार्यकारिणी सदस्य हेमंत पेढीवाल, किशोर टावरी, आशीष राठी (जळका पटाचे), वसंत पनपालिया, राजेश चांडक (पिपळखुटा), संजय राठी (चिचपूर) तसेच सहयोगी सदस्य म्हणून रीतेश राठी व प्रेमकुमार टावरी यांची निवड करण्यात आली.



### जागतिक पुस्तक दिन उत्साहात

**लेहेगाव-** साफल्य विद्यालय, सावरखेड पिंगळाई येथे जागतिक पुस्तक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी आणि ज्ञानाचा प्रसार व प्रचार व्हावा या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात ग्रंथ पूजनाने करण्यात आली. या नंतर विद्यार्थ्यांनी संविधान वाचन, कथाकथन, वाचन स्पर्धा तसेच पुस्तकांवरील मनोगत व्यक्त केले. काही विद्यार्थ्यांनी आवडत्या पुस्तकांबद्दल माहिती सांगत इतरांना वाचनासाठी प्रेरित केले. विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रशांत आजनकर सर यांनी आपल्या मार्गदर्शनात वाचनाचे महत्त्व अधोरेखित करीत 'पुस्तक हेच खरे मित्र' असून ते आपल्याला योग्य दिशा देतात असे मनोगत व्यक्त केले. विद्यालयात संपन्न झालेल्या पुस्तक दिनाच्या या कार्यक्रमाला विज्ञान शिक्षक नरेंद्र सुळे, गणित शिक्षक श्रीराम गुंजीटे, इंग्रजी शिक्षिका योगिता हिरुळकर, प्र. परीचर राजेश मालपे, शिपाई बि.ओ. ठाकुर उपस्थित होते.



### लक्ष्मीकांत काळकोंडे यांना आचार्य पदवी

**अमरावती-** विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी, अमरावती अंतर्गत प्रा. राम मेघे अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालय , बडनेरा येथील परमाणू व दूरसंचार अभियांत्रिकी विभागातील सहाय्यक प्राध्यापक लक्ष्मीकांत काळकोंडे यांना संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांच्याकडून आचार्य पदवी प्रदान करण्यात आली आहे.त्यांचा संशोधन प्रबंध 'रक्तवाहिन्यांवर आधारित मधुमेहजन्य रेटिनोपॅथी शोधासाठी डीप लर्निंग आधारित अनुकूलित मॉडेलची रचना व विकास' या विषयावर आधारित असून, हे संशोधन आधुनिक वैद्यकीय प्रतिमा विश्लेषण व डीप लर्निंग तंत्रज्ञानाच्या साहाय्याने मधुमेहजन्य रेटिनोपॅथीच्या अचूक निदानासाठी महत्त्वपूर्ण योगदान देणारे आहे. त्यांनी एम्दज्ले सूचीबद्ध जर्नलमध्ये २ संशोधन निबंध प्रकाशित केले असून, आंतरराष्ट्रीय स्तरावरील परिषदांमध्ये २ संशोधन सादरीकरणे केली आहेत तसेच १ कॉपीराइटही प्राप्त केला आहे. त्यांनी केलेले संपूर्ण संशोधन कार्य प.पू. आचार्य श्री जितेंद्रनाथ महाराजांना समर्पित केले आहे.या यशाबद्दल काळकोंडे यांनी आपल्या संशोधन मार्गदर्शकांचे, महाविद्यालय प्रशासनाचे, विशेषतः महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय प. ठाकरे, सहकारी प्राध्यापक तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी दिलेल्या सातत्यपूर्ण सहकार्यामुळे ही उपलब्धी साध्य झाल्याचे त्यांनी नमूद केले.विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व सर्वांगीण विकासासाठी मोलाचे सहकार्य केल्याबद्दल विदर्भ युथ वेलफेअर सोसायटीचे अध्यक्ष डॉ. नितीन आर. धांडे, उपाध्यक्ष अ‍ॅड. उदय एस. देशमुख, कोषाध्यक्ष प्रा.(डॉ.) हेमंत एम. देशमुख, सचिव युवराजसिंह व्ही.चौधरी तसेच कार्यकारी सदस्य डॉ.पूनम वाय.चौधरी, पंकज एस. देशमुख, प्रा. विनय पी. गोहाड व प्रा.गजानन एस. काळे यांचेही त्यांनी आभार व्यक्त केले.



# आर्थिक विकास आणि शाश्वत जलव्यवस्थापन

आजच्या काळात आर्थिक विकास आणि जलसंपत्ती यांचा संबंध अधिक गुंतागुंतीचा बनत चालला आहे. उद्योगांना वाढीसाठी पाणी आवश्यक आहे, शेतीला अन्न उत्पादनासाठी पाणी लागते आणि शहरांना चालना देण्यासाठी पाणी हा मूलभूत घटक आहे. त्यामुळे आर्थिक विकास आणि जलव्यवस्थापन या दोन गोष्टी अनेकदा परस्परविरोधी वाटतात; परंतु वस्तुस्थिती अशी आहे की, शाश्वत जलव्यवस्थापनाशिवाय आर्थिक विकास दीर्घकाळ टिकू शकत नाही.

१९९२ मध्ये मांडलेल्या डब्लिन तत्त्वांमध्ये पाण्याला आर्थिक मूल्य असलेले संसाधन (म्दिहदस्म् उदद्) म्हणून मान्यता देण्यात आली. याचा अर्थ असा की, पाण्याकडे केवळ सामाजिक हक्क म्हणून न पाहता त्याचे आर्थिक मूल्य ओळखून त्याचा जबाबदारीने वापर करणे आवश्यक आहे. पाण्याचा अतिरेक वापर करून आपण विकास साधत असू, तर तो विकास भविष्यातील पिढ्यांच्या हक्कांवर आघात करणारा ठरतो. परंपरागत पाणी वापर पद्धतीकडे पाहिले, तर ती रेषीय अर्थव्यवस्था (Linear Economy) पद्धतीवर आधारित आहे. पाणी काढणे, वापरणे आणि नंतर त्याचा निचरा करणे या पद्धतीमुळे जलस्त्रोतांवर प्रचंड ताण येतो आणि प्रदूषण वाढते. याउलट चक्रीय जल अर्थव्यवस्था (Circular Water Economy) ही संकल्पना शाश्वत विकासासाठी अत्यंत महत्त्वाची ठरते. या पद्धतीत पाणी गोळा करणे, वापरणे, प्रक्रिया करणे, पुनर्वापर करणे आणि पुन्हा भूजलात झिरपवणे या टप्प्यांचा समावेश असतो.

या चक्रीय पद्धतीमुळे पाण्याचा वापर अधिक कार्यक्षम होतो आणि जलस्त्रोतांचे संरक्षण होते. उदाहरणार्थ, शहरांमध्ये सांडपाण्याचे शुद्धीकरण करून ते औद्योगिक वापरासाठी किंवा बागकामासाठी वापरले जाऊ शकते. उद्योगांमध्ये झीरो लिक्विड डिस्चार्ज तंत्रज्ञानाचा अवलंब केल्यास पाण्याचा अपव्यय कमी होतो. शेतीमध्ये ठिबक आणि करणे गरजेचे आहे. अनेक ठिकाणी पाणी मोफत किंवा अत्यल्प दरात उपलब्ध असल्यामुळे त्याचा अपव्यय होतो. योग्य दररचना आणि प्रोत्साहन धोरणांद्वारे पाण्याचा कार्यक्षम वापर वाढवता येतो.



फवारणी सिंचन पद्धतींचा वापर केल्यास पाण्याची बचत होते. आर्थिक विकास आणि जलव्यवस्थापन यामध्ये समतोल साधण्यासाठी धोरणात्मक पातळीवर बदल करणे आवश्यक आहे. सर्वप्रथम पाण्याचे मूल्य निश्चित करणे आणि त्याचा जबाबदारीने वापर सुनिश्चित

तंत्रज्ञानाचा वापरही या समतोलासाठी महत्त्वाचा आहे. स्मार्ट वॉटर मीटरिंग, IoT आधारित जलमापन प्रणाली आणि डेटा विश्लेषण यामुळे पाण्याचा वापर अधिक अचूकपणे नियंत्रित करता येतो. जलस्त्रोतांचे डिजिटल मॅपिंग आणि रिअल टाईम मॉनिटरिंग यामुळे नियोजन अधिक प्रभावी होते. शहरी भागात वॉटर सेन्सिटिव्ह अर्बन प्लॅनिंग ही संकल्पना स्वीकारणे आवश्यक आहे. पावसाचे पाणी साठवणे, जलसंधारण करणे, हरित क्षेत्र वाढवणे आणि जल प्रवाहाचे नैसर्गिक मार्ग जपणे या उपाययोजनांमुळे शहरांतील पाण्याचा ताण कमी होतो. ग्रामीण भागात जलसंधारण, वॉटरशेड व्यवस्थापन आणि स्थानिक जलस्त्रोतांचे पुनरुज्जीवन यावर भर देणे गरजेचे आहे.

या प्रक्रियेत उद्योग, सरकार आणि नागरिक यांची संयुक्त भूमिका महत्त्वाची आहे. उद्योगांनी पाण्याचा कार्यक्षम वापर आणि पुनर्वापर तंत्रज्ञान स्वीकारले पाहिजे. सरकारने धोरणे, नियम आणि प्रोत्साहन योजना तयार करून शाश्वत पद्धतींना चालना दिली पाहिजे. नागरिकांनी पाण्याच्या वापरात जाणीवपूर्वक बदल घडवून आणले पाहिजेत.

हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर या विषयाचे महत्त्व अधिक वाढते. पर्जन्यमानातील अनिश्चितता, दुष्काळ आणि पूर यामुळे जलस्त्रोतांवर ताण वाढत आहे. अशा स्थितीत शाश्वत जलव्यवस्थापन हे केवळ पर्यावरणीय गरज नसून आर्थिक गरजही बनले आहे. शाश्वत विकासाच्या दृष्टीने पाहिले, तर पाणी हे सर्व क्षेत्रांना जोडणारे महत्त्वाचे घटक आहे. स्वच्छ पाणी, अन्नसुरक्षा, आरोग्य, औद्योगिक विकास आणि पर्यावरण संरक्षण या सर्व बाबींमध्ये पाण्याची भूमिका केंद्रस्थानी आहे. त्यामुळे विकासाचा विचार करताना पाण्याला केंद्रस्थानी ठेवणे आवश्यक आहे. पाण्याचा अतिरेक वापर करून साधलेला विकास हा भविष्यातील पिढ्यांकडून घेतलेले कर्ज आहे, तर पारिस्थितिक चक्रीय जल अर्थव्यवस्था ही आजची समृद्धी आणि उद्याचे अस्तित्व, यामधील मजबूत दुवा आहे.

**डॉ. मंगेश कश्यप**

## आयटी क्षेत्रातील अदृश्य बेड्या



भारताच्या आर्थिक प्रगतीचा कणा मानल्या जाणाऱ्या आयटी क्षेत्रातून येणाऱ्या बातम्या अत्यंत चिंताजनक आहेत. नाशिक येथील टीसीसीमध्ये झालेल्या जबरदस्ती धर्मांतराच्या प्रयत्नांबरोबरच लैंगिक छळ आणि नोकरीतील असुरक्षितता ही केवळ गुन्हेगारी घटना नसून आधुनिक गुलामगिरी आणि सत्तेच्या गैरवापराचे भयावह रूप आहे.

कोणत्याही संस्थेमध्ये कर्मचाऱ्यांच्या कल्याण व सुरक्षेची जबाबदारी एचआर विभागावर असते; परंतु नाशिकमध्ये या गंभीर गुन्ह्यांचे नेतृत्व स्वतः एचआर विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी केले, ही बाब अत्यंत धक्कादायक आहे. तेथे असे वातावरण निर्माण करण्यात आले की, कर्मचारी ना आपल्या श्रद्धेचे संरक्षण करू शकत होते, ना सन्मानाने काम करू शकत होते. नोकरी जाण्याची आणि करिअर उद्ध्वस्त होण्याची भीती दाखवून कर्मचाऱ्यांवर लैंगिक शोषण व धर्मांतरासाठी दबाव टाकणे हे लोकशाही देशासाठी लाजिरवाणे आहे.आयटी क्षेत्रात एवढ्या मोठ्या प्रमाणावर मानवी हक्कांचे उल्लंघन का होत आहे? याचे मुख्य कारण म्हणजे या क्षेत्रात मजबूत कामगार संघटनांचा अभाव आहे.इतर क्षेत्रातील कामगारांकडे त्यांच्या समस्या मांडण्यासाठी सशक्त संघटना आहेत; परंतु आयटी कर्मचारी अनेकदा वैयक्तिक पातळीवर एकटे पडतात.क़ंपन्यांमधील अंतर्गत तक्रार समित्या (आयसीसी) अनेकदा व्यवस्थापनाच्या हिताचे रक्षण करणारे साधन बनतात.नोकरी जाण्याच्या भीतीमुळे अनेकजण तक्रार करण्यास घाबरतात, कारण त्यामुळे त्यांचे करिअर धोक्यात येऊ शकते.

नाशिकमध्ये घडलेली घटना ही एकट्या कंपनीपुरती मर्यादित नाही. जर तेथे मजबूत संघटना असती तर कर्मचारी अशा प्रकारच्या घटनांना सुरुवातीलाच आळा घालू शकले असते.नाशिक प्रकरणात पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे की, जिल्हा साधा एक बाब आहे. मात्र ही घटना केवळ एका कंपनीपूर्ती मर्यादित आहे का याचा गंभीरपणे विचार करणे गरजेचे आहे. आयटी क्षेत्रातील इतर कंपन्यांमध्येही अशी प्रवृत्ती आहे का? याची चौकशी होणे आवश्यक आहे. सर्व विभागाच्या नेतृत्वाखाली आयटी कंपन्यांमध्ये आपक चौकशी आणि सोशल ऑडिट ही काळाची गरज आहे.

## समाधानी वृत्ती कमी झाली

समाधान ही वृत्ती असून आपण ती स्वीकारली तर आयुष्य सुखी होते. परंतु या उलट असमाधानी वृत्ती संकटांना निमंत्रण देतेच पण आपण आपले आरोग्य,मानसिक शांती हरवून बसतो.सध्याच्या परिस्थितीत आपण ही समाधानी वृत्तीच हरवून बसलो आहोत.प्रत्येकालाच सारखे काही ना काही हवे आहे. त्यासाठीच हा सर्व आटापिटा आणि शेवटी निराशाच पदरी पडते.गाडी, बंगला, पैसा असूनही लोक असमाधानी आहेत. प्रत्येकाला दुसऱ्यापेक्षा माझ्याकडे जास्त असावे असा हव्यास आहे.दोन भावंडात वारसा हक्काच्या संपत्तीवरून भांडणे आहेत.लाखो खटले न्यायालयात पडून आहेत.आणि यातूनच जन्माला येते ती ईर्षा, द्वेष, हिंसा. जे दुसऱ्या जवळ आहे ते मलाच हवे अशी मानसिकता समाजाची झाली आहे. अशी कितीतरी उदाहरणे देता येतील की अशा असमाधानी मुलांनी पैशासाठी, संपत्तीसाठी आपल्या आई-वडिलांना ठार मारले किंवा घराबाहेर काढले.

सध्या चालू असलेले अमेरिकन- इराण युद्ध हे देखील असमाधानी वृत्तीचे उत्तम उदाहरण आहे. क्षेत्रफळ मोठ्या असलेल्या अमेरिकेची लोकसंख्या मात्र भारताच्या तुलनेत अगदीच कमी आहे.अमेरिका अतिशय संपन्न देश आहे.सगळ्या जगाचा ओघ अमेरिकेकडे वाहतो आहे.सर्व क्षेत्रात प्रगती करूनही अमेरिका असमाधानी आहे. आखाती देशातील तेलावर नियंत्रण मिळवण्यासाठी इराणवर आक्रमण केले. आणि स्वतःची पाठ थोपटून घेतली. इराण नमते घेत नाही म्हणून संपूर्ण इराणच नष्ट करू अशी धमकी सतत दिली जाते. म्हणजे अमेरिकेजवळ सर्व असूनही असमाधानीवृत्ती यातून दिसते आणि त्यासाठी कोणतेही क्रौर्य करण्याची मानसिकताही यातून दिसून येते आणि याचे परिणाम मात्र भयंकर होतील. म्हणजे माझं ते माझे आणि तुझे तेही माझे यामुळे संपूर्ण मानवी समाजच आपला आनंद, आपली आत्मशांती गमावून बसला आहे असे वाटते.मात्र भारतासारख्या अध्यात्मिकतेची जोड जीवनात असलेल्या समाजात अजूनही आशेचा किरण आहे.

**माधवी पत्की**

### महिला सक्षमीकरणाचा 'अमरावती पॅटर्न'

## 'वैदर्भी मार्ट'च्या माध्यमातून ग्रामीण उत्पादनांना जागतिक बाजारपेठ

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत (उमेद) अमरावती जिल्ह्यातील ग्रामीण महिलांच्या आर्थिक उन्नतीसाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. जिल्ह्यातील स्वयं सहाय्यता समूहांच्या उत्पादनांना हक्काची आणि शाश्वत बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी रुख्मिणी नगर चौक, माल टेकडी येथे 'वैदर्भी मार्ट' या भव्य विक्री केंद्राची (मॉल) स्थापना करण्यात आली आहे. या विक्री केंद्राचे उद्घाटन पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते २८ मार्च २०२५ रोजी करण्यात आले.

उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, अमरावती अंतर्गत स्वयंसहायता समूहांची स्थापना करणे,



स्वयंसहायता समूहातील महिलांच्या संस्था स्थापन करणे, त्यांना आवश्यकतेनुसार बँक कर्ज पुरवठा उपलब्ध करून देणे व विविध उपजीविका घटकाअंतर्गत प्रकल्प राबविण्यात येत आहेत. तसेच या माध्यमातून जिल्ह्यामध्ये विविध महिला उद्योजक तयार होत असून विविध उत्पादने निर्माण करण्यात येत आहे.

जिल्ह्यात आजवर १९ हजार २०० स्वयं सहाय्यता समूह, १ हजार ५९ ग्राम संघ आणि ५९ प्रभाग संघांचे जाळे निर्माण झाले आहे. या समूहांच्या माध्यमातून महिला उद्योजिकांनी तयार केलेल्या विविध उत्पादनांना एक विशिष्ट ओळख मिळवून देण्यासाठी प्रशासनाने 'वैदर्भी' हा ब्रँड विकसित केला आहे. या ब्रँडअंतर्गत ९० उत्कृष्ट उत्पादनांची निवड करण्यात आली असून त्यांची २१ वेगवेगळ्या विभागांमध्ये विभागणी करण्यात आली आहे. या सर्व उत्पादनांचे व्यावसायिकरित्या आकर्षक ब्रँडिंग करण्यात आले असून ते ग्राहकांसाठी 'वैदर्भी मार्ट' मध्ये उपलब्ध आहेत. खास विदर्भाची खासियत असणारे सरगुंडे, विविध पापड, शेवया, चिप्स, सांडगे, लोणची, मुराब्बा असे सर्व उन्हाळ्याची दाहकता चवदार करणारे पदार्थ अमरावतीकरांना येथे सहज रास्त भावात उपलब्ध होतात. या पदार्थांची मुंबई - पुण्याकडे नोकरी निमित्त असणाऱ्या अमरावतीकरांमध्ये विशेष मागणी आहे. परदेशात स्थायिक अमरावतीकारांसाठी देखील येथील उन्हाळी खाद्यपदार्थ वर्षभर वापरण्यासाठी पाठविले जातात, हे विशेष!

वर्षभर अमरावतीमध्ये चालणारे विविध प्रदर्शने, कृषी महोत्सव अशा ठिकाणी वैदर्भी मार्टच्या वस्तू , विविध खाद्याने विक्रीस उपलब्ध असतात. उपलब्ध नसलेली खाद्यपदार्थ तातडीने बनवूनही दिली जातात.रुख्मिणी नगर येथील अंदाजे ८० बाय २० स्क्वेअर फूट जागेत हे दोन मजली विक्री केंद्र उभारण्यात आले आहे. या मॉलचे स्वरूप अत्यंत आधुनिक असून त्याची आतील सजावट पूर्णपणे अत्याधुनिक व सुसज्ज आहे. पहिल्या मजल्यावर ग्राहकांसाठी विविध प्रकारचे मसाले, लोणची, पापड, विविध डाळी, धान्य, खाद्यतेल, ज्यूस, जॅम, बांबू व सजावटीच्या वस्तू, आयुर्वेदिक औषधी, ड्रायफ्रूट्स, बेकरी उत्पादने (बिस्किटे, टोस्ट, नमकीन) आणि महिलांची फॅशनेबल ज्वेलरी विक्रीसाठी ठेवण्यात आली आहे.

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या या उपक्रमामुळे जिल्ह्यातील हजारो महिलांना त्यांच्या मालाची थेट विक्री करण्याची संधी प्राप्त झाली आहे. यामुळे केवळ मध्यस्थांची साखळी मोडीत निघत नाही, तर महिलांच्या उत्पन्नात शाश्वत वाढ होऊन त्या आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होत आहे.'वैदर्भी मार्ट' हे केवळ एक विक्री केंद्र नसून ग्रामीण भागातील महिलांच्या जिद्दीला आणि कौशल्याला जागतिक बाजारपेठेच्या स्पर्धेत उतरवण्यासाठी उभारलेले एक सक्षम व्यासपीठ ठरले आहे.

**अपर्णा यावलकर**
माहिती अधिकारी,
जिल्हा माहिती कार्यालय,
अमरावती

## जनसंपर्क:लोकशाहीचा पाचवा स्तंभ

आज सरकारे, राजकीय पक्ष आणि नेते देखील आपली योग्य प्रतिमा आणि ब्रँड निर्माण करण्यासाठी सतत प्रयत्नशील आहेत. आपल्या संस्थेबद्दल लोकांनी तशीच धारणा ठेवावी जशी आपण अपेक्षा करता, अशा प्रयत्नांना 'ब्रँडिंग' म्हणतात.आज प्रत्येक राष्ट्र, सरकार, संस्था आणि व्यक्ती विश्वास संपादन करण्यासाठी सकारात्मक प्रतिमा निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे. प्रतिमा म्हणजे एखाद्या संस्था किंवा व्यक्तीबद्दल तयार होणारी धारणा. चांगली प्रतिमा ही आपली सर्वात मोठी संपत्ती आणि अलंकार आहे. सकारात्मक प्रतिमेचे व्यवस्थापन म्हणजेच जनसंपर्क.जनसंपर्क ही एक व्यवस्थापन शास्त्र आहे, ज्याच्या माध्यमातून संस्था आणि त्यांच्या हितधारकांमध्ये विश्वासार्ह आणि नैतिक संवादाद्वारे अर्थपूर्ण संबंध प्रस्थापित केले जातात. जनसंपर्क संस्था आणि हितधारक यांच्यामध्ये विश्वासाचा सेतू निर्माण करतो.

आज देश, समाज आणि संपूर्ण जगात विश्वासाची कमतरता जाणवते. आणि जनसंपर्काच्या माध्यमातून सकारात्मकतेचा सुगंध पसरवण्याची मोठी गरज आहे.भारत हा जगातील सर्वात मोठा लोकशाही देश आहे. भारताचे संविधान हे जगातील सर्वात मोठे लिखित संविधान आहे, जे भारताला सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष आणि लोकशाही प्रजासत्ताक म्हणून घोषित करते. हे देशाची राजकीय रचना, कार्यप्रणाली आणि नागरिकांचे अधिकार व कर्तव्ये निश्चित करते.

लोकशाहीचे चार प्रमुख स्तंभ आहेत:- विधायिका-कायदे तयार करणारी संस्था,कार्यपालिका -कायद्यांची अंमलबजावणी करणारी यंत्रणा,न्यायपालिका-न्याय देणारी स्वतंत्र व्यवस्था,माध्यमे (मीडिया)-माहिती प्रसारित करणारा आणि सत्तेला जबाबदार धरणारा घटक.हे सर्व स्तंभ लोकशाहीची मजबुती, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व सुनिश्चित करतात.लोकशाही ही केवळ राजकीय व्यवस्था नसून ती समानता, स्वातंत्र्य, मूल्ये आणि राष्ट्रनिर्मितीवर आधारित एक व्यापक संकल्पना आहे.

'जनसंपर्क:लोकशाहीचा पाचवा स्तंभ' या संकल्पनेद्वारे आपण जनसंपर्काची भूमिका अधिक ठळकपणे मांडू शकतो.जनसंपर्क विविध हितधारकांमध्ये विश्वास निर्माण करून राष्ट्रनिर्मितीत महत्त्वाची भूमिका बजावतो. जनसंपर्क तज्ञ केवळ संवाद साधत नाहीत, तर ते समाजशास्त्रज्ञ म्हणूनही कार्य करतात आणि लोकांच्या भावना, अपेक्षा व धारणा समजून घेतात.

पब्लिक रिलेशन्स सोसायटी ऑफ इंडिया ही संस्था १९५८ पासून जनसंपर्क क्षेत्राला व्यावसायिक मान्यता मिळवून देण्यासाठी कार्यरत आहे. देशभरात तिच्या २५ हून अधिक शाखा आणि ५००० पेक्षा जास्त सदस्य आहेत.PRSI ने अनेक महत्त्वपूर्ण उपक्रम राबवले आहेत. जसे,मीडिया पारदर्शकता आभियान,एकता भारत अभियान,दहशतवादविरोधी चळवळ,मतदार जागरूकता अभियान,भारतीय सशस्त्र दलांना नमन,'एक राष्ट्र-एक अजेंडा -एक आवाज'.RTI (माहितीचा अधिकार) लागू झाल्यानंतर PRSI ने जनजागृतीसाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले.

कोविड-१९ महामारीदरम्यान PRSI ने सोशल मीडियाच्या माध्यमातून जनजागृती, वेबिनार, मदतकार्य आणि निधी संकलन यांसारखे उपक्रम राबवले.विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी पीएच.डी. धारकांना सन्मानित करते आणि त्यांना आजीवन सदस्यत्व तसेच रोख पारितोषिक देते.'विजयी भारत अभियान' (२०२०) द्वारे आत्मनिर्भर भारताच्या दिशेने सकारात्मक वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला.भारत आज अर्थव्यवस्था, तंत्रज्ञान, संरक्षण आणि नवोन्मेष या क्षेत्रांत झपाट्याने प्रगती करत आहे. २०२६ पर्यंत IT क्षेत्र मोठ्या प्रमाणात वाढण्याची अपेक्षा आहे.PRSI चा 'नालंदा' उपक्रम विद्यार्थी आणि उद्योग यांच्यातील दुवा मजबूत करण्यासाठी कार्यरत आहे.सोशल मीडिया आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) यांचा जबाबदारीने वापर करणे आज आवश्यक आहे. तंत्रज्ञानाचा गैरवापर टाळणे ही जनसंपर्क क्षेत्राची मोठी जबाबदारी आहे.भारत २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र बनवण्यासाठी जनसंपर्क क्षेत्र 'विश्वासाचे सेतू' उभारण्याचे कार्य करत आहे.जनसंपर्काला व्यावसायिक मान्यता दिल्यास, तो लोकशाही अधिक मजबूत करेल आणि जगासमोर भारताची खरी ताकद प्रभावीपणे मांडेल.



**डॉ.अजीत पाठक**
(राष्ट्रीय अध्यक्ष
पब्लिक रिलेशन्स सोसायटी ऑफ इंडिया)

## लोकशाहीत नारीशक्ती सन्मानाची आवश्यकता

कोणत्याही देशातील मनुष्यबळ यामध्ये पुरुष आणि स्त्री दोन्ही घटक देश उभारणीत उपयोगी आले पाहिजे असे धोरण तेथील प्रस्थापित सरकारचे असते. अगदी त्याच पृष्ठभूमीवर भारतात सन २०२३ साली संसद भवनात नारीशक्ती वंदन विधेयक एकमताने संमत झाले होते आणि कोणत्याही परिस्थितीत या विधेयकाची सन २०२९ पर्यंत अंमलबजावणी होणे आवश्यक होते. त्यासाठी 'महिला आरक्षण आणि मतदारसंघ पुनर्रचना (परिसीमन) १३१ वे घटना दुरुस्ती विधेयक' मंजूर होणे आवश्यक होते. हे विधेयक मंजूर झाले असते तर सन २०२३ साली एकमताने संमत झालेल्या नारीशक्ती वंदन विधेयकाची अंमलबजावणी करता आली असती. दुर्दैवाने संसदेच्या विशेष अधिवेशनात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मांडलेले महिला आरक्षण आणि मतदारसंघ पुनर्रचना (परिसीमन) विधेयक १७ एप्रिल रोजी लोकसभेत नामंजूर होऊन कोसळले. लोकसभेतील ५२८ सदस्यांच्या दोन तृतियांश बहुमताचे मतदान ३५२ होते पण विधेयकाच्या बाजूने म्हणजे समर्थनीय मतदान फक्त २९८ एवढेच मिळाले व विरोधात २३० मते पडलीत म्हणजे विधेयकाच्या समर्थनासाठी ५४ मते कमी मिळाली आणि हे विधेयक नामंजूर झाले.

नारीशक्ती वंदन अधिनियम विधेयक आणि महिला आरक्षण आणि मतदारसंघ पुनर्रचना १३१ वे घटना दुरुस्ती विधेयक हे दोन्ही वेगवेगळे आहेत. नारीशक्ती वंदन अधिनियम विधेयकाची अंमलबजावणी होण्यासाठी संसदेमध्ये महिला आरक्षण आणि मतदारसंघ पुनर्रचना विधेयक मंजूर होणे आवश्यक होते. ज्याद्वारे देशाच्या संपूर्ण राज्यातील विधानसभांमध्ये व संस्थेमधील लोकसभेत महिलांना ३३ टक्के आरक्षण मिळून प्रतिनिधित्व करता आले असते. देशातील व राज्यातील कायदे निर्मितीच्या प्रक्रीयेत सहभागी होता आले असते. ज्यामुळे देशातील लोकशाही अधिक बळकट आणि कार्यक्षम झाली असती.महाराष्ट्रासारख्या राज्याने स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये म्हणजे ग्रामपंचायत, पंचायत समिती, नगरपालिका, महानगरपालिका, जिल्हा परिषद यांमध्ये महिलांना सुरुवातीला ३३% व नंतर ५०% प्रतिनिधित्व दिलेले आहे. अगदी अशाच प्रकारचे प्रतिनिधित्व महिलांना राज्यांच्या विधानसभेत व संसदेतील लोकसभेत देऊन नारी शक्तीला निर्णय प्रक्रियेत समाविष्ट करुन घेतल्या जाणार होते आणि हाच नारीशक्तीचा सन्मान व आदर प्रधानमंत्री नरेंद्रजी मोदी यांच्या मनात विधेयकाच्या रुपाने होता पण दुर्दैवाने त्यांचे हे स्वप्न भंगले आहे.

महिला आरक्षण आणि मतदारसंघ पुनर्रचना विधेयक परिसीमन १३१ वे घटना दुरुस्ती विधेयक जर मंजूर झाले असते तर लोकसभेची सध्याची सदस्य संख्या ५४३ किंवा ५४८ वरुन ८५० पर्यंत वाढणार होती त्यात महिला खासदारांची प्रत्यक्ष संख्या सध्याच्या ८२ वरुन २७० ते २८० इतकी वाढली असती.भारतासारख्या प्रगत लोकशाही असलेल्या देशात नारी शक्ती वंदन अधिनियम विधेयकाची अंमलबजावणी करणारे महिला आरक्षण आणि मतदारसंघ पुनर्रचना विधेयक नामंजूर होते ही अत्यंत दुःखाची बाब होय. याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्रजी मोदी यांनी सुध्दा दुःख व्यक्त केले आहे. विधेयक नामंजूर होणे हा नारी शक्तीचा अपमानच होय. या देशात पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून देशाच्या जडण घडणीमध्ये महिलांनी योगदान दिले आहे. अनेक क्षेत्रात आपले कर्तृत्व सिध्द करून दाखवले आहे. मग ती सनदी सेवा असो, प्रशासकीय सेवा असो, देशरक्षा असो, राजकीय नेतृत्व असो, समाजसेवा असो किंवा बलिदान असो अशा सर्व क्षेत्रात महिलांनी आपल्या देशाची गरीमा व अस्मिता उजळवली आहे.

राज्याच्या विधीमंडळातही व देशाच्या संसदेमध्ये कायदे निर्मितीची प्रक्रिया पार पाडली जाते. ह्या कायदे निर्मितीच्या प्रक्रीयेत महिलांना सुध्दा प्रतिनिधित्व करता आले पाहिजे तरच लोकशाही सशक्त व प्रशस्त होईल हा मूळ आणि मुख्य उद्देश नारीशक्ती वंदन अधिनियम विधेयकाचा आहे. आज स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये पन्नास टक्के महिला प्रतिनिधित्व करतात त्यांनी अनेक लोकसमस्यांना वाचा फोडली आहे व सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांना व समस्यांना वाचा फोडून न्याय मिळवून दिला आहे हे विसरून चालणार नाही. नारीशक्ती कुटुंबाची जबाबदारी पार पाडण्यापुरती मर्यादीत न राहता शक्तिशाली, प्रगत देशाच्या उभारणीमध्ये कामी आली पाहिजे म्हणून ती देशाच्या कायदेनिर्मिती प्रक्रीयेचा घटक होणे आवश्यक आहे.तेव्हाच देशाचे पन्नास टक्के महिला व पन्नास टक्के पुरुष असे शतप्रतिशत मनुष्यबळ कामात येईल.



**सतनाम कौर हुडा,**
बडनेरा नवी वस्ती
मो.८३२९९३२४०७

## संक्षिप्त

### आज श्री सत्यसाई आराधना महोत्सव

**सेलू-** सत्य साई बाबा यांच्या महासमाधी दिनानिमित्त आज शुक्रवार, २४ एप्रिल रोजी शहरातील प्रभाग क्रमांक १७, भगत ले-आउट येथील सत्यसाई मंदिरात आराधना महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. महोत्सवाची सुरुवात सकाळी ७ वाजता साई मूर्तीच्या जलाभिषेक व पूजनाने होणार आहे. त्यानंतर ओमकार साई गायत्री मंत्र, सत्यसाई १०८ नामावली मंत्रजप व भजनाचा कार्यक्रम पार पडणार आहे. सकाळच्या सत्राचा समारोप आरती व विभूती प्रसादाने होईल.दुपारी १२ ते ४ या वेळेत वारकरी रेणुका माता महिला भजन मंडळ, महाबळ यांच्या भजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानंतर महाप्रसाद व अन्नदानाचा कार्यक्रम होणार आहे.या प्रसंगी नारायण सेवा मंडळाच्या वतीने माहेर निवास शांती वृद्धाश्रम, विकास चौक येथे सेवा उपक्रम राबविण्यात येणार असून श्री गबने यांचे सहकार्य लाभणार आहे. सायंकाळी ५.३० ते ६.३० या वेळेत भाविकांनी उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.



### दुचाकीच्या धडकेत वृद्धाचा मृत्यू

**वर्धा-** सकाळी पायी फिरण्यासाठी गेलेल्या वासुदेव बावणे (७५, रा. म्हाडा कॉलनी) यांचा दुचाकीच्या धडकेत मृत्यू झाला. हनुमान टेकडी परिसरातील पोलिस वॉटरजवळ ही घटना घडली. बावणे हे रामराव ठाकरे यांच्यासोबत फिरत असताना एमएच-३२ एटी ९७८८ क्रमांकाच्या दुचाकीने त्यांना जोरदार धडक दिली. अपघात इतका भीषण होता की बावणे गंभीर जखमी झाले. स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदतीस धाव घेत त्यांना रुग्णालयात हलविण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. वृद्धांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. या प्रकरणी रामनगर पोलिसांनी गुन्हा नोंद केला असून पुढील तपास सुरू आहे. वाहतुकीतील बेदरकारपणामुळे अशा घटना वाढत असल्याची चर्चा नागरिकांत होत आहे.

### साईनगरात घरफोडी; ७२ हजारांचा ऐवज लंपास

**वर्धा-** साईनगर परिसरातील मानमोडे ले-आउट येथे अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करत ७२ हजार रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. प्रवीण गोठाने (४३) हे कुटुंबासह बाहेरगावी गेले असताना चोरट्यांनी त्यांच्या घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. घरातील आलमारी उघडून सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा ऐवज चोरून नेण्यात आला. परत आल्यानंतर चोरीचा प्रकार लक्षात येताच त्यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सावंगी पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा नोंद केला असून तपास सुरू केला आहे. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले जात आहेत.

# पिपरी मेघे इको पार्कला १५.३९ कोटींचा वाढीव निधी

## पालकमंत्री भोयर यांच्या प्रयत्नांना यश

**वर्धा/ जनमाध्यम**

वर्धेकरांसाठी आनंदाची बातमी समोर आली आहे. सालोडनंतर आता पिपरी मेघे येथील टेकडीच्या पायथ्याशी उभारण्यात आलेल्या इको पार्कच्या विकासासाठी तब्बल १५ कोटी ३९ लाख रुपयांचा वाढीव निधी मंजूर करण्यात आला आहे. या निर्णयामागे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याचे फलित असल्याचे स्पष्ट झाले आहे.

वर्धा शहराचा गेल्या काही वर्षांत झपाट्याने विस्तार होत असताना, शहरासह आसपासच्या १४ गावांमध्येही शहरीकरणाची गती वाढली आहे. मात्र, नागरिकांना विरंगुळ्यासाठी दर्जेदार हरित उद्यानांची कमतरता जाणवत होती. ही गरज लक्षात घेऊन डॉ. भोयर यांनी शहर व परिसरात पर्यावरणपूरक उद्याननिर्मितीचा ध्यास घेतला. यापूर्वी सालोड येथे सुमारे ३० कोटींच्या निधीतून इको पार्कला मंजुरी मिळाली होती. त्याच धर्तीवर पिपरी मेघे येथे श्रीकृष्णदास जाजू महाविद्यालयालगत सामाजिक वनीकरण विभागामार्फत इको पार्क उभारण्यात आले. मात्र, या पार्कमध्ये अधिक सुविधा व आकर्षकता वाढविण्यासाठी अतिरिक्त निधीची गरज भासत होती. त्यासाठी डॉ. भोयर यांनी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करत प्रस्ताव मंजूर करून घेतला.



नव्या निधीतून पार्कमध्ये पर्यावरणपूरक सुविधा उभारल्या जाणार असून, विशेषतः विद्यार्थ्यांसाठी निसर्ग, जैवविविधता आणि पर्यावरण याबाबत माहिती देणारे उपक्रम राबविण्यात येणार आहेत. बांबू व लाकडाच्या संरचना, नैसर्गिक घटकांचा वापर आणि निसर्गाशी सुसंगत रचना ही या इको पार्कची वैशिष्ट्ये ठरणार आहेत.दरम्यान, निधी मंजुरीबद्दल डॉ. भोयर यांनी राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांची भेट घेऊन आभार मानले. तसेच बोर टायगर रिझर्वच्या विकासकामांचा आढावा घेण्यासाठी वर्ध्यात बैठक घेण्याची मागणीही त्यांनी केली आहे.एकूणच, वर्धा शहराला दोन इको पार्कची हरित भेट मिळत असून, यामुळे शहराच्या विकासाला नवी दिशा मिळणार असल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.

## कर नाकारणाऱ्यांना ग्रामपंचायतींचा 'दणका'; वसुलीसाठी कठोर कारवाईचा इशारा

**साहूर/ जनमाध्यम**

ग्रामपंचायतींच्या उत्पन्नाचा कणा असलेली घरपट्टी व पाणीपट्टी कर वसुली सध्या ठप्प झाली असून, ग्रामस्थांच्या उदासीनतेमुळे प्रशासनाचे धाबे दणाणले आहेत. आर्थिक वर्ष २०२५-२६ अखेर येऊन ठेपले असतानाही अपेक्षित वसुली न झाल्याने ग्रामपंचायतींना अक्षरशः 'टेंशन' आले आहे.



मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत दिलेल्या ५० टक्के कर सवलतीच्या सुवर्णसंधीलाही ग्रामस्थांनी सपशेल नकार दिला. वारंवार सूचना, आवाहने करूनही कर भरण्याकडे पाठ फिरवली. आता सवलत संपल्यानंतर पूर्ण कर भरण्याची वेळ आली असताना, थकबाकीचा डोंगर वाढत चालला आहे.ग्रामपंचायत प्रशासनाकडून जानेवारीपासूनच घराघरांत जाऊन वसुली मोहीम राबवली जात आहे. मात्र, कर भरण्याबाबत ग्रामस्थांमध्ये कमालीची अनास्था दिसून येत आहे. अनेकांकडे १० हजार ते ५० हजार रुपयांपर्यंत थकबाकी असल्याचे समोर आले आहे. परिणामी विकासकामे, पाणीपुरवठा, नागरी सुविधा व कर्मचाऱ्यांचे वेतन या सर्वांवर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.या पार्श्वभूमीवर आता ग्रामपंचायत प्रशासनाने कठोर भूमिका घेत थकबाकीदारांवर पोलीस संरक्षणात कारवाई करण्याचा निर्णय घेतला आहे. जप्ती, सक्तीच्या उपाययोजना टाळायच्या असतील, तर तात्काळ कर भरण्याचा इशारा देण्यात आला आहे.गाव विकासाचा पाया असलेल्या कराकडे दुर्लक्ष करणाऱ्या नागरिकांमुळेच ग्रामपंचायती अडचणीत सापडल्या असून, आता तरी ग्रामस्थ शहाणपणाने वागणार का, हा प्रश्न उपस्थित होत आहे.

### बुद्धनगरात विचारांचा जल्लोष; आंबेडकर जयंती सप्ताह

## फुले-आंबेडकरांच्या विचारांनी भारावला

**वर्धा/ जनमाध्यम**

बुद्धनगर (गौरक्षण) परिसरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि गौतम बुद्ध जयंतीनिमित्त आयोजित सप्ताहाने सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक चळवळीला नवे बळ दिले. ११ ते २१ एप्रिल दरम्यान पँथर चौक येथे रंगलेल्या या महोत्सवात विविध स्पर्धा, व्याख्याने आणि सांस्कृतिक कार्यक्रमांची अक्षरशः मेजवानीच अनुभवायला मिळाली.

उत्सवाची सुरुवात महात्मा ज्योतिबा फुले जयंतीनिमित्त डॉ. स्वप्नील भगत यांच्या प्रभावी व्याख्यानाने झाली. महिलांपासून विद्यार्थ्यांपर्यंत सर्वांसाठी सामान्य ज्ञान, वक्तृत्व, निबंध, चित्रकला, बुद्धिबळ, कॅरम व नृत्य स्पर्धा घेऊन प्रतिभेला व्यासपीठ मिळाले.१४ एप्रिल रोजी आंबेडकर जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांनी 'सर्वांसाठी मोफत व सक्तीचे शिक्षण' या विषयावर सादर केलेल्या झांकीने उपस्थितांची मने जिंकली. १८ एप्रिलला 'भीमराव एकच राजा' या भीम-बुद्ध गीतांच्या कार्यक्रमाने वातावरण भारावून गेले, तर १९ एप्रिलला तुषार सूर्यवंशी यांच्या प्रबोधनात्मक विनोदी सादरीकरणाने रसिकांना खिळवून ठेवले.२० एप्रिल रोजी पी. एस. खोब्रागडे व डॉ. राजकुमार मून यांनी बौद्ध समाजाच्या सर्वांगीण प्रगतीवर मार्गदर्शन करताना विचारांची दिशा दिली. यावेळी विविध स्पर्धांतील विजेत्यांचा सन्मान करण्यात आला. २१ एप्रिलला आनंद मेळाव्याने या सप्ताहाचा उत्साहपूर्ण समारोप झाला.अध्यक्ष प्रशांत मून यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण समितीने हा उत्सव यशस्वी केला. नागरिकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे बुद्धनगरात विचार, संस्कृती आणि सामाजिक बांधिलकीचा खरा उत्सव साकार झाला.



# सावंगी मेघे पोलिसांची कारवाई, दारूसह १.३० लाखांचा माल जप्त

**वर्धा/ जनमाध्यम**

सावंगी (मेघे) पोलिसांनी अवैध दारू वाहतुकीवर कारवाई करत १ लाख ३० हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईदरम्यान संशयित आरोपी पोलिसांना चकवा देत पसार झाला असून त्याचा शोध सुरू आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पेट्रोलिंगदरम्यान मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी नागठाणा रोडवरील अग्नीहोत्री कॉलेज गेटजवळ नाकेबंदी केली. यावेळी सिंदी (मेघे) कडून नागठाणा दिशेने येणारी निळ्या रंगाची सुझुकी ॲक्सेस दुचाकी संशयास्पदरीत्या आढळली. पोलिसांनी अडविण्याचा प्रयत्न करताच चालकाने दुचाकी सोडून घटनास्थळावरून पळ काढला.त्यानंतर पंचासमक्ष तपासणी केली असता, विनाक्रमांकाच्या दुचाकीत मोठ्या प्रमाणात देशी व विदेशी दारू आढळून आली.



यामध्ये १ लाख रुपये किंमतीची सुझुकी ॲक्सेस, १० हजार ८०० रुपयांच्या विदेशी दारूच्या ३६ बाटल्या (ऑफिसर चॉईस) तसेच २० हजार रुपयांच्या देशी दारूच्या २०० प्लास्टिक शिश्या (टॅन्गो पंच) असा एकूण १ लाख ३० हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.या प्रकरणी सावंगी (मेघे) पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून फरार आरोपीचा शोध सुरू आहे. सदर कारवाई पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल, अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे व उपविभागीय पोलीस अधिकारी प्रमोद मकेश्वर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक पंकज वाघोडे व त्यांच्या पथकाने केली.

## जिल्हा प्रसिद्धी प्रमुख गजानन जिकार यांचा सन्मान



**वर्धा/ जनमाध्यम**

सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व साहित्यिक क्षेत्रात सातत्याने कार्य करणाऱ्या जिल्हा प्रसिद्धी प्रमुख गजानन जिकार यांचा सन्मान येथे उत्साहात करण्यात आला. सचिन डान्स अकॅडमी व लायन्स क्लब गांधी सिटी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात हा सन्मान सोहळा पार पडला.

कार्यक्रमाची सुरुवात भगवान शिवशंकराच्या विधिवत पूजन व दीपप्रज्वलनाने झाली. उद्घाटक म्हणून राजे मुधोजी भोसले उपस्थित होते, तर अध्यक्षस्थानी पंडित शंकर प्रसाद अग्निहोत्री होते. मान्यवरांच्या हस्ते गजानन जिकार यांना शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

सन २००४ पासून सामाजिक कार्यासोबत विविध दैनिकांत लेखन करणारे जिकार यांनी 'गुरूदेव साहित्य सेवा'च्या माध्यमातून समाजप्रबोधनाचे कार्य केले आहे. देशहितासाठी समर्पित सेवा पुढेही सुरू ठेवण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला.या प्रसंगी संदीप चिचाटे, अनिल नरेडी, आशिष पोहाने, मोहनबाबू अग्रवाल, दिलीप रोकडे, मनीषा लोखंडे, सचिन डंभारे, दामोदर राऊत, जयंत भालेराव यांच्यासह अनेक मान्यवर, साहित्यिक, पत्रकार व कला क्षेत्रातील व्यक्ती उपस्थित होते. कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

# नृत्योत्सवातून शास्त्रीय नृत्यकलेला नवे उर्जित रूप

### 'नृत्योत्सव-४'चा रंगतदार समारोप; मोहनबाबू अग्रवाल यांचे प्रतिपादन

**वर्धा/ जनमाध्यम**

भारतीय संस्कृतीचा आत्मा असलेल्या शास्त्रीय नृत्यकलेला 'नृत्योत्सव-४'मुळे नवसंजीवनी मिळाल्याचे मत ज्येष्ठ समाजसेवक मोहनबाबू अग्रवाल यांनी व्यक्त केले. सचिन डान्स अकॅडमी व लायन्स क्लब गांधी सिटी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या राष्ट्रीय स्तरावरील नृत्यस्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा नागठाणा येथील अग्निहोत्री इंजिनिअरिंग कॉलेजच्या सभागृहात उत्साहात पार पडला.

भरतनाट्यम, कथक, कुचिपुडी, ओडिसी यांसारख्या नृत्यप्रकारांमध्ये भाव, ताल, लय आणि अध्यात्माचा अद्भुत संगम आहे. मात्र, बदलत्या जीवनशैलीत तरुण पिढी या कलेपासून दूर जात असल्याची खंत व्यक्त करताना अग्रवाल यांनी सांगितले की, अशा स्पर्धांमुळे शास्त्रीय नृत्याला नवे व्यासपीठ मिळत आहे.या कार्यक्रमाला वर्धा कला महोत्सवचे अध्यक्ष संदीप चिचाटे, समाजसेवक बाळाभाऊ माऊस्कर, प्रदीप बजाज, मुख्य आयोजक प्रमोद वाकडे, प्राचार्य डॉ. गजानन जंगमवार यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली होती.




'नृत्योत्सव-४'मध्ये भरतनाट्यम, कुचिपुडी, सेमी-क्लासिकल, वेस्टर्न आणि कंटेम्पररी अशा विविध नृत्यप्रकारांतील तब्बल २५० सादरीकरणांनी रंगत आणली. स्थानिक कलाकार राघवी राऊळकर, पूर्वी नेवारे, जिया लोखंडे, ईशा गाढवकर, लक्ष्मी पिसुर्डे आणि चैत्रक्षी कलाने यांनी विविध प्रकारांत उल्लेखनीय यश संपादन केले.स्पर्धेचे परीक्षण अस्मिता काळे, हर्षदा उकळकर, प्रीतम विश्वास आणि ईशा हिरुडकर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कल्याणी टोणपे व अपेक्षा वाकडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन निखिल सातपुते यांनी मानले.हजारो रसिकांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी अपेक्षा वाकडे, संस्कृती वाकडे, अमोल देशपांडे, राधिका पंचभाई, अंकिता नंद, समर्थ कुकडे, सार्थक लाखे आदींनी परिश्रम घेतले.एकूणच, 'नृत्योत्सव-४'ने वर्ध्यात सांस्कृतिक चैतन्याची नवी लहर निर्माण केली आहे.

## नाला खोलीकरणाचा 'उपद्रव; शेतकऱ्यांची वाटच बंद

### शेती कसायची कशी : संतप्त शेतकऱ्यांचा आरोप



**देवळी/ जनमाध्यम**

तालुक्यातील गौळ येथील शेतकऱ्यांवर मृद व जलसंधारण विभागाच्या बेजबाबदार कामाचा फटका बसला असून अडेगाव–चिखली पांधन रस्त्यावरील नाला खोलीकरणामुळे शेतीकडे जाणारी वाटच बंद झाली आहे. शेतात जाण्याचा मार्गच नाही, तर शेती कसायची कशी, असा प्रश्न शेतकरी प्रशासनाला विचारत आहेत.

अडेगाव शिवारातील अनेक शेतकऱ्यांची शेती नाल्याच्या पलीकडे आहे. मात्र, विभागाने नाल्याचे प्रमाणापेक्षा अधिक खोलीकरण केल्याने हा नाला आता अडथळा बनला आहे. पायी जाणे धोकादायक झाले असून बैलगाडी, ट्रॅक्टरद्वारे शेतमाल ने-आण करणे पूर्णपणे ठप्प झाले आहे. शेतीच्या हंगामाच्या तोंडावरच ही परिस्थिती निर्माण झाल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे.नाला खोलीकरण करताना पूल किंवा 'परस' उभारणे ही मूलभूत गरज असताना त्याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप शेतकरी करत आहेत. काम करताना शेतकऱ्यांचा विचारच केला नाही का असा रोखठोक प्रश्न उपस्थित होत आहे. परिणामी, शेतीची वहिवाट बंद होऊन उत्पन्नावर गदा येण्याची भीती निर्माण झाली आहे.या गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी गौळ येथील शेतकऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन सादर केले असून तातडीने रस्ता किंवा पूल उभारण्याची मागणी केली आहे. प्रशासनाने वेळेत दखल घेतली नाही, तर आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.शेतकऱ्यांच्या घामाची किंमत ओळखत प्रशासन जागे होणार का, की अशीच शेतीची वाट बंद राहणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# मनोधैर्य योजना : पिडीत महिलांस १० लाखाचे अर्थसहाय्य

## जिल्ह्यात गेल्या वर्षात ४१ प्रकरणे मंजूर, १७ लाख ८० हजाराचे सहाय्य वितरण

**वर्धा/ जनमाध्यम**

राज्यात ठिकठिकाणी बलात्कार, लैंगिक अत्याचार ॲसिड हल्ला, ज्वालाग्राही, ज्वलनशील पदार्थांच्या हल्ल्यांमुळे बळी पडलेल्या महिला, मुलींना आर्थिक सहाय्य देऊन त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी मनोधैर्य योजना राबविली जाते. या योजनेंतर्गत १० लाखापर्यंत अर्थसहाय्य देण्याची तरतूद असून गेल्या आर्थिक वर्षात जिल्ह्यात ४१ प्रकरणात १७ लाख ८० हजाराचे सहाय्य वितरीत करण्यात आले आहे.

पिडीत महिलांना अर्थसहाय्य देऊन त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी २०१३ मध्ये योजना सुरु करण्यात आली. त्यानंतर वेळोवेळी योजनेत सुधारणा करण्यात आल्या. पुर्वी ही योजना महिला व बालविकास विभागाच्यावतीने राबविण्यात येत होती. जानेवारी २०२४ च्या शासन निर्णयान्वये ही योजना आता विधी सेवा प्राधिकरणाकडे वर्ग करण्यात आली आहे.

अजूनही काही ठिकाणी विकृत मनोवृत्तीच्या लोकांमुळे महिला, मुली, बालकांना विविध प्रकारच्या हल्ल्यांना सामोरे जावे लागते. त्यात साधारणत: बलात्कार, लैंगिक अत्याचार, ॲसिड हल्ला, ज्वालाग्राही, ज्वलनशील पदार्थांच्या हल्ल्यांचा समावेश आहे. हल्ल्यातील पिडीतांस मानसिक आधारासह आर्थिक आधार देणे गरजेचे असते. त्यामुळे योजनेच्या नव्या नियमावलीत अर्थसहाय्याची रक्कम वाढविण्यासोबतच अशा पिडीतांस विविध प्रकारचे सहाय्य उपलब्ध करून देण्याचे धोरण आखण्यात आले आहे.

बलात्काराच्या घटनेतील पिडीत महिलेस कायमचे मतिमंदत्व, शारीरिक अपंगत्व किंवा मृत्यू तसेच सामुहिक बलात्काराच्या घटनेत गंभीर व तीव्र स्वरुपाची इजा झाली असेल तर १० लाखापर्यंत तसेच बलात्काराच्या इतर प्रकरणी ३ लाख रुपयांचे अर्थसहाय्य दिले जाते. पोक्सो अंतर्गत लैंगिक अत्याचार प्रकरणी पिडीत बालकास कायमस्वरुपी मतिमंदत्व किंवा अपंगत्व आल्यास १० लाख तर लैंगिक अत्याचाराच्या अन्य घटनेत ३ लाखाची मदत दिली जाते.ॲसिड हल्ल्यासारख्या घटनेत महिला, बालकांचा चेहरा विद्रुप झाल्यास, शरीराच्या कोणत्याही भागाची हानी किंवा कायमचे अपंगत्व आल्यास १० लाख तर ॲसिड हल्ल्याच्या इतर घटनेत ३ लाखाचे सहाय्य दिले जाते. ज्वालाग्राही, ज्वलनशील पदार्थांच्या हल्ल्यातील पिडीतांस चेहरा विद्रुप झाला असल्यास, शरीराची हानी किंवा कायमचे अपंगत्व आले असल्यास १० लाख तर अशा हल्ल्यातील अन्य प्रकरणी ३ लाखाचे अर्थसहाय्य देऊन पिडीतांचे पुनर्वसन केले जाते.

पोलिस धाडीत सुटका करण्यात आलेल्या १८ वर्षावरील पिडीत मुलीस देखील सहाय्य दिले जाते. सर्व प्रकारच्या पिडीतांस सहाय्याच्या २५ टक्के पर्यंतची रक्कम घटनेनंतर तत्काळ धनादेशाद्वारे अदा करण्यात येते. त्यात ३० हजार इतक्या वैद्यकीय उपचारासाठीच्या रक्कमेचा समावेश आहे. उर्वरीत ७५ टक्के रक्कम पिडीतेच्या नावे बँक खात्यात १० वर्षासाठी मुदतठेव म्हणून ठेवली जाते.जिल्ह्यात सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात वेगवेगळ्या प्रकरणी पिडीत ठरलेल्या ५५ पिडीतांकडून अर्थसहाय्यासाठी अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी निकषात बसणारे ४१ अर्ज मंजूर करण्यात आले आहे. या अर्जदार पिडीतांना १७ लाख ८० हजार रुपयांचे अर्थसहाय्य मंजूर करण्यात आले आहे,



जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.


**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक १४७**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# बसमधून महिलेचे ११ ग्रॅमचे दागिने गायब

**अमरावती/प्रतिनिधीः-** बसमधून महिलेचे ११ ग्रॅम सोन्याचे दागिने लंपास झाल्याची घटना कोतवाली पोलीस ठाणे हद्दीत समोर आली आहे. या प्रकरणात महिलेच्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. माहितीनुसार पीडित महिला दर्यापूर ते अमरावती दरम्यान प्रवास करत होती. या दरम्यान आरोपीने त्यांच्या पर्समधून ११ ग्रॅम सोन्याचे दागिने चोरी केले. महिला जेव्हा अमरावती बस स्थानकावर पोहचली तेव्हा तिने आपली पर्स तपासली तर त्यामध्ये दागिने नव्हते. यानंतर त्यांनी कोतवाली पोलीस ठाणे गाठले आणि घटनेची तक्रार दिली. पोलिसांनी बसमध्ये बसलेल्या प्रवाशांकडूनही विचारपूस केली



आणि परिसरात लागलेले सीसीटीव्ही फुटेज तपासले पण आरोपींचा पत्ता लागला नाही.आरोपीचा शोध घेतला जात आहे. या प्रकरणामुळे प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण आहे. प्रवास करताना आपल्या सामानावर लक्ष देण्याचे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.


## पाहिजे

ऑटोमोबाईल स्पेअर पार्टच्या गोडाऊनमध्ये काम करण्याकरीता दोन मुले पाहिजेत.
तसेच अकौन्टींग करीता एक मुलगी पाहिजे.

--पत्ता--
सी-१२, सातुर्णा,
एम.आय.डी.सी.-बडनेरा रोड,
अमरावती
मो.नं.७०२०८७९१६८/८००७३४२३३५


SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY

**EMPLOYMENT NOTICE**

No.SBAU/1/103/3-192/2026 Date 23.04.2026

Applications are invited for the Post of Director, Knowledge Resource Center of the University, on or before 25 May, 2026 (Upto 5.00 P.M.)

Particulars of qualifications, pay-matrix, experience and other terms & conditions are available on the university website www.sgbau.ac.in in Advertisement section

Registrar,
Sant Gadge Baba Amravati Uiversity

## जाहीर सुचना

या जाहीर सुचनेद्वारे आम जनतेस सुचित करतो की, **विजय वामनराव निचीत,** रा.नेताजी कॉलनी, व्ही.एम.व्ही. कॉलेज रोड, अमरावती, ता.जि.अमरावती यांनी दि.२६.०४.१९८९ रोजीचे खरेदी दस्त क्र.४४३/१९८९ नुसार मौजे नवसारी, प्रगणे नांदगांव पेठ, ता.जि.अमरावती, महानगर पालिकेच्या हद्दीतील शेत सर्व्हे क्र.४७/२/अ, ५ एकर २० गुंठे, उपविभागीय अधिकारी, अमरावती यांचे फाईलवरील रे.के.नं.१६/२/७२-७३, नि.ता.२३.०३.१९७३ प्रमाणे लेआऊट कन्व्हर्टेड झालेला प्लॉट क्र.२५ एकुण क्षेत्रफळ ३००० चौ.फुट यापैकी अर्धा प्लॉट ज्याचे क्षेत्रफळ १५०० चौ.फुट पैकी ७५० चौ.फुट हा भास्कर व्यंकटराव ठाकरे यांचेकडून विकत घेतला आहे.

परंतु या मालमत्तेचे जुने खरेदीखत दस्त अ.क्र.४४३/१९८९ दि.२६.०४.१९८९ चे मूळ खरेदीखत दस्त गहाळ झालेले आहेत. सदर हरविलेल्या दस्ताची रितसर तक्रार दाखल केलेली आहे.

तरी याबाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारचे कर्ज गहाण, बोजा, हक्क, हितसंबंध व इतर कोणतीही भानगड कायदेशीर वाद लवाद दावा असल्यास किंवा त्याबाबत कोणतीही हरकत असल्यास जाहीर सुचनेपासून ७ दिवसांचे आत खालील पत्त्यावर लेखी स्वरुपात संपर्क साधावा. त्यानंतर आक्षेप आल्यास त्याची नोंद घेतली जाणार नाही.

(ॲड.आशिषसिंह एस.परिहार)
प्रविण नगर, व्हीएमव्ही कॉलेजचे मागे
अमरावती
मो.७७०९२०६३३३

## नगर परिषद धामणगांव रेल्वे, जि.अमरावती
## जाहीर निविदा सूचना

धामणगांव रेल्वे नगर परिषद सन २०२६-२०२७ करीता वार्षिक निविदा साहित्य खरेदी/सेवा पुरवठा करावयाचा आहे. करीता त्यासाठी नोंदणीकृत/अधिकृत पुरवठादार/अनुभवी मक्तेदार यांचेकडून खालील क्रमांकानुसार जाहीर निविदा द्विलिफाफा पध्दतीने/कोटेशन पध्दतीने मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | तपशील | निविदा ईसारा | कोरे निविदा फॉर्म निविदा |
|---|---|---|---|
| ०१. | आरोग्य विभागाकरीता आरोग्य साहित्य पुरवठा करणे | २०००/- | १०००/- |
| ०२. | नगर परिषद कार्यक्रमाकरीता मंडप, डेकोरेशन व पुरवठा करणे | २०००/- | १०००/- |
| ०३. | नगर परिषद धामणगांव रेल्वेकरीता वेळोवेळी लागणारे फ्लेक्स, प्रमाणपत्र, संबंधित साहित्य पुरवठा करणे | २०००/- | १०००/- |
| ०४. | नगर परिषद अंतर्गत येणाऱ्या झाडांची छटाई करणे | २०००/- | १०००/- |
| ०५. | नगर परिषद धामणगांव येथील FSTP करीता क्लोरोनो-मिटर पुरवठा करणे | २०००/- | १०००/- |
| ०६. | नगर परिषद करीता वेळोवेळी JCB पोकलेन पुरवठा करणे | २०००/- | १०००/- |
| ०७. | स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत येणारे जनजागृती करीता माहिती, शिक्षण व संवादचे निविदा करणे | २०००/- | १०००/- |

१) कोरे निविदा फॉर्म दिनांक २४.०४.२०२६ ते ०४.०५.२०२६ या कालावधीत कार्यालयीन वेळेत मिळतील. मोहोरबंद निविदा दिनांक ०४.०५.२०२६ रोजी सायंकाळी ६.१५ वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत कार्यालयात स्विकारण्यात येतील..

२) निविदा संबंधी सर्व अटी व शर्ती नगर परिषद मध्ये २४.०४.२०२६ ते ०४.०५.२०२६ मध्ये कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.

३) कुठलेही कारण न देता निविदा रद्द करण्याचे अधिकार मुख्याधिकारी यांचेकडे राखून ठेवले आहेत.

स्वा/-
मुख्याधिकारी,
नगर परिषद, धामणगांव रेल्वे

## वणी नगर परिषद कार्यालय, जि.यवतमाळ (कर विभाग)

टोल फ्री नं.०७२३९-२२५०५८ ई-मेल wani.mc@gmail.com

जा.क्र.नपव/कर.वि./वार्षिक निसु/१३२/२०२६ दिनांक २३.०४.२०२६

### वार्षिक निविदा सुचना (सन २०२६-२०२७)

नगर परिषद वणी, कर विभाग अंतर्गत सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षाकरीता विविध कामांच्या वार्षिक निविदा ऑफलाईन द्विलिफाफा पद्धतीने मागविण्यात येत आहेत. तरी ईच्छुक कंत्राटदार/अभिकर्ता यांचेकडून सिलबंद लिफाफ्यामध्ये निविदा मागविण्यात येत आहे. खालील कामांची निविदा केवळ दोन लिफाफा पद्धतीने दिनांक २४.०४.२०२६ ते ०५.०५.२०२६ रोजी कार्यालयीन वेळेपर्यंत नगर परिषदेच्या निविदा पेटीमध्ये सादर करावयाच्या आहेत. विविध वार्षिक निविदांचे तपशिल व निविदेचा विस्तृत नमुना नगर परिषद कर विभाग येथे दिनांक २४.०४.२०२६ पासून कार्यालयीन वेळेत पहावयास उपलब्ध राहील.

**स्वा/-**
**(सौ.विद्या खेमराज आत्रम)**
**अध्यक्ष**
**नगर परिषद, वणी**

**स्वा/-**
**(श्री.राकेश लक्ष्मण बुगेवार)**
**उपाध्यक्ष,**
**नगर परिषद, वणी**

**स्वा/-**
**(डॉ.सचिन शंकरराव गाडे)**
**मुख्याधिकारी,**
**नगर परिषद, वणी**

**विद्यमान दिवाणी न्यायाधीश, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर,यांचे न्यायालयातील**
कि.दि.अ. क्र.११२/२०२६ ने.ता.१०.०६.२०२६

**अर्जदार :** १. राजेश ज्ञानेश्वर खेडकर (मुलगा) वय ५४, व्यवसाय - शेती
रा.गुंडवाडा, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
२. मंदा ज्ञानेश्वर खेडकर (पत्नी) वय ७६, व्यवसाय - शेती
रा.गुंडवाडा, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
३. दिनेश ज्ञानेश्वर खेडकर (मुलगा), वय ५३, व्यवसाय - शेती
रा.बालाजी प्लॉट अंबादेवी रोड, अमरावती
४. निलेश ज्ञानेश्वर खेडकर (मुलगा), वय ५१, व्यवसाय - शेती
रा.गुंडवाडा, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

-- **विरुध्द** --

**गैरअर्जदार :** **निरंक**

ज्याअर्थी वरील नमुद अर्जदारांनी या न्यायालयात मुंबई अधिनियम (८) चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्ज सादर केला आहे की, अर्जदार न.१,३,४ यांचे वडील व अर्जदार नं.२ यांचे पती श्री.ज्ञानेश्वर यशवंत खेडकर हे दिनांक १०.११.२०२५ रोजी रा.गुंडवाडा, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे मरण पावले. तसेच अर्जदारांनी नमुद केल्याप्रमाणे मृतकांच्या पश्चात वरील अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस असून त्यांना वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यक आहे. म्हणून या न्यायालयात जो कोणी व्यक्ती वरील वारस प्रमाणपत्र देण्यास हरकत घेऊ इच्छित असेल, त्याने आपल्या हरकती दिनांक १०.०६.२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता या न्यायालयात स्वतः हजर राहून किंवा योग्य वकीलामार्फत लेखी स्वरुपात सादर कराव्यात. अन्यथा कोणतीही हरकत नसल्याचे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

सदर जाहीरनामा दिनांक १०.०४.२०२६ रोजी दिला आहे.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय (क.स्तर)
नांदगाव खंडेश्वर

**मा.दिवाणी न्यायाधीश, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर,यांचे न्यायालयातील**
किरकोळ (R.M.J.C.) क्र.९५/२०२६ ने.ता.२९.०४.२०२६

**अर्जदार :** १. अरुण रामदास ढगे,
रा.चांदूर रेल्वे रोड, दांडगे लेआऊट, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
२. कांचन प्रमोद गाढेकर,
रा.वार्ड नं.१, मुंडनिशांकराव, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

-- **विरुध्द** --

**गैरअर्जदार :** **निरंक**

ज्याअर्थी मयत **लिलाबाई रामदासजी ढगे** यांचा मृत्यू दि.**०२.०८.२०१७** रोजी नांदगाव खंडेश्वर ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला असून मयताचे पती नामे रामदासजी महादेवराव ढगे यांचा मृत्यू २९.१२.२००४ रोजी धानोरा मोगल, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला आहे.मयतांचे अर्जदार नं.१ हा मुलगा असून अर्जदार नं.२ ही मुलगी आहे. मयतांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस **सकाळी १०.३०** वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक **२७ मार्च २०२६** रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय
नांदगाव खंडेश्वर

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्रीमती एन.सी.सोरटे, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.६९१/२०२६
**श्री.संदीप अधिक एक -वि- निरंक**
पुढील ता.०६.०५.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** 1. Sandeep Champaklal Patwa
Age 63 Yrs. Occu.: Business
2. Yash Sandeep Patwa,
Age 39 Yrs. Occu.: Household
Both R/o Flat No.1, Swastik Apartment, Balaji Plot, Rajapeth, Amravati

-- **विरुध्द** --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **मिता संदीप पटवा** हे दिनांक 07.09.2016 रोजी **यवतमाळ, ता.जि.यवतमाळ** येथे मयत झाले. अर्जदार **संदीप अधिक एक विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **संदीप अधिक एक विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२०.०४.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

**मा.सहदिवाणी न्यायाधीश, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर,यांचे न्यायालयातील**
किरकोळ (R.M.J.C.) क्र.१०८/२०२६ ने.ता.०८.०५.२०२६

**अर्जदार :** १. बेबी श्रीकृष्णराव वैद्य,
रा.पिंपळगांव बैनाई, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
२. निलेश श्रीकृष्णराव वैद्य
रा.पिंपळगांव बैनाई, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

-- **विरुध्द** --

**गैरअर्जदार :** **निरंक**

ज्याअर्थी मयत **श्रीकृष्णराव नामदेवराव वैद्य** यांचा मृत्यू दि.**१७.०१.२०२६** रोजी पिंपळगांव बैनाई, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला आहे. मयत श्रीकृष्णराव यांची आई नामे पार्वताबाई यांचे बऱ्याच वर्षापुर्वी निधन झाले. मयत यांचे अर्जदार नं.१ ही पत्नी असून अर्जदार नं.२ हा मुलगा आहे. मयतांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस **सकाळी १०.३०** वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक **२० एप्रिल २०२६** रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय
नांदगाव खंडेश्वर

## जाहीर नोटीस

आम जनतेला सुचित करण्यात येते की, **श्री.दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट, अमरावती** र.न.ई.२७५ यांचे मालकी व ताब्यातील नोंदणीकृत १) खरेदीखत दस्त क्र.९५८/१९९५ दि.१७.०८.१९९५ नुसार विकत घेतलेली असून त्याचे वर्णन जि.प.अमरावती व सब रजि.क्र.दर्यापूरचे कक्षेतील ग्रामपंचायत दारापूरचे कक्षेतील मौजे शिंगणापूर प्र.व ता.दर्यापूर, जि.अमरावती येथील शेत गट नं.७९९, २ हे.४४ आर, आ.रु.१०.३५ पैसे हिस्सा सालीम झाडाझुडपासह व तदंगभूत वस्तुसह खरेदी देऊन ताब्यात दिला असून याची चतुःसिमा--

पुर्वेस - रोड व पलिकडे रामकृष्ण कनिष्ठ महाविद्यालय
पश्चिमेस - शिंगणापूर ते चंडिकापूर रस्ता
उत्तरेस - सौ.सुमनबाई हिरासिंग रघुवंशी यांचे शेत
दक्षिणेस - कै.प्रदीपसिंग भगवानसिंह रघुवंशी यांचे शेत असे आहे.

२) खरेदीखत दस्त क्र.१४०७/२००८, दि.२५.०६.२००८ नुसार विकत घेतलेली असून त्याचे वर्णन मौजे शिंगणापूर, ता.दर्यापूर येथील गट क्र.७९७, २ हे.०७ आर, आ.रु.६०२५ हिस्सा सालीम यात माझे मालकीचे शेत ०० हे.८४ आर दक्षिण भागाचे पु-प.वाटणीचे शेत त्याची चतुःसिमा-

पुर्वेस - श्री.दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट यांचे शेत
पश्चिमेस - श्रीकृष्ण चिंचे यांचे शेत
उत्तरेस - काशिबाई माणिकराव भुतडा यांचे शेत
दक्षिणेस - गणेश घुरडे यांचे शेत असे आहे.

दोन्ही नोंदणीकृत खरेदीखत दस्त हे २००७-२००८ या काळात श्री.दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट अमरावती यांचे कार्यालय, **कमलपुष्प** कॉंग्रेस न गर अमरावती येथून तक्षशिला महाविद्यालय, श्याम नगर, अमरावती येथे स्थानांतरित करताना हरविलेले आहे. सगळीकडे शोधाशोध केली तरी अद्यापपर्यंत आढळून आलेले नाही. सदर दस्त कोणाला सापडल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावे. याबाबत त्यांनी पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा, अमरावती यांचेकडे तकार दिलेली आहे. सबब वर उल्लेखीत मालमत्तेत कोणाचाही हक्क, गहाण, कर्ज, बोजा किंवा प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष हितसंबंध असल्यास ही नोटीस मिळाल्यापासून ७ दिवसात खालील पत्त्यावर संपर्क करावा. विहीत मुदतीत कोणताही आक्षेप न आल्यास कोणाचाही उजर चालणार नाही, करीता सदरची नोटीस.

(ॲड.प्रिया रेळे)
विद्युत नगर, अभियंता कॉलनी,
व्ही.एम.व्ही., अमरावती
मो.९८२३७३१३९८

## जाहीर नोटीस

सर्व जनतेला या जाहीर नोटीसद्वारे सुचित करण्यात येते की, मौजा म्हसला, प्रगणे बडनेरा, ता.जि.अमरावती येथील शेत सर्व्हे क्र.४४/१ मधील ४ एकर जमिनीतील विद्यमान तहसीलदार साहेब अमरावती यांनी त्यांच्या फाईलावरील रे.के.नं. एन.ए.पी-३४/म्हसला-८/१९९९-२०००, नि.ता.२७.१२.१९९९ नुसार लेआऊट कन्व्हर्शन मंजूर झालेला बी.आर.नगर या नावाने ओळखल्या जाणाऱ्या जागेतील प्लॉट नं.३३ याची साईज मंजूर नकाशाप्रमाणे असून याचे एकुण क्षेत्रफळ १५०१ चौ.फुट (१३९.५० चौ.मी.), याची चतुःसिमा खालीलप्रमाणे

पुर्वेस - खाली जागा
पश्चिमेस - रोड
उत्तरेस - प्लॉट नं.३४
दक्षिणेस - प्लॉट नं.३२

वरील वर्णनाचा प्लॉट माझे पक्षकार श्री.महेश गणेशराव देशमुख, रा.हनुमान नगर, छोटी उमरी, महादेव मंदिराजवळ अकोला यांनी दिनांक १५.११.२०११ रोजी रजिस्टर खरेदीखत क्र.६०६१/२०११ नुसार श्री.गुरुकृपा ट्रेडर्स तर्फे भागीदारी श्री.भिष्मलाल राधाकृष्ण चिमराणी (जोधवानी) रा.दरोगा प्लॉट, अमरावती यांच्याकडून विकत घेतली आहे. सदरहू दस्तऐवज विद्यमान दुय्यम निबंधक अमरावती ग्रामीण यांच्या कार्यालयात नोंदणीकृत झाले आहे. परंतु या खरेदीखताबाबतचा फेरफार अनावधानाने राहून गेला आहे. याबाबत विद्यमान तलाठीकडे फेरफाराकरीता अर्ज केला असता त्यांनी माझे पक्षकाराला शोध अहवाल सादर करण्याचे सांगीतले. वरील प्लॉटवर खरेदीनंतर माझेच पक्षकाराचा ताबा व मालकी हक्क आहे.

करीता वरील नमुद प्लॉटवर कोणाचाही गहाण, बोजा, हितसंबंध, वारसा हक्क, इतर अधिकार, ताबा असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्याचे ८ दिवसांचे आत खालील पत्त्यावर संपर्क करावा अथवा मूळ हरकती सह खालील पत्त्यावर संपर्क साधावा. अन्यथा सात दिवसांचे आत कोणीही आपली हरकत नसल्यास असे ग्राह्य समजण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतीचा विचार केल्या जाणार न ाही व माझे पक्षकार वरील प्लॉटचा फेरफार आपल्या नावाने राजस्व दप्तरी करुन घेतील, याची नोंद घ्यावी. सबब या नोटीसीने कळवित आहे.

अमरावती
दि.२३.०४.२०२६

(ॲड.महेश विजयकुमार बंग)
गांधी कॉम्प्लेक्स, दुकान नं.७-अ
रॉयली प्लॉट, अमरावती
मो.९४२०८३५२८०

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.५२८/२०२६
**श्रीमती प्रभा अधिक चार -वि- निरंक**
पुढील ता.२८.०४.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** 1. Prabha Madhukar Dahane, Age 78 Yrs. Occu.: Nil
2. Mangesh Madhukar Dahane, Age 48 Yrs. Occu.: Agril.
3. Prashant Madhukar Dahane, Age 44 Yrs. Occu.: Service
1 to 3 R/o Old Bypass Road, Kaloti Nagar, Amravati.
4. Madhuri Vijay Nishandar, Age 54 Yrs. Occu.: Housewife
R/o House No.50, Lane No.1, Panchavati Chowk, Radha Nagar,Amravati
5. Priya Sandeep Kokate, Age 51 Yrs. Occu.: Teacher
R/o Near Kalyan Nagar, Shri Vikas Colony, Rukhmini Nagar,Amravati.

-- **विरुध्द** --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **मधुकर रंगराव डहाणे** हे दिनांक 29.04.2025 रोजी **नाशिक, ता.जि.नाशिक** येथे मयत झाले. अर्जदार **प्रभा अधिक चार विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **प्रभा अधिक चार विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०६.०४.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

## जाहीर खुलासा

**श्रीमती वंदना प्रकाशराव आंबुलकर,** रा.तिवसा, जाहीर खुलासा करते की, माझे नांव लग्नापुर्वीचे नांव **अलका हे होते.** लग्नानंतर माझे नांव **वंदना** आहे.

मी याद्वारे सत्यापन देते की वरील माहितीनुसार दोन्ही नांवे माझेच आहे. यामध्ये कुठल्याही प्रकारची खोट किंवा चुक नाही. तसे आढळल्यास त्याला सर्वस्वी मी - वंदना प्रकाशराव आबुलकर, रा.तिवसा स्वतः जबाबदार राहील.

**स्वा/-**
**वंदना प्रकाशराव आंबुलकर**
**मोबा.९०९६१४१४२४**

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.६६७/२०२६
**श्रीमती सुरेखा -विरुध्द- निरंक**
पुढील ता.०८.०५.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** १. श्रीमती सुरेखा दिपक कपिले, वय ६५ वर्षे, धंदा - गृहकार्य
रा.योगक्षेम कॉलनी, एकनाथपुरम जवळ, अमरावती, ता.जि.अमरावती

-- **विरुध्द** --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत सुहास दिपक उर्फ दिपकराव कपिले** हे दिनांक 27.08.2024 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **सुरेखा विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **सुरेखा विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१३.०४.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.ए.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.७८९/२०२६
**संगीता व ईतर -विरुध्द- निरंक**
पुढील ता.१९.०६.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** १. संगीता संतोषराव भडक, वय ४४ वर्षे, धंदा - घरकाम
२. वैष्णवी रोहीत शेळके, वय २२ वर्षे, धंदा - घरकाम
दोघीही रा.ज्योती कॉलनी हनुमान मंदिराजवळ त्रिमुर्ती नगर, अमरावती

-- **विरुध्द** --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत संतोष प्रल्हाद भडक** हे दिनांक 08.09.2020 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **संगीता व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **संगीता व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१६.०४.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.७६४/२०२६
**निलीमा व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.२२.०६.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** 1. Smt.Neelima W/o Khushal Tayade,
Age 46 Yrs. Occu.: Household
2. Ku.Aradhya D/o Khushal Tayade, Age 12 Yrs. Occu.: Student
3. Mr.Atharv S/o Khushal Tayade, Age 11 Yrs. Occu.: Student
All R/o Survey No.189/3 Plot No.17, Jankidevi Nagar, Shegaon-Rahatgaon Road Amravati
Appli.No.2 & 3 through their Natural Guardian Mother Smt.Neelima W/o Khushal Tayade

-- **विरुध्द** --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **खुशाल रघुनाथराव तायडे** हे दिनांक 02.03.2026 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **निलीमा व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **निलीमा व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१३.०४.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.७६३/२०२६
**श्रीमती मंगला अधिक दोन -वि- निरंक**
पुढील ता.१६.०६.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** 1. Smt.Mangla Wd/o Shekhar Jadhav,
Age 66 Yrs. Occu.:Household
2. Mr.Samir S/o Shekhar Jadhav, Age 42 Yrs. Occu.: Service
Appli.No.1 & 2 R/o Plot No.4, Sutgirni Road, Gayatri Nagar, Amravati, Tq. Dist. Amravati
3. Sau.Pallavi W/o Prasad Ghodnadikar/and Pallavi D/o Shekhar Jadhav
Age 59 Yrs. Occu.: Household
R/o Plot No.9, Devi Link 2, Pimpri Chinchawad, Link Road, Near Trushna Hotel Chinchawad, Pune City, Chinchawad Gaon, Pune

-- **विरुध्द** --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **शेखर वसंतराव जाधव** हे दिनांक 06.09.2018 रोजी **नाशिक, ता.जि.नाशिक** येथे मयत झाले. अर्जदार **मंगला अधिक दोन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **मंगला अधिक दोन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१७.०४.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक २२६**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :-** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# मेळघाटचे 'ग्रीन गोल्ड जगात तिसऱ्या क्रमांकावर

## परतवाडा डेपो ३२.८७ कोटी रुपयांच्या विक्रीचे सर्वात मोठे केंद्र

**मेळघाट/प्रतिनिधी**

आपल्या नैसर्गिक सौंदर्यासाठी आणि वन्यजीवांसाठी प्रसिद्ध असलेला मेळघाट आता केवळ वाघ आणि हिरवळीसाठीच नव्हे, तर आपल्या मौल्यवान सागवानासाठीही ओळखला जातो. मेळघाटाच्या जंगलातील सागवान लाकूड त्याच्या मजबुती, टिकाऊपणा आणि उच्च गुणवत्तेमुळे ग्रीन गोल्ड म्हणून ओळखले जाते. तज्ज्ञांच्या मते, उत्पादन आणि गुणवत्तेच्या बाबतीत मेळघाटचे सागवान जगात तिसऱ्या क्रमांकावर मानले जाते.

वन विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार, मेळघाटात उत्पादित होणारे सागवान प्रामुख्याने परतवाडा डेपो आणि महाराष्ट्र वन विभागाच्या अधिकृत ई-लिलाव पोर्टलद्वारे विकले जाते. मेळघाटातील सागवानाचा पुरवठा महाराष्ट्रासह देशभरातील अनेक राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर केला जातो. दक्षिण भारतापासून गुजरात, दिल्ली, चंदीगड आणि पंजाबपर्यंत मेळघाटातील सागवानाला स्थिर मागणी आहे.

मेळाघाट प्रादेशिक वन विभागाच्या उपवनसंरक्षकांनी २०२५ मध्ये एकूण ?३२८.७ दशलक्ष किमतीच्या सागवानाची विक्री केली. विभागीय आकडेवारीनुसार, या विक्रीमुळे राज्य सरकारच्या तिजोरीत ?२८८.०३ दशलक्ष जमा झाले. यावरून हे दिसून येते की, मर्यादित वृक्षतोड आणि कडक नियम असूनही, मेळघाटातील सागवान हे राज्यासाठी महसुलाचा एक महत्त्वाचा स्रोत आहे.

**परतवाडा डेपो हे मुख्य केंद्र**

परतवाडा हे मेळघाटातील सागवानासाठी सर्वात मोठे व्यापारी केंद्र आहे. येथे वन विभागाचा मोठा डेपो आहे, जिथे लाकूड गोळा केले जाते, रचले जाते आणि त्याचा लिलाव केला जातो. पूर्वी, परतवाडा डेपोमधून दररोज ४० ते ५० ट्रक सागवान इतर राज्यांमध्ये पाठवले जात असे. बऱ्याच काळापासून मेळघाट वन विभागाला राज्य सरकारचा मुख्य आधार मानले जात होते. आता, बहुतेक विक्री



ऑनलाइन ई-लिलावाद्वारे केली जाते. लिलावात सहभागी होण्यासाठी खरेदीदारांनी महाराष्ट्र वन विभागाच्या पोर्टलवर नोंदणी करणे आवश्यक आहे. परतवाडा आणि अमरावतीमध्ये अनेक खाजगी व्यापारी आणि लाकूड गिरण्या (सॉमिल) देखील आहेत, जिथे अस्सल मेळघाट सागवान खरेदी करता येते.

**कारागृह विभागही सागवान खरेदी**

सध्या, नागपूर, नाशिक, ठाणे, टीसीपीसी सातारा आणि पुणे यासह अनेक कारागृहे मेळघाट सागवान खरेदी करत आहेत. अलीकडेच, वन विभागाने नागपूर, नाशिक आणि ठाणे कारागृहांना शासकीय दराने १७.५ दशलक्ष रुपयांचे सागवान विकले.

**वृक्षतोडीवर कडक नियम**

१९७५ मध्ये व्याघ्र प्रकल्पाच्या अंमलबजावणीनंतर, मेळघाटात वृक्षतोडीवर कडक निर्बंध लादण्यात आले. वन्यजीव संवर्धन धोरणामुळे, आता कोणत्याही वनक्षेत्रात दर १० वर्षांनी एकदाच वृक्षतोडीला परवानगी आहे ही योजना डीसीएफ अग्रिम सैनी यांच्या नेतृत्वाखाली विकसित करण्यात आली आहे.भारतीय वन सेवेचे डीसीएफ अधम सैनी यांच्या नेतृत्वाखाली प्रशिक्षणार्थी एसीएफ (आयएफएस) अक्षय उदपापर आणि आरएफओ प्रीती असोलकर यांनी सागवान तोडणीची योजना तयार केली आहे. आरएफओ प्रीती असोलकर यांच्या म्हणण्यानुसार, पुढील दोन वर्षे कोणतीही वृक्षतोड होणार नाही.

**हमालांचे कष्ट आणि त्यातील धोका**

सकाळपासूनच परतवाडा डेपोमध्ये सागवानाने भरलेले ट्रक रांगेत उभे असतात. स्थानिक मजूर हे जड ओंडके उतरवणे, त्यांची वाहतूक करणे आणि ते तयार करण्याचे धोकादायक काम करतात. सागवानाच्या धुळीमुळे श्वसनाच्या आजारांचा धोका असतो, तरीही हे मजूर वर्षानुवर्षे हे कष्टाचे काम करत आहेत. मेळघाटाचे सागवान हे राज्याच्या अर्थव्यवस्थेचा आणि व्यापाराचा एक मजबूत आधारस्तंभ आहे. शास्त्रीय पद्धतीने केलेली तोडणी, ई-लिलाव प्रणाली आणि संवर्धन धोरणामुळे मेळघाटाने आपल्या या हिरव्या सोन्याला देशभरात एक वेगळी ओळख मिळवून दिली आहे.

**प्रत्यक्ष लिलावातूनही कोट्यवधी रुपयांची कमाई**

ऑनलाइन लिलावांव्यतिरिक्त, न विकलेले शिल्लक लाकूड किंवा इमारती लाकूड विकण्यासाठी प्रत्यक्ष लिलाव आयोजित केले जातात. विभागाच्या मते, एकूण विक्रीमध्ये जमिनीच्या लिलावाचा वाटा २ ते ३ टक्के असतो. २०२५ मध्ये, विभागाने जमिनीच्या लिलावातून ४५.९ दशलक्ष कमावले.

## संक्षिप्त



### राष्ट्रसंतांच्या जन्मोत्सव महोत्सवास प्रारंभ

**अमरावती-**वं.राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज जन्मस्थान स्मृती मंदिर यावली शहीद येथे वं. राष्ट्रसंत जन्मोत्सव समितीच्या वतीने श्री तुकडोजी महाराज जन्मोत्सव अर्थात ग्राम जयंती महोत्सवास प्रारंभ करण्यात आला. जन्मस्थान स्मृती मंदिराचे अध्यक्ष रामचंद्र दादा कांडलकर यांच्या हस्ते 'श्री' चे महा अभिषेक पूजन आणि दिव्यांगी कांडलकर व तिलक कांडलकर यांच्या हस्ते तीर्थस्थापना करून प्रारंभ झाला.नंतर किशोर पाचघरे व ममता पाचघरे सहपत्नीक यांच्या हस्ते मंडप पूजन करण्यात आले.यानंतर माय मंजुळा माता व बाल प्रतीक तुकडोजी महाराज पुतळ्याचे अनावरण मंदिराध्यक्ष रामचंद्र दादा कांडलकर, प्रमुख पाहुणे बाबुराव धोटे,ताथोड दादा यांच्या हस्ते करण्यात आले. विठ्ठल यावले यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.यावेळी वसंत देशमुख,काशिनाथ जेवणे,प्रकाश बानाईत, ज्ञानेश्वर चांदोरे,पुरुषोत्तम अहिरे,शंकर भुरे,श्रीधर यावलीकर आत्माराम उमप, अजब कोथलकर, अशोक उगले,अशोक मिलके प्रशिक्षक रामजीप्रभू शेलोटकर,ललिता सेलोटकर उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन अक्षय भोपळे यांनी केले.कार्यक्रमाला समस्त ग्रामस्थ उपस्थित होते.



### विद्यार्थ्यांची रॉयल फर्टीलायझर कंपनीमध्ये निवड

**तिवसा-**स्व. आर जी देशमुख कृषी महाविद्यालय तीवसा येथे जागतिक वसुंधरा दिनाचे औचित्य साधून रॉयल फर्टीलायझर अँड केमिकल कंपनी पुणे यांच्यातर्फे कॅम्पस ड्राईव्ह घेण्यात आला. कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर अविनाश सावगावे , रवींद्र जोगी सेल्स ऑफिसर, महाविद्यालयाचे प्राचार्य अरुण भी.डाहाके तसेच ट्रेनिंग अँड प्लेसमेंट चे प्रभारी अधिकारी सुरज व्ही. साबळे तसेच सुधीर उमप व्यवस्थापन प्रतिनिधी हजर होते.त्यामध्ये आठव्या सत्राचे विद्यार्थी सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांमधून सात विद्यार्थ्यांना पात्र ठरवून त्यांची निवड करण्यात आली. मानव सेवा प्रतिष्ठान वाडी नागपूर व्यवस्थापिका प्रियंका देशमुख तसेच संस्थेच्या अध्यक्ष डॉ. दर्शना देशमुख यांनी मुलांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

# रायसोनी विद्यापीठात 'व्हर्डिक्ट-मूट कोर्ट स्पर्धा २०२६'

**अमरावती/का.प्र**

जी. एच. रायसोनी विद्यापीठ, अमरावतीच्या स्कूल ऑफ लॉतर्फे 'व्हर्डिक्ट – मूट कोर्ट स्पर्धा २०२६' उत्साहात पार पडली. या अंतर्विद्यापीठीय स्पर्धेत १० संघांनी सहभाग नोंदविला, तर बी.ए.एलएल.बी. व एलएल.बी.चे ८३ विद्यार्थी उपस्थित होते.

स्पर्धेचा विषय भारतीय संविधानातील अनुच्छेद २५ (धार्मिक स्वातंत्र्य व धर्मनिरपेक्षता) तसेच जीवनाचा व समानतेचा अधिकार यावर आधारित होता. स्पर्धकांनी अपीलकर्ता व प्रतिवादी या दोन्ही बाजूंनी प्रभावी युक्तिवाद सादर केले. यामुळे विद्यार्थ्यांना विधी संशोधन, मेमोरियल लेखन आणि मौखिक युक्तिवाद कौशल्य विकसित करण्याची संधी मिळाली.कार्यक्रमाचे उद्घाटन अधिवक्ता अनिल विश्वकर्मा आणि अधिवक्ता मनीष शिरसाट



(प्राचार्य, तक्षशिला विधी महाविद्यालय) यांच्या हस्ते झाले. यावेळी कुलगुरू डॉ. विनायक देशपांडे, विद्यार्थी कल्याण आधिष्ठाता डॉ. प्रशांत अवचट,कुलसचिव डॉ. स्नेहील जयस्वाल आणि डीन डॉ. नीता नाथ उपस्थित होते.प्रारंभी विद्यापीठ गीत व भारतीय संविधानाच्या प्रस्तावनेचे वाचन करण्यात आले.

स्पर्धेत प्रथम क्रमांक (अपीलकर्ता पक्ष) एस.ओ.एल.-आय संघाने पटकावला. या संघात तपस्या देव, संशिता कदम, जागृती भागवत आणि दीपिका खनाल यांचा समावेश होता. उपविजेता (प्रतिवादी पक्ष) एस.ओ.एल.-जे संघ ठरला. या संघात शैलेश नागले, तेजस विटलकर आणि रुचा ठाकूर यांचा समावेश होता.वैयक्तिक गटात प्रवीणकुमार पाटील यांना सर्वोत्कृष्ट वक्ता, रुचा ठाकूर (प्रतिवादी) व सागर गवई (अपीलकर्ता) यांना सर्वोत्कृष्ट मूटर, तर चंद्रसेन जांजळ यांना सर्वोत्कृष्ट संशोधक म्हणून गौरविण्यात आले.कार्यक्रमाचे समन्वयन डॉ. मीनाक्षी काळे यांनी केले.

संचालन तपस्या देव व बीबी फातिमा यांनी केले, तर समारोपावेळी हम्माद सिद्दीकी यांनी आभार मानले. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी ॲड. क्षितिजा देशमुख, ॲड. शीतल वरांकर, डॉ. रंजन दुबे, ॲड. स्नेहल डोंगरे, प्राची सातपुते व डॉ. कोमल खजोणे यांचे सहकार्य लाभले. स्वयंसेवक म्हणून पार्थ कदू, पायल सरदार, माधवी भिलावेकर, प्रसाद पवार व कनिष्का परढे यांनी सक्रिय सहभाग नोंदविला.समन्वयक डॉ. मीनाक्षी काळे यांनी सांगितले की, अशा स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो, स्टेज भीती कमी होते आणि न्यायालयीन प्रक्रियेचा प्रत्यक्ष अनुभव मिळतो.ही स्पर्धा विद्यार्थ्यांच्या ज्ञानवृद्धीसह त्यांच्या व्यावसायिक कौशल्यांना धार देणारे प्रभावी व्यासपीठ ठरली.

## पोटे पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चरची विद्यार्थिनी एमपीएससीमध्ये राज्यात ७ वी रँक

**अमरावती-**'आमचे माजी विद्यार्थी आमच्या कुटुंबाचा एक भाग आहेत' या भावनेला साकार करत पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, अमरावतीची माजी विद्यार्थिनी (बी आर्च २०१५-२०) विशाखा भवरेकर हिने श्झ्एण च्या परीक्षेमध्ये Assistant Town Planner पदासाठी संपूर्ण राज्यात ७ वी रँक मिळवून संस्थेचा गौरव वाढवला आहे.या उल्लेखनीय यशाबद्दल महाविद्यालयात आनंद व अभिमानाचे वातावरण आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य संजय देशमुख यांनी विशाखाचे अभिनंदन करत सांगितले की, हे यश तिच्या कठोर परिश्रम, समर्पण आणि चिकाटीचे फळ आहे.

त्यांनी विशाखाला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देत तिच्या उज्ज्वल भविष्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष तसेच संचालक व प्राध्यापक वर्ग यांनी विशाखाला या यशासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या असून तिच्या उज्ज्वल भविष्यासाठी सदिच्छा व्यक्त केल्या आहेत.




## आधुनिक तंत्रज्ञानाच्या मार्गदर्शनाने खरीप पूर्व नियोजन सभा



**शिराळा/वार्ताहर**

खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना आधुनिक व वैज्ञानिक शेती पद्धतींचे मार्गदर्शन मिळावे यासाठी शिराळा येथे खरीप पूर्व नियोजन सभा आयोजित करण्यात आली. या सभेत कापूस पिकावरील बोंड अळी नियंत्रण, बियाणे उगवण तपासणी, बीज प्रक्रिया तसेच विविध लागवड तंत्रज्ञानावर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी सहाय्यक कृषि अधिकारी मारोती जाधव यांनी कापूस पिकाचे मोठे नुकसान करणाऱ्या बोंड अळीच्या नियंत्रणासाठी एकात्मिक कीड व्यवस्थापन (IPM) पद्धतींचा अवलंब करण्याचे आवाहन केले. योग्य वेळी निरीक्षण, फेरोमोन ट्रॅप्सचा वापर आणि शिफारस केलेल्या कीटकनाशकांचा संतुलित वापर यावर भर देण्यात आला. पेरणीपूर्वी बियाणे उगवण तपासणी करणे आवश्यक असल्याचे सांगितले. यावेळी बी बी एफ पद्धत, पट्टा पद्धत व बेडवर लागवड तंत्रज्ञान यांची माहिती देऊन पाणी व्यवस्थापन सुधारणा व उत्पादनवाढीसाठी या पद्धती उपयुक्त असल्याचे सांगण्यात आले.

तसेच बियाणे व कृषी निविष्टा खरेदी करताना शेतकऱ्यांनी परवाना धारक कृषी सेवा केंद्रातूनच खरेदी करावी, बिल घ्यावे, उत्पादनाची मुदत व गुणवत्ता तपासावी, असे आवाहन करण्यात आले.

# नीट पूर्वी अमरावतीत विद्यार्थ्यांसाठी मॉक टेस्ट

## परीक्षेच्या दडपणावर मात करण्यासाठी 'वे एज्युकेशन इनिवेटिव्ह'चा उपक्रम

**अमरावती/का.प्र.**

नीट परीक्षेच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष परीक्षेचा अनुभव मिळावा आणि त्यांच्या मनातील भीती कमी व्हावी या उद्देशाने 'वे एज्युकेशन इनिवेटिव्ह'च्या वतीने अमरावतीत विशेष मॉक टेस्टचे आयोजन करण्यात येणार आहे.

या उपक्रमाला विद्यार्थ्यांसह पालकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून शेकडो विद्यार्थी सहभागी होण्याची शक्यता आहे. या मॉक टेस्टमध्ये नीट परीक्षेप्रमाणेच वातावरण निर्माण करण्यात येणार असून परीक्षा केंद्रावरील शिस्त, वेळापत्रक आणि नियम यांचे काटेकोर पालन केले जाणार आहे.

विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष परीक्षेचा अनुभव देणे, वेळेचे व्यवस्थापन शिकवणे आणि मानसिक तयारी मजबूत करणे, या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वाचा ठरणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढण्यास मदत होणार आहे.स्पर्धा परीक्षांच्या तयारीमध्ये मॉक टेस्टला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. नियमित मॉक टेस्ट दिल्यामुळे विद्यार्थ्यांना स्वतःची तयारी तपासता येते, चुका ओळखता येतात आणि वेळेचे योग्य नियोजन करण्याची सवय लागते. तसेच प्रत्यक्ष परीक्षेपूर्वीचा ताण कमी होऊन आत्मविश्वासाने पेपर देण्याची मानसिक तयारी निर्माण होते.'वे एज्युकेशन इनिवेटिव्ह'चे संचालक रविकिरण पाटील यांनी सांगितले की, 'विद्यार्थ्यांची नीट परीक्षेबाबतची भीती कमी करणे आणि त्यांना योग्य मार्गदर्शन देणे हा आमचा उद्देश आहे. ही मॉक टेस्ट म्हणजे केवळ परीक्षा नसून विद्यार्थ्यांच्या मनोबलाला बळ देणारा अनुभव ठरणार आहे.'या मॉक टेस्ट आता परीक्षेसाठी अनुभवी शिक्षक व व्यवस्थापक यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात येणार असून संपूर्ण नियोजन विद्यार्थ्यांना वास्तवदर्शी अनुभव देण्याच्या दृष्टीने करण्यात आले आहे.विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले असून अधिक माहितीसाठी ८५३०४४७२२२ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे सांगितले आहे.



**वेळ व्यवस्थापनावर भर**

'या मॉक टेस्टमुळे विद्यार्थ्यांना वेळेचे नियोजन कसे करावे, कोणत्या प्रश्नांवर अधिक वेळ द्यावा हे समजण्यास मदत होणार आहे. त्यामुळे ते अधिक आत्मविश्वासाने परीक्षा देऊ शकतील.'

**आत्मविश्वास वाढीस मदत**

नीट परीक्षेचा ताण कमी करण्यासाठी ही मॉक टेस्ट उपयुक्त ठरणार असून विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढण्यास मोठी मदत होणार आहे.'

**मॉक टेस्ट का महत्त्वाची?**

वेळेचे अचूक नियोजन शिकता येते
स्वतःच्या चुका ओळखून सुधारणा करता येते
प्रत्यक्ष परीक्षेचा अनुभव मिळतो
ताण-तणाव कमी होऊन आत्मविश्वास वाढतो
प्रश्न सोडवण्याचा वेग आणि अचूकता सुधारते

**नीट मॉक टेस्टचा अपेक्षित फायदा**

'ही मॉक टेस्ट विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. प्रत्यक्ष परीक्षेसारखे वातावरण अनुभवण्याची संधी मिळणार असून, परीक्षा केंद्रावर येणाऱ्या अडचणींची पूर्वतयारी करता येणार आहे.'

## जागतिक वारसा दिनानिमित्य विविध व्याख्यानांचे आयोजन

# इंटॅक अमरावती चॅप्टर आणि रसायनशास्त्र विभागातर्फे जागतिक वारसा दिन साजरा

**अमरावती/वार्ताहर**

इंडिअन नॅशनल ट्रस्ट फॉर आर्ट अँड कल्चरल हेरीटेज अर्थात इंटॅक संस्थेचा अमरावती चॅप्टर आणि संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या रसायनशास्त्र विभागातर्फे जागतिक वारसा दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. प्रशांत गावंडे, इंटॅकच्या ज्येष्ठ सभासद प्रा. डॉ. नेहा भटकर, विद्यापीठ व्य.प. सदस्य प्रा. डॉ. मनीषा कोडापे, अधिसभा सदस्य प्रा. डॉ. जागृती बारब्दे, इंटॅक अमरावती अध्याय संयोजक डॉ. जयंत वडतकर, नर्मदा परिक्रमा करणारे गौरव कडू उपस्थित होते.

सदर दिवसाचे औचित्य साधून इंटॅक अमरावती अध्याय व रसायनशास्त्र विभागातर्फे तर्फे विविध व्याख्याने व प्राचीन नाणी प्रदर्शन अशा भरगच्च कार्यक्रमाचे रसायनशास्त्र विभागामध्ये आयोजन करण्यात आले होते. या निमित्त्याने अमरावतीच्या शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्थेच्या इतिहास विभागातील प्रा.डॉ. श्रीनिवास सातभाई, अमरावती इंटॅक अध्यायाचे सहसंयोजक तथा प्रसिद्ध नाणे संग्राहक तुषार वरणगावकर तसेच नर्मदा परिक्रमा अनुभव अशा विविध व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. सांस्कृतिक व ऐतिहासिक ठिकाणे आणि इमारती किंवा वास्तूच्या संवर्धनाकडे व त्यासाठी जनजागृती होण्याच्या दृष्टीने युनेस्कोतर्फे १९८३ पासून हा दिवस जगभरात साजरा केला जातो. यावर्षी या दिवसाची मध्यवर्ती संकल्पना अर्थात थीम 'युद्धजन्य संघर्ष स्थिती आणि आपत्ती अशा परिस्थितीत जिवंत वारशाचे संरक्षण आणि त्यासाठी तात्काळ प्रतिसाद अशी असून आंतरराष्ट्रीय स्तरावर हा दिवस साजरा केला जातो.प्रा.डॉ. श्रीनिवास सातभाई यांनी आपल्या व्याख्यानातून विदर्भाचा ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा या विषयावर बोलतांना, त्यांनी विदर्भातील संस्कृती, गावांच्या नावामागील कहाणी, गावात व आपल्या रोजच्या दिनचर्येत दडलेल्या वारसा सबंधीत बाबी यावर प्रकाश टाकला.अमरावती यथील साहसी क्रीडा तज्ञ गौरव कडू हे नुकतेच १२५ दिवस पायी नर्मदा परिक्रमा करून आलेत. त्यानिमित्त त्यांचे अनुभव कथन यावर आधारित दुसरे व्याख्यान पार पडले.



तिसरे व्याख्यान अमरावतीचे प्रसिद्ध उद्योजक तथा नाणे संग्राहक तुषार वरणगावकर यांनी त्यांचे संग्रही असलेल्या नाण्यांचे प्रदर्शन करून प्रत्येक नाण्यामागील इतिहास व त्याच्या निर्मितीची कहाणी तसेच विदर्भातील अमरावती अचलपूर व दर्यापूर येथील टाकसाळीत तयार झालेल्या नाण्यांचा इतिहास आपल्या व्याख्यानातून उपस्थितां समोर मांडला.

प्रा. प्रशांत गावंडे यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांनी आपल्या विषया सोबतच इतर विषयांचे ज्ञान ठेवून आपल्या विषयाचा उपयोग वारसा संवर्धनासाठी कसा करता येईल यावर प्रकाश टाकला.या प्रसंगी प्रमुख मार्गदर्शक प्रा.डॉ. श्रीनिवास सातभाई यांच्या इतिहास व वारसा संवर्धनातील विशेष योगदानाबद्दल तसेच नर्मदा परिक्रमा पूर्ण केल्या बद्दल गौरव कडू या दोघांचा शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. विद्यापीठ गीत व संत गाडगे बाबा यांचे प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रास्ताविक डॉ. जयंत वडतकर, संचालन रेणुका नाळे, तर आभार ॲड. राजमेहेर निशाने यांनी मानले. कार्यक्रमाला इंटॅक संस्थेचे सभासद डॉ. गजानन वाघ, प्रा. अनंत वडतकर, अंकुश गावंडे, प्रा. अभिजित मेंढे, प्रा. बन्सी म्हस्के, जगदीश गुप्ता, प्रा. विनोद भटकर, प्रा. कुलदीप चौधरी, सौरभ जवंजाळ, अमेय ठाकरे, प्रा. शुभम कऱ्हाडे, विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सौरभ जवंजाळ, ॲड. राजमेहेर निशाने व विभागातील विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम घेतले.

# गाजीपूर-रुदाळी प्रकरण अधिकच गंभीर

## जबाबदारी झटकण्याच्या स्पर्धेत वनसंवर्धन बळी

### प्रशासकीय हलगर्जीपणातून पर्यावरणीय संकट तीव्र; 'संरक्षण' नावापुरतेच?


**ॲड. समीर ठाकूर**

**अकोला :** गाजीपूर-रुदाळी गावांच्या बफर झोन समावेशाच्या ठराव दडपल्याच्या प्रकरणाला आता केवळ प्रशासकीय चूक म्हणून दुर्लक्षित करता येणार नाही, इतके गंभीर स्वरूप धारण केले आहे. तब्बल दीड दशकापासून प्रलंबित राहिलेल्या या ठरावामुळे वनसंवर्धनाच्या संकल्पनेलाच धक्का बसला असून, संबंधित यंत्रणांच्या कार्यपद्धतीवर तीव्र प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. विशेष म्हणजे, या कालावधीत उद्योगांना दिलेली मोकळीक आणि वन्यजीवांवर झालेले दुष्परिणाम पाहता, हा केवळ निष्काळजीपणा नसून जाणीवपूर्वक दुर्लक्ष असल्याची शंका व्यक्त केली जात आहे.

ग्रामसभेने २०१० मध्ये स्पष्ट ठराव करूनही तो प्रशासकीय पातळीवर 'गहाळ' होणे, ही बाब अत्यंत गंभीर मानली जात आहे. अकोट वन्यजीव विभाग, प्रादेशिक वनविभाग अकोला आणि पश्चिम मेळघाट कार्यालय या तिन्ही स्तरांवर समन्वयाचा पूर्ण अभाव दिसून येतो. प्रत्येक कार्यालयाने जबाबदारी एकमेकांवर ढकलत वेळ

### ■ 'जबाबदार कोण?' - पर्यावरण प्रेमींचा थेट सवाल

ग्रामस्थ आणि पर्यावरणप्रेमी आता थेट प्रश्न विचारत आहेत – ठराव कुठे अडकला? कोणत्या अधिकाऱ्याने तो पुढे पाठवला नाही? कोणत्या स्तरावर त्याची दखल घेतली गेली नाही? आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, या दुर्लक्षाची किंमत कोण मोजणार? या प्रश्नांची स्पष्ट उत्तरे मिळेपर्यंत स्वस्थ बसणार नसल्याचा इशारा पर्यावरण प्रेमीकडून देण्यात आला आहे.



काढल्याचे चित्र समोर आले आहे. परिणामी, वनसंवर्धनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या निर्णयाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष झाल्याचा आरोप आता अधिक ठळक होत आहे.

दरम्यान, या प्रशासकीय उदासीनतेचा थेट फायदा घेत परिसरात प्रदूषणकारी उद्योगांनी अक्षरशः मोकाट धाव घेतली आहे. खदानी, स्टोन क्रशर आणि डांबर हॉट मिक्स प्लांट यांसारख्या उद्योगांनी वनक्षेत्राच्या अगदी सीमेलगत आपले जाळे विस्तारले आहे. या उद्योगांमधून होणारे सततचे ब्लास्टिंग, धूर, धूळ आणि प्रचंड आवाज यामुळे वन्यजीवांच्या नैसर्गिक अधिवासावर गंभीर परिणाम होत आहेत. काही भागांत प्राण्यांचे स्थलांतर वाढल्याचे आणि पाणवठ्यांवर मानवी हस्तक्षेप वाढल्याचेही निदर्शनास येत आहे.

तज्ज्ञांच्या मते, बफर झोनचा उद्देशच कोअर क्षेत्राचे संरक्षण करणे आणि बाह्य दबाव नियंत्रित ठेवणे हा असतो. मात्र गाजीपूर-रुदाळी प्रकरणात बफर झोनच अस्तित्वात नसल्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. यामुळे कोअर झोनवर थेट दबाव वाढत असून, व्याघ्र प्रकल्पाच्या दीर्घकालीन उद्दिष्टांनाच धोका निर्माण झाला आहे.विशेष म्हणजे, पर्यावरणीय परवानग्यांची प्रक्रिया देखील संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. संबंधित उद्योगांना मंजुरी देताना बफर झोनचा विचार करण्यात आला का? पर्यावरण प्रभाव मूल्यांकन अहवाल वस्तुनिष्ठ होते का? स्थानिकांच्या हरकतींची दखल घेण्यात आली का? अशा

### ■ 'उद्योगांसाठी नियम शिथिल, ग्रामसभांसाठी अडथळे' - दुहेरी मापदंड?

स्थानिक नागरिक आणि पर्यावरण कार्यकर्त्यांमध्ये प्रशासनाविरोधात तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. 'ग्रामसभेचा ठराव वर्षानुवर्षे प्रलंबित, पण उद्योगांना काही महिन्यांत मंजुरी' असा आरोप करत दुहेरी मापदंडांचा मुद्दा उपस्थित केला जात आहे. लोकशाही प्रक्रियेतील ग्रामसभेच्या भूमिकेलाच दुय्यम स्थान दिले जात असल्याची भावना बळावत आहे.

### ■ वन्यजीव-मानव संघर्षाची शक्यता वाढली

परिसरातील पर्यावरणीय असंतुलनामुळे वन्यप्राणी मानवी वस्तीच्या दिशेने वळत असल्याच्या घटना वाढत आहेत. अन्न व पाण्याच्या शोधात प्राणी गावांकडे येत असल्याने भविष्यात मानव-वन्यजीव संघर्ष तीव्र होण्याची भीती व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर तातडीने उपाययोजना न केल्यास परिस्थिती नियंत्रणाबाहेर जाण्याचा इशारा तज्ज्ञांनी दिला आहे.

अनेक प्रश्नांची उत्तरे अद्याप अनुत्तरित आहेत. काही प्रकरणांत कागदोपत्री नकाशे आणि प्रत्यक्ष भौगोलिक स्थितीत मोठी तफावत असल्याचेही समोर आले आहे. यासोबतच, माहिती अधिकारातून मिळालेल्या कागदपत्रांमध्ये परस्परविरोधी नोंदी आढळल्याने संपूर्ण प्रक्रियेची पारदर्शकता संशयास्पद ठरली आहे. काही कागदपत्रांमध्ये गावांचा उल्लेख नसताना, इतर ठिकाणी वेगळी माहिती देण्यात आल्याचे दिसते. यामुळे 'कागदोपत्री खेळ' करून निर्णय प्रक्रियेवर परिणाम झाला का, असा गंभीर सवाल उपस्थित होत आहे.

वनविभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची भूमिकाही तितकीच वादग्रस्त ठरत आहे. इतक्या मोठ्या कालावधीत ठराव प्रलंबित राहूनही कोणतीही दखल न घेणे, ही बाब केवळ दुर्लक्ष म्हणून पाहता येणार नाही. उलट, या संपूर्ण प्रकरणात उच्चस्तरीय पातळीवरही निष्क्रियता असल्याचे संकेत मिळत आहेत. त्यामुळे स्वतंत्र आणि निष्पक्ष चौकशीची मागणी आता अधिक तीव्र झाली आहे.

# कोणार्कला मिळणार नाही तीन महिन्याचे बिल

### महापौर तेजवानी यांचा निर्णय



**-आमसभेमध्ये स्वच्छतेवरून घमासान**
**-डॉ.अजय जाधव यांच्या राजीनाम्याची मागणी**


**अमरावती/प्रतिनिधीः-** महानगरपालिकेच्या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर सभागृहमध्ये आज गुरुवार २३ एप्रिल रोजी झालेल्या आमसभेमध्ये पुन्हा एकदा कचरा आणि स्वच्छतेच्या मुद्द्यावरून जोरदार हंगामा पाहायला मिळाला. कंत्राटदार बदलल्या नंतरही शहरात स्वच्छतेची व्यवस्था आणि कचरा उचलण्यामध्ये निष्काळजीपणा असल्याचा आरोप नगरसेवकांनी केला. यामुळे चांगलाच गोंधळ निर्माण झाला होता. आरोप प्रत्यारोपच्या मधात महापौर श्रीचंद तेजवानी यांनी शेवटी कोणार्क कंपनीला तीन महिन्याचे बिल न देण्याची घोषणा केली.

आमसभेच्या सुरुवातीला राकाँपा नगरसेवक मंगेश मनोहरे यांनी हा मुद्दा उचलला होता. स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर यांनी याचे अनुमोदन केले. नगरसेवकांनी म्हटले की, कचरा संकलन आणि वाहतुक योग्यरित्या होत नाही. यामुळे शहरात कचरा दिसत आहे. स्वच्छतेच्या कामात कंपनीच्या वतीने निष्काळजीपणा केला आहे. नागरिक घाण☞(पान २ वर)

# खारतळेगांवजवळ कार पलटल्याने मेडिकल व्यावसायीकाचा मृत्यू

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती वरून दर्यापूरकडे परत जात असताना वाहना समोर अचानक रोही आल्याने कार पलटी झाली. यामुळे दर्यापूर येथील मेडिकल व्यावसायीक अमोल तराळ यांचा मृत्यू झाल्याची घटना आज गुरुवार २३ एप्रिलच्या सकाळी समोर आली आहे. यामुळे परिसरात शोककळा पसरली आहे. माहितीनुसार दर्यापूर येथील गोविंद मेडिकलचे संचालक अमोल तराळ बुधवारी काही कामानिमित्त आपल्या कार एमएच





२७ बीझेड ३६७१ ने अमरावती आले होते. अमरावती वरून काम झाल्यावर रात्री ११ वाजताच्या सुमारास ते परत दर्यापूरला जात होते. त्यावेळी खारतळेगांव जवळ अचानक त्यांच्या वाहनाच्या समोर रोही आडवा आला. यामुळे वाहन अनियंत्रित ☞(पान २ वर)

# गुलिस्ता नगरात बंद घरात चोरी

### दीड लाखांचा मुद्देमाल लंपास

**अमरावती/प्रतिनिधीः-** नागपूर गेट पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या गुलिस्ता नगरमध्ये एका बंद घराला निशाणा बनवून तिथून दिड लाखांचा मुद्देमाल लंपास करण्यात



आला आहे. या प्रकरणात पोलिसांनी शेख अहमद शेख चांद यांच्या तक्रारी वरून अज्ञात आरोपींना विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.शेख अहमद यांनी तक्रारीमध्ये सांगितले की ,ते काही कामासाठी चांदुर रेल्वेत त्यांच्या मुलीच्या घरी गेले होते. घराला त्यांनी कुलूप लावले होते. मंगळवारी ते मुलीच्या☞(पान २ वर)

# ऊर्जा क्षेत्रात 'इतिहासावर' जगता येत नाही

### महावितरणचे संचालक राजेंद्र पवार

**अमरावती/प्रतिनिधीः-** ग्राहकाभिमुख सेवा देणे, वितरण हानी निचांकी स्तरावर आणणे आणि महसूल वाढीसह थकबाकी शून्य करण्याच्या उद्दिष्टांना अमरावती परिमंडळाने यशस्वी प्रतिसाद दिला आहे. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात या परिमंडळाने राज्यात तिसऱ्या क्रमांकाचे सर्वोत्तम परिमंडळ ठरण्याचा बहुमान मिळवला, ही कौतुकास्पद बाब आहे. मात्र, ऊर्जा क्षेत्र हे अत्यंत आव्हानात्मक आहे. या क्षेत्रात केवळ मागील कामगिरीच्या यशावर म्हणजे



इतिहासावर जगू शकत नाही. भविष्यातील आव्हाने पेलण्यासाठी अधिक जोमाने, एकजुटीने आणि कामात सातत्य राखून महावितरणला प्रगतीपथावर न्यावे, असे आवाहन महावितरणचे संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांनी केले.

अमरावती येथील संत ज्ञानेश्वर सभागृहात दि. २२ एप्रिल रोजी अमरावती परिमंडळाच्या वतीने 'आर्थिक वर्ष २०२५-२६ कामगिरी गौरव सोहळा'चे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात मुख्य पाहुणे म्हणून संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अमरावती परिमंडळाचे मुख्य अभियंता अशोक साळुंके होते तर प्रमुख पाहुणे म्हणून मुख्य अभियंता राजेश नाईक (अकोला) , अधीक्षक अभियंते दीपक देवहाते (अमरावती), प्रवीण दरोली (यवतमाळ) आणि दीपाली माडेलवार (पायाभूत आराखडा) यांची उपस्थिती होती.

या गौरव कार्यक्रमात अमरावती परिमंडळांतर्गत विविध मापदंडांवर सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या १४ सांघिक कार्यालयांना संचालक पवार यांच्याहस्ते ☞(पान २ वर)

# पट्ट्याने मारहाण, ट्रिमरने केस कापले

## वरुडमध्ये अल्पवयीन मुलीवर अमानुष छळ

### दोन आरोपींवर गुन्हा दाखल

**अमरावती/प्रतिनिधीः-** वरुड तालुक्यातील मिर्ची प्लॉट परिसरात १६ वर्षीय अल्पवयीन मुलीवर अत्यंत क्रूर वागणूक देत तिचा शारीरिक व मानसिक छळ करण्यात आल्याची गंभीर घटना समोर आली आहे. या प्रकरणात एका महिलेसह दोन आरोपींविरुद्ध पोलिसांनी कठोर कलमांखाली गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, १५ एप्रिल रोजी सायंकाळी हा प्रकार घडला. आरोपींनी मुलीवर दबाव आणत तिच्याशी गैरवर्तन केले. मुलीने विरोध केल्यानंतर तिला पट्ट्याने मारहाण करण्यात आली. त्यानंतर तिचे केस घरात असलेल्या इलेक्ट्रिक ट्रिमरच्या साहाय्याने कापून टाकण्यात आल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे. या घटनेमुळे मुलगी मानसिकदृष्ट्या हादरली☞(पान २

# अमरावतीत जनगणना २०२७ साठी गणक-पर्यवेक्षक प्रशिक्षणाचा शुभारंभ

### ५ झोनमध्ये एकाचवेळी कार्यक्रम सुरू

**अमरावती/प्रतिनिधीः-** आगामी २०२७ च्या जनगणनेच्या पार्श्वभूमीवर अमरावती महानगरपालिका प्रशासनाने अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने महानगरपालिका स्तरावरील प्रगणक व पर्यवेक्षक यांच्या प्रशिक्षण कार्यक्रमाची आज भव्य सुरुवात केली. २३ एप्रिल ते ८ मे २०२६ या कालावधीत हा महत्त्वपूर्ण प्रशिक्षण उपक्रम राबविण्यात येणार असून, शहरातील सर्व झोनमध्ये त्याचे उद्घाटन आज एकाचवेळी करण्यात आले.



महानगरपालिकेच्या झोन क्र. १ अंतर्गत इर्विन चौक येथील ज्ञानमाता हाय स्कूलमध्ये उद्घाटन सत्र पार पडले. झोन क्र. २ साठी रामकृष्ण क्रीडा महाविद्यालय, झोन क्र. ३ साठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, उत्तम नगर, झोन क्र. ४ साठी होली क्रॉस हिंदी हाय स्कूल, बडनेरा तसेच झोन क्र. ५ साठी अमन नगर येथील निदा उर्दू ☞(पान २ वर)

# दोन तरुणांच्या मृत्यूने पिंपळोद गावावर शोककळा

### एकाने घेतला टोकाचा निर्णय, तर दुसरा अपघाताचा बळी

**खल्लार/प्रतिनिधीः-** आयुष्याच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या दोन तरुणांच्या अकस्मात मृत्यूने पिंपळोद गावावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. दि.२१ एप्रिलला एकाच दिवशी घडलेल्या दोन वेगळ्या घटनांनी संपूर्ण पिंपळोद गाव सुन्न झाले असून सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.



सततची नापिकी, डोक्यावरील वाढते कर्ज यामुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या सर्जेराव गणेशराव नवलकर (वय ३६) यांनी मंगळवारी दुपारच्या सुमारास ☞(पान २ वर)

## महाराष्ट्र वैद्यकीय परिषद निवडणूकः

# २६ एप्रिल रोजी मतदान; जिल्हाधिकाऱ्यांचे मतदानाचे आवाहन

### -जिल्ह्यात २ हजार ५६५ नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिक मतदार

**अमरावती/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेच्या (एमएमसी) ९ सदस्यांच्या निवडीसाठी निवडणूक कार्यक्रम घोषित झाला असून, अमरावती जिल्ह्यात येत्या २६ एप्रिल २०२६ रोजी प्रत्यक्ष मतदान प्रक्रिया पार



पडणार आहे. जिल्ह्यातील एकूण २ हजार ५६५ नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिक मतदारांसाठी प्रशासनाकडून ४ मतदान केंद्रे निश्चित करण्यात आली असून, जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी जास्तीत जास्त संख्येने मतदानाचा हक्क बजावण्याचे आवाहन केले आहे. अवर सचिव तथा निवडणूक निर्णय अधिकारी, महाराष्ट्र वैद्यकीय परिषद, मुंबई यांनी जारी केलेल्या ☞(पान २ वर)

# अल्पवयीन मुलीने दिला बाळाला जन्म

### नागपूर गेट ठाण्यात गुन्हा दाखल

**अमरावती/प्रतिनिधीः-** नागपूर गेट पोलीस ठाणे हद्दीत अल्पवयीन मुली ने बाळाला जन्म दिल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणात पोलिसांनी २७ वर्षीय आरोपी विरुद्ध अत्याचार व पोक्सो अन्वये दाखल केला आहे. माहिती नुसार आरोपीची २०२४ मध्ये इन्स्टाग्रामवर अल्पवयीन मुलीशी ओळख झाली होती. यानंतर दोघांच्या मधात प्रेम संबंध स्थापित झाले. आरोपीने मंगळसूत्र टाकून तिच्याशी लग्न केले. १७ एप्रिल रोजी पिडिताला जिल्हा स्त्री रुग्णालयात दाखल करण्यात आले. जिथे तिने एका बाळाला जन्म दिला आहे. बाळाच्या जन्माच्या वेळी ती अल्पवयीन असल्याचे डॉक्टरांच्या लक्षात आले. यामुळे त्यांनी पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी आरोपी तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# नगरसेवकांमधील आपसातील वादामुळे शहराचे नुकसान

### चांदूर रेल्वे येथील नमो गार्डनच्या ठरावावर भाजपने मागितली स्थगिती

**चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः-** नमो गार्डनचे बांधकाम आणि ते जनतेसाठी खुले करण्याची तारीख जसजशी जवळ येत आहे, तसतसा नमो गार्डनचा निधी परत जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे.अश्यातच भाजपच्या नगरसेवकांनी नमो गार्डनसंदर्भातील २५ मार्च आणि २ एप्रिलच्या नगर पालिका ठरावांविरुद्ध जिल्हा प्रशासनाकडे अर्ज दाखल करत स्थगिती मागितल्यामुळे नमो गार्डन शहरात होणार की नाही? यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

शहरातील नमो उद्यानाच्या बांधकामावरून गेल्या चार महिन्यांपासून भाजप आणि सत्ताधारी पक्षाच्या नगरसेवकांमध्ये तणावपूर्ण परिस्थिती आहे. अशात २० एप्रिल रोजी भाजप नगरसेवकांनी जिल्हा प्रशासनाकडे नगरपालिका अधिनियम १९६५ च्या कलम ३१८ अन्वये अर्ज दाखल करत सत्ताधारी पक्षाने २५ मार्च आणि २ एप्रिल रोजी १२ क्रमांकाच्या विषयावरील मंजूर केलेल्या ठरावाला स्थगिती देण्याची विनंती भाजपा नगरसेवकांनी जिल्हा प्रशासनाकडे केली. ज्यामुळे जिल्हा प्रशासनाकडून नमो उद्यान पुढील आदेश मिळेपर्यंत स्थगिती ☞(पान २ वर)

# अल्पवयीन मुलीवर अत्याचाराचा प्रयत्न

### आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल

**तिवसा/प्रतिनिधीः-** स्थानिक तिवसा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका गावात अल्पवयीन मुलीवर अत्याचार करण्याचा प्रयत्न केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी तिवसा पोलिसांनी आरोपी विरुद्ध पोक्सो कायद्याअंतर्गत गुन्हा नोंदविला असून आरोपीला अटक केली आहे. राजू भानुदास चव्हाण असे आरोपीचे नाव आहे.

प्राप्त माहितीनुसार फिर्यादी व आरोपी एकाच परिसरात राहत असून दि.२२ रोजी मध्यरात्री दरम्यान आरोपी हा पीडित अल्पवयीन मुलीच्या घरात शिरला. मुलगी आई-वडिलांसह घराच्या अंगणात झोपेत असतानाच आरोपीने तिच्या शरिराला नको तो स्पर्श केला. यामुळे मुलगी खळबळुन जागी झाली आणि जोरात ओरडली असता आरोपीने☞(पान २ वर)

# वृद्धाकडून अल्पवयीन मुलीचा विनयभंग

### वरुडमधील घटना

**वरुड/प्रतिनिधीः-** वरुड पोलिस ठाण्याच्या हद्दीत एका ६० वर्षीय वृध्दाने १६ वर्षीय अल्पवयीन मुलीचा विनयभंग केला. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात तीव्र संताप व्यक्त होत असून पोलिसांनी आरोपीविरोधात पॉक्सो कायद्यासह विविध गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल केला आहे.



ही धक्कादायक घटना २१ एप्रिल रोजी दुपारी घडली. गावात आलेल्या जोरदार वादळामुळे पीडितेच्या घराच्या छतावरील ताडपत्री उडाली होती. पीडितेची आई छतावर जाऊन ही ताडपत्री दुरुस्त करत होती. याच वेळी आरोपी पीडितेच्या घरी आला आणि बाहेर बसला. पीडित मुलगी तहान ☞(पान २ वर)